


अल्पावधीत
लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले
दर्जेदार मासिक


# मेहता मराठी ग्रंथजगत

जून २०१० | किंमत १५ रुपये



# ‘तुम्ही आणि तुमची मुले’
# १० वी आवृत्ती प्रकाशन सोहळा










◆ जून २०१०

◆ वर्ष दहावे

◆ अंक सहावा

# मेहता मराठी ग्रंथजगत

## — अनुक्रमणिका —

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | १६ |
| **पुस्तक परिचय** | |
| **शांताराम** : अनु. अपर्णा वेलणकर | ५० |
| **वन शॉट** : अनु. बाळ भागवत | ५८ |
| **सर्कल ऑफ लाइट** : अनु. उषा महाजन | ६६ |
| **विज्ञानातील सरस आणि सुरस** : राहुल गोखले | ७२ |
| **पुरस्कार** | ७८ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ९३ |
| **श्रद्धांजली** | ९६ |
| **बालनगरी** | १०० |

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
वंदना घाटगे

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०.
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
**Email -** info@mehtapublishinghouse.com
**Website - www.mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु. ३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय

## ग्रंथालयाची पुस्तकखरेदी

महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत ग्रंथालयांची संख्या वाढत आहे आणि ग्रंथालयांच्या अनुदानांमध्येही चांगली वाढ झालेली आहे. वर्गबदलामुळे अनुदानात खूपच फरक पडतो; त्यामुळे अनेक ग्रंथालये पुस्तकांची संख्या वगैरे वाढवून वरच्या वर्गात जाण्याचा प्रयत्नही करीत आहेत. या सर्व गोष्टी स्वागतार्ह आहेत. विकासाला चालना देणाऱ्या आहेत. वाचनसंस्कृतीच्या संवर्धनासाठी आवश्यक आहेत.

वाचनालयांच्या वर्गबदलाच्या आघाडीवर जोरदार हालचाल असल्याने काही प्रकाशकांनी आणि विक्रेत्यांनी प्रचंड कमिशनचे आमिष दाखवून ग्रंथपालांना आकृष्ट करण्याचे धोरण राबविण्यास आरंभ केला आहे. आशयदृष्ट्या दर्जेदारपणा किंवा निर्मितीमूल्ये लक्षात न घेता काढण्यात आलेल्या पुस्तकांचा त्यामुळे बाजारात सुळसुळाट झाला आहे. खोटी नाणी ज्याप्रमाणे खऱ्या नाण्यांना व्यवहारातून पळवून लावतात, त्याप्रमाणे सर्व दृष्टींनी निकृष्ट असलेली पुस्तके सत्तर-ऐंशी टक्के कमिशनच्या आमिषामुळे ग्रंथालयातली जागा व्यापत चाललेली आहे आणि कमी कमिशन असणाऱ्या, रास्त किंमत असणाऱ्या, दर्जेदार, वाङ्मयीन दृष्ट्या कसदार असणाऱ्या पुस्तकांना डावलले जात आहे. या अपप्रवृत्तींचा वेळीच बंदोबस्त केला नाही तर बहुसंख्य ग्रंथालये म्हणजे रद्दीची गोडाऊन्स होऊन जातील. चांगली दर्जेदार, वाचनीय पुस्तके ग्रंथालयात मिळणेच दुरापास्त होईल. ग्रंथालयांनी वाचन संस्कृतीचे संवर्धन करावे हे उद्दिष्ट मागे पडून चांगली पुस्तके चोखंदळ वाचकांपर्यंत जाऊच द्यावयाची नाहीत आणि फालतू पुस्तके त्यांच्या हाती देऊन त्यांना विचारपरिपूर्ण पुस्तकांपासून परावृत्त करण्याचे पातक ही ग्रंथालये करीत आहेत, असे नाइलाजाने म्हणावे लागते.

जागरुक वाचकांनी आणि कार्यकर्त्यांनी हा संभाव्य अनर्थकारक धोका ओळखून वेळीच त्याविरुद्ध आवाज उठविला पाहिजे. जादा कमिशनच्या मोहाला बळी पडणाऱ्या ग्रंथपालांना भ्रष्टाचाराची दारे उघडी करून देण्याचे पाप संबंधित लोक करीत आहेत हे लक्षात घेण्याची गरज आहे. पुस्तक खरेदी करताना घ्यायचे कमिशन आणि बिलात दाखवायचे कमिशन यात गोलमाल करून भ्रष्टाचाराचे कुरण मोकळे केले जात आहे.

मान्यवर प्रकाशक व प्रकाशन संस्था याबाबत तडजोडी करण्याचे टाळतात. पुस्तकांचे संपादन, मुद्रण, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन गुणवत्ता, लेखकांना मानधन, प्रामाणिकपणा वगैरे गोष्टींबाबत कटाक्ष बाळगून योग्य किंमत ठेवून रास्त कमिशन देण्याबाबत दक्षता घेणारे प्रकाशक आणि केवळ तात्कालिक फायद्यावर लक्ष ठेवून सुमार पुस्तके घाईगर्दीने काढणारे संधिसाधू प्रकाशक यांच्यातला फरक जाणून घेण्याची क्षमता आपल्या ग्रंथपालांत आणि रसिकांत नाही असे कसे म्हणता येईल? ती निश्चित असतेच. फक्त आपल्या फायद्यावर लक्ष ठेवून व्यवहार करणाऱ्यांना डोळे मिटून दूध पिणाऱ्या मांजराचे सोंग आणावे लागते एवढेच!

सुमार दर्जाच्या पुस्तकांच्या व्हायरसचा उपसर्ग महाराष्ट्रातील ग्रंथालयांना होऊ नये म्हणून जागरूक रसिकांनी, कार्यकर्त्यांनी आणि साहित्य संस्थांनी डोळ्यात तेल घालून प्रयत्न करण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे. शासनानेही याबाबत लक्ष घालून जादा कमिशनचे आमिष दाखवून ग्रंथव्यवहारात भ्रष्टाचाराच्या भस्मासुराला मोकळे रान खुले करणाऱ्या प्रवृत्तीची योग्य ती दखल घेणे इष्ट आहे. व्हायरसने सगळी सिस्टिमच करप्ट झाली तर ग्रंथसंस्कृतीच धोक्यात येईल.

ग्रंथालये म्हणजे ज्ञानमंदिरे. नव्या परिवर्तनाची तीर्थक्षेत्रे. माहितीच्या प्रसाराची विश्वपीठे. या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालये ही सर्वांगपरिपूर्ण आणि अद्ययावत असायला हवीत. ग्रंथालय हे गावातील सांस्कृतिक केंद्र आणि ज्ञानपीठ म्हणून विकसित व्हायला हवे. तसे करायला हवे. संगणक, इंटरनेट, सायबरकॅफे, मल्टिमिडीया, ई-बुक्स, फेसबुक, ऑर्कुट, ट्विटर वगैरे सोशल संकेतस्थळे यांचीही माहिती व सुविधा देण्याची प्रत्येक ग्रंथालयात आता गरज राहील. गावातील बहुसंख्य लोकांना दिवसातून एकदा तरी ग्रंथालयाला भेट देण्याची आणि इंटरनेटवर चॅटिंग करणे किंवा नवी पुस्तके - मासिके चाळण्याची सवय लागायला हवी. मुलांना इंटरनेट, टी.व्ही. गेम्स, सायबर कॅफे यांचा लाभ घेता यायला हवा.

ग्रंथालयात दर्जेदार पुस्तके घेतली जावीत यासाठी शिक्षणखाते याद्या प्रसिद्ध करीत असते. त्या शासनमान्य यादीतील पुस्तके नावापुरतीच घेऊन बाकीची पुस्तके जास्त कमिशनने घेतली जातात.

वाचकांना चांगली, नवी विविध विषयांवरची पुस्तके मिळण्याच्या दृष्टीने कटाक्ष बाळगला गेला पाहिजे. तशी काही यंत्रणा तयार करायला हवी.

ग्रंथालयांमध्ये लहान मुलांपासून वयस्कांना आणि सर्वसामान्य वाचकांपासून एखाद्या विशिष्ट विषयाचा व्यासंग करणाऱ्यांना नित्य यावेसे वाटेल असे वातावरण आणि वैविध्यपूर्ण पुस्तकांचे संकलन असायला हवे. रंजनासाठी कथाकादंबऱ्यांचे दालन तर समृद्ध हवेच; त्याचबरोबर त्या त्या गावातील किंवा भागातील वाचकांच्या गरजा लक्षात घेऊन संदर्भ अभ्यास साहित्यही उपलब्ध हवे. सध्या तर संगणक,

इंटरनेट, मल्टिमिडीया, ई-बुक्स, वगैरेंचीही सोय अपरिहार्य आहे. ग्रंथपाल आणि ग्रंथालयांचे पदाधिकारी यांनी व्यापक लोकाभिमुख धोरण ठेवून जास्तीत जास्त वाचक-अभ्यासकांना ग्रंथालयाला नियमितपणे भेट देऊन आपापल्या ज्ञानक्षेत्रात अद्ययावत राहण्याची प्रेरणा मिळावी अशी दृष्टी ठेवून ग्रंथ खरेदी करायला हवी. केवळ कमिशन खूप मिळते म्हणून वाटेल ती पुस्तके घेण्याचा मोह टाळायला हवा.

नवीन पुस्तकांची माहिती मिळवण्याबाबत ग्रंथपालांनी जागरुक असायला हवे. रविवार पुरवण्या, मासिके, ग्रंथप्रसाराला वाहिलेली 'मेहता मराठी ग्रंथजगत' सारखी मासिके, ग्रंथांच्या जाहिराती, ग्रंथप्रसारविषयक बातम्या, पुरस्कार मिळवणारी पुस्तके, आपल्या गावातील आणि भागातील लेखक, विशिष्ट विषयाचा दीर्घकाळ व्यासंग करून लिहिले गेलेले अभ्यासपूर्ण ग्रंथ या सर्वांचा मागोवा घेत राहिले तर चांगल्या पुस्तकांची निवड करणे सोपे जाईल.

ग्रंथालयांच्या सदस्यांनीही याबाबत दक्षता घेऊन आपल्या आवडीची उत्तमोत्तम पुस्तके सहजपणे वाचनासाठी मिळावीत असा आग्रह धरायला हवा. स्वामी, श्रीमानयोगी, संभाजी, शांताराम यासारखी गाजलेली पुस्तके वाचकांना विनाविलंब मिळावीत म्हणून त्यांच्या जास्त प्रती घेण्याची गरज असते. तशी मानसिकता ग्रंथपालांची हवी. एखादे पुस्तक वाचायची इच्छा झाली तर वाचकाला ते पुस्तक त्वरित कसे मिळेल यासाठी प्रयत्न करण्याची ग्रंथपालांनी तत्परता दाखवायला हवी. ग्रंथपालाने वेगवेगळे उपक्रम आयोजित करून नव्या पुस्तकांबद्दल, लेखकांबद्दल कार्यक्रम घेतले पाहिजेत. जितके जास्त वाचक दररोज ग्रंथालयात येतील तितके ते ग्रंथालय संपन्न असे म्हणता येईल. ज्ञानाचे केंद्र म्हणून ग्रंथालयाला महत्त्व आहे.

ग्रंथालयांना सध्या अनुदान भरघोस मिळू लागले आहे. त्यामुळे ग्रंथालयांकडून अधिक चांगल्या, तत्पर सेवेची अपेक्षाही वाढली आहे. ग्रंथालय हे संगणक-इंटरनेट वगैरेंनी युक्त असावे अशी आजच्या वाचकांची गरज आहे. त्यामुळे ग्रंथव्यवहारालाही आपली दिशा बदलावी लागणार आहे. मात्र उत्तमोत्तम ग्रंथांचे आणि संदर्भ साहित्याचे महत्त्व कायमच राहणार आहे.

चांगल्या, दर्जेदार साहित्याला ग्रंथालयात मोलाचे स्थान असावे असा आग्रह धरण्याची गरज आहे हे सर्वत्र जाणवते. मराठी माणसाची जगभर जाण्याची ओढ विलक्षण आहे. ही ओढ सार्थ करण्यासाठी जगातील उत्तमोत्तम ग्रंथ आणि ज्ञान हे सुलभतेने आपल्या ग्रंथालयात उपलब्ध असायला हवे.



# वाचनालयांना आवाहन

आज वेगवेगळ्या प्रकारची माहिती मिळवण्याचे विविधमार्ग उपलब्ध झालेले आहेत. इंटरनेटच्या प्रसाराने हवी ती माहिती तयार मिळण्याचा 'रेडिमेड' मार्गही खुला आहे. त्यामुळे माहिती म्हणजेच ज्ञान व हे ज्ञान हवे तेव्हा मिळवता येते असा गैरसमज सर्वत्र प्रत्ययास येतो.

परंतु मानवी जीवन, मन, प्रगल्भ, आनंदी व विचारी होण्यासाठी वाचनाला आजही कोणताही पर्याय नाही. वाचनाने मानवी मनाची, बुद्धीची मशागत होते व व्यक्ती अधिक सृजनशील, क्रियाशील बनते. वाचनाचा सार्वत्रिक प्रसार झाला तर सारा समाजच प्रगत बनेल.

यासाठी आज वाचनसंस्कृतीची वाढ करण्याची नितांत आवश्यकता आहे. या कार्यात वाचनालयांनी फार मोठे योगदान देण्याची गरज आहे. वाचन संस्कृतीची वाढ होण्यासाठी वाचनालयातून उत्तम दर्जेदार पुस्तके वाचकांना उपलब्ध झाली पाहिजेत- अशी पुस्तके कित्येक वाचनलयांतून आज उपलब्ध होत नाहीत.

जादा कमिशन मिळते म्हणून दर्जाहीन, पुस्तके वाचनालयांकडून खरेदी केली जातात आणि अशी पुस्तकेच गावोगावीच्या वाचकांना दिली जातात.

मनोरंजनाच्या भुलभुलैय्यात अडकलेल्या आजच्या युवापिढीला योग्य मार्गदर्शन करणाऱ्या व मनाला प्रगल्भ बनवणाऱ्या पुस्तकांचा प्रसार अधिकाधिक होणे गरजेचे आहे. यासाठीच सर्व वाचनालयांना आम्ही आवाहन करीत आहोत, फक्त उत्तमच पुस्तके घ्या आणि समाजाच्या बौद्धिक विकासाचे पाईक बना, काही ज्येष्ठ नामवंतांनी नावाजलेल्या दर्जेदार पुस्तकांची माहिती आम्ही सादर करीत आहोत. प्रत्येक वाचनालयात ही पुस्तके असलीच पाहिजेत, असे आम्हाला वाटते. वाचनालयांनी ही पुस्तके घ्यावीत व आपले वाचनालय समृद्ध करावे ही अपेक्षा.

**आगामी**




# थेंबभर पाणी अनंत आकाश

**सुरेखा शहा**

**२८०रु. पोस्टेज ३०रु.**

‘भवरलाल, ही दगडाधोंड्यांची ओसाडी विकत घेऊन तू काय करणार आहेस? या दगडांतून काहीतरी उगवेल का?’ त्याच्या मनाने त्याला प्रश्न विचारला. पण व्यवहारी मनाच्या आत एक सृजनशील अंतर्मन दडले होते. त्याने सांगितले, ‘तू हे करच. कारण केवळ तूच हे करू शकशील. तूच या दगडांतून एक संजीवक स्वप्नशिल्प निर्माण करू शकशील.’


ही संजीवक कहाणी आहे, ओसाडीतून नंदनवन निर्मिणाऱ्या, पाण्याच्या थेंबाथेंबातून जीवन देऊन शेतकऱ्यांना समृद्ध करणाऱ्या, भूमीवर व भूमिपुत्रांवर प्रेम करणाऱ्या पद्मश्री डॉ. भवरलाल जैन या पुरुषोत्तमाची! त्याने केलेल्या संघर्षाची. त्याने निर्माण केलेल्या वेगळ्या वाटेची.

श्रम, बुद्धी, संस्कार आणि निसर्ग प्रेमाच्या महामंत्राची आणि त्यातून निर्माण झालेल्या उत्तुंग यशाची!

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

**आगामी**

# द रोड ऑफ लॉस्ट इनोसन्स





**सोमाली माम**
अनु. **भारती पांडे**

**१६०रु. पोस्टेज २५रु.**

स्वत:वर होत असलेल्या अन्यायामुळे,
अत्याचारामुळे पेटून उठलेली निराधार सोमाली.
फक्त स्वत:ची सुटका करून ती थांबली नाही
तर भ्रष्टाचारी समाजाच्या विरोधात
नेटाने उभी राहिली
आणि आपल्यासारख्या अनेक मुलींची सुटका
करण्यात यशस्वी झाली.
तिचं चटका लावणारं आणि
थक्क करून टाकणारं आत्मकथन
मनात आशेचा स्फुल्लिंग जागवणारं ठरेल.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

**आगामी**




# नष्ट नीड

**रवींद्रनाथ टागोर**
अनु. नीलिमा भावे

**१४०रु. पोस्टेज २५रु.**

चारू, आदित्य आणि शशांक हे आपापल्या जागी एका विशिष्ट परिस्थितीत सापडले आहेत. त्यामुळं त्यांचा मानसिक कोंडमारा होतो आहे. या कोंडमाऱ्यातून बाहेर पडण्याचा मार्ग त्यांना जवळच्या व्यक्तीतच सापडतो.

हा मार्ग आपल्याला नक्की कुठे नेणार आहे, याची कल्पना येण्याआधीच ते त्या मार्गावर चालायला सुरुवातही करतात.

आपापल्या स्वभावधर्मानुसार पुढे जाणाऱ्या त्यांच्या या वाटचालीतचे टप्पे कादंबरीकार टागोर या कथानकांमधून चित्रित करतात. त्यांच्या स्वभावधर्मानुसार ही कथानकेही वेगवेगळी होतात आणि त्यांचे शेवटही वेगवेगळे होतात.


कादंबरीकार टागोरांचा या विषयाचा शोध चालूच राहतो.

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

**आगामी**

# रुसी मोदी

## द मॅन हू ऑल्सो मेड स्टील




मूळ इंग्रजी लेखक


**पार्थ मुखर्जी । ज्योती सबरवाल**

अनु. **अंजनी नरवणे**

- एक अत्यंत संपन्न, अत्यंत सुसंस्कृत कुटुंब.
- मुलांचे लाड खूप व्हायचे, पण शिस्तही तितकीच कडक असायची, कपडे साधे असायचे, गरीब मुलांबरोबर खेळायला, खायलाप्यायला सूट असायची.
- गरिबी, मळके कपडे यात लाजिरवाणं काहीही नाही; खोटं बोलणं, वाईट वागणं हे लाजिरवाणं आहे असं ठासून मनावर बिंबवलं जायचं.
- शिक्षण इंग्लंडमध्ये हॅरो आणि ऑक्सफर्डला. बुद्धी तल्लख, पण अभ्यासाची आवड नाही. इतिहास विषयात स्नातक.
- इतिहास राहिला बाजूला, नोकरीला लागले एका मोठ्या कारखान्यात रोजावर मजूर म्हणून! कष्ट करण्याची तयारी, माणसांना समजून घेणं, माणसं जोडता येणं, सर्वांशी मिळतं घेणं हे खास गुण. शिस्तीचे आग्रही. वेळ पडली तर वज्रादपि कठोराणि– एरवी मृदूनि कुसुमादपि!
- उत्तम कलांची आवड, उत्तम खाण्याची, पिण्याची, संगीताची, पाश्चिमात्त्य नृत्याची आवड. उत्तम वक्ते, भरपूर वाचन.

........सगळंच छान? दुःख कशाचंच नाही? आहे ना! पण त्याचं प्रदर्शन नाही.

- सुंदर, गुणी मुलीशी प्रेमविवाह केला, पण चौदा वर्षांनंतर घटस्फोट झाला– तरीही तिच्याशी संबंध अजून छान!
- मुलांची खूप आवड, पण मूलबाळ नाही! '...सगळ्यांनाच सगळं कसं मिळेल?'
- नोकरीत अन्याय झाला– दुसरी कंपनी काढली!
- इतकी बहुरंगी, बहुढंगी अशी आहे तरी कोण ही व्यक्ती?
- ज्यांनी जमशेटपूरच्या टिस्कोमध्ये एकूण त्रेपन्न वर्षं सलग काम केलं, कंपनीची विक्री व नफा प्रचंड प्रमाणात वाढवला, ते — **रुसी मोदी!**




२८वी आवृत्ती

# स्वामी

## रणजित देसाई

**१६०रु.  पोस्टेज २५रु.**

मराठी साहित्याला समृद्ध करणारे थोर साहित्यिक. १९४६ साली 'भैरव' या कथेला लघुकथास्पर्धेत वाचकांकडून एकमुखाने पहिले पारितोषिक. १९५२मध्ये 'रुपमहाल' हा पहिला कथासंग्रह प्रकाशित. त्यानंतर सातत्याने कथालेखन. ग्रामीण जीवनावरील व ऐतिहासिक व्यक्तिरेखांवरील लेखन अधिक रसरशीत. 'स्वामी'ला साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त.

मराठीमध्ये अतिशय लोकप्रिय असलेली व रसिकमान्यता पावलेली रणजित देसाई यांची कादंबरी. थोरले माधवराव पेशवे यांचे राजकीय जीवन,कर्तृत्व आणि त्यांचे वैयक्तिक करुणगंभीर जीवन याचे अतिशय उदात्त व प्रभावी चित्रण स्वामीत केलेले आहे. इतिहास आणि साहित्य ह्याचे एवढे उर्जस्वल नि रोमहर्षक रसायन मराठी भाषेत आजतागायत कोणी निर्माण करू शकलेले नाही.

कादंबरीतील अतिशय उठावदार आणि कलात्मक व्यक्तिरेखा आहेत, माधवराव, रमाबाई आणि राघोबादादा यांच्या. या तिन्ही चरित्ररेखा वाचकांच्या मनांवर विलक्षण परिणाम करतात.

थोरल्या माधवराव पेशव्यांची ही चरित्रगंगा वाचताना करुणेने मन भरून येते. उदात्ततेने भारावून जाते आणि पूर्वजांच्या अभिमानाने मान ताठे होते. स्वामी वाचून वाचक दिपून जातो. दिग्मूढ होतो.

इतिहास आणि ललितकृती या दृष्टींनी रसोत्कट असलेली शोकात्मिक कादंबरी.

शिवचरित्राचे भव्योदात्त, उत्कट चित्रण करणारी कादंबरी

# श्रीमानयोगी

## रणजित देसाई

**४००रु. पोस्टेज ३०रु.**




निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंतयोगी ।
यशवन्त कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवन्त नीतिवन्त । जाणता राजा ।

समर्थ रामदासांनी वर्णिलेलं शिवरायांचं हे उदात्त, दिव्यभव्य रूप म्हणजे प्रत्येक मराठी मनानं पूजलेला शक्तीरूप आदर्श. मराठ्यांच्या किंबहुना भारताच्या इतिहासातील तेजानं लखलखणारा दीपस्तंभ.

इतका अष्टपैलू, अष्टावधानी संपूर्ण पुरूष इतिहासात दुसरा नाही. आदर्श राज्यकर्ता, थोर सेनानी, प्रजादक्ष, धर्माभिमानी, परधर्मसहिष्णू, चारित्र्यसंपन्न, दूरदृष्टीचा असा जाणता राजा जगाच्या इतिहासात दुसरा मिळणे कठीण.

पुरंधरच्या तहाने धुळीला मिळालेले राज्य त्याच धुळीतून परत उठवून सुवर्णमय करण्याचे सामर्थ्य फक्त या एकाच महापुरुषात होते, ही इतिहासाची नोंद आहे.

शिवाजी ही व्यक्तिरेखा फार मोठी आहे. तिचे शेकडो पैलू आहेत. शिवचरित्र हे कलावंतांपुढे कालातीत राहणारे असे आव्हान आहे. कितीही काळ लोटला तरी मरगळलेल्या, हताश झालेल्या समाजमनाला खडबडून जाग आणण्याचे सामर्थ्य फक्त शिवचरित्रातच आहे.

शिवचरित्राचे भव्योदात्त उत्कट चित्रण करणारी ही कादंबरी. रणजित देसाईंच्या अलौकिक प्रतिभेचं लेणं लेऊन साकार झालेली शिवछत्रपतींची ही चरितकहाणी वाचकांच्या अलोट प्रेमास पात्र ठरलेली आहे.

## रणजित देसाई यांच्या कादंबऱ्या




# अभोगी

कलावंताच्या कलेपेक्षा माणुसकी श्रेष्ठ असते
हे सिद्ध करणारी चित्रदर्शी कहाणी

**१५०रु. पोस्टेज २५रु.**



# राधेय

प्रत्येकाच्या मनात दडलेल्या कर्णाची उत्कट कहाणी

**१५०रु. पोस्टेज २५रु.**




# पावनखिंड

ज्याच्या स्वामीभक्तीनं मराठ्यांचा इतिहास 'पावन' केला
अशा बाजीप्रभूची ऊर्जस्वल कहाणी

**१००रु. पोस्टेज २५रु.**



# माझा गाव

स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रामीण जीवनाचे मनोवेधक
चित्रण करणारी कादंबरी

**१५०रु. पोस्टेज २५रु.**

## रणजित देसाई यांचे कथासंग्रह




# गंधाली

ऐतिहासिक व्यक्तींची रसरशीत चित्रे उभ्या करणाऱ्या ललितरम्य कथा

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

---




# मेघ

मानवी भावभावनांचं प्रत्ययकारी दर्शन

**१००रु. पोस्टेज २५रु.**

---




# संकेत

वीतभर रुंदीच्या फण्याची,हिरव्याकंच डोळ्यांची नागीण आपली पिवळीजर्द मान वळवत दुधारी जीभ काढून वैजूकडे पाहात डोलत होती

**८०रु. पोस्टेज २०रु.**

---




# बाबुलमोरा

कलावंतांच्या जीवनाचं अनोखं दर्शन घडवणाऱ्या कथा

**१२५रु. पोस्टेज २५रु.**

# साहित्यवार्ता



## * मराठीसाठी स्वतंत्र मंत्रालय

महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी मराठीसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्याचा निर्णय जाहीर केला. मराठीसाठी स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना ही घोषणा फक्त राजकीय डावपेचाचा भाग राहू नये. मराठी ही राजभाषा म्हणजे राज्यव्यवहाराची भाषा व्हावी अशी अपेक्षा बाळगायलाच हवी. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, राज्य विकास मराठी संस्था व मराठी भाषा संचालनालय या तीन संस्था मराठी भाषा आणि साहित्याच्या संदर्भात शासनाने यापूर्वी निर्माण केल्या आहेत. पण त्यांच्याकडून अपेक्षित असे कार्य होत नाही त्यामुळे सरकारला स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्याची गरज वाटली असावी. मराठी म्हणजे प्रमाण भाषा, मराठी म्हणजे सर्व बोली भाषा असा मराठी मंत्रालयाचा प्रपंच असावा. मराठी भाषेचा आणि बोली भाषेचा वैज्ञानिक अभ्यास वाङ्मय वृद्धीच्या दृष्टीने व्हावा. मराठी ज्ञानभाषा करण्याच्या दृष्टीने या मंत्रालयाने मराठी विद्यापीठाची स्थापना करावी, अशा भावना जाणकारांनी प्रकट केल्या.

## * कुसुमाग्रजांच्या स्मारकासाठी दोन कोटी

कुसुमाग्रजांच्या नाशिक येथील राष्ट्रीय स्मारकासाठी राज्य सरकारतर्फे दोन कोटी रुपयांचे अर्थसाह्य देण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी अहिल्याराणी महिला विकास व शैक्षणिक संस्थेच्या 'माझ्या स्वप्नातील एक तारा : कवी कुसुमाग्रज' या कार्यक्रमात केली. न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ अभिनेते प्रभाकर पणशीकर, श्रीकांत मोघे उपस्थित होते. या वेळी तपस्वी लिखित 'प्रिय तात्या', 'कारागृहातील बंद श्वास' यांसह 'अंतर्नाद' या कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.

कुसुमाग्रजांच्या आठवणींना उजाळा देताना भुजबळ म्हणाले, "ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्यानंतर तात्यासाहेबांचा मुंबईला सत्कार झाला. त्या वेळी मी महापौर होतो. सत्काराला उत्तर देताना महाराष्ट्राच्या राजधानीत नाट्यपरिषदेला स्वत:ची जागा नाही ही खंत त्यांनी बोलून दाखविली. हा आदेश समजून एक महिन्याच्या आत आम्ही माहीम येथे नाट्यपरिषद कार्यालयाकरिता जागा उपलब्ध करून दिली. तेथे यशवंत

नाट्यसंकुल उभारले गेले. हा माझ्यासाठी आनंदाचा क्षण आहे.''

धर्माधिकारी म्हणाले, ''तात्यासाहेबांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी तत्कालीन उपमुख्यमंत्र्यांनी कुसुमाग्रजांचे राष्ट्रीय स्मारक उभारण्याची घोषणा केली होती. माणसं बदलली तरी सरकार कायम राहते. त्यामुळे त्या उपमुख्यमंत्र्यांनी चुकून दिलेला शब्द आपण पाळलात तर मराठीप्रेमींना आनंद होईल.''

अभिनेते शरद पोंक्षे आणि प्रथमेश इनामदार यांनी 'पृथ्वीचे प्रेमगीत', 'पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा', 'प्रेम कुणावर करावं' या कविता तर, आरती अंकलीकर-टिळेकर, राजेश दातार यांनी 'हे सुरांनो चंद्र व्हा', 'काही बोलायचे आहे' या रचना सादर केल्या. ज्येष्ठ कवी गुलजार, प्रा. के. रं. शिरवाडकर, धर्माधिकारी आणि तपस्वी यांनी थेट संवादांतून आठवणी जागविल्या. पणशीकर यांनी 'नटसम्राट'मधील स्वगत सादर केले, मोघे यांनी 'कौंतेय'चे अभिवाचन केले.


*** तात्या टोपेज् ऑपरेशन रेड लोटस**

इतिहास म्हणजे गणित नाही, त्यामुळे त्यात मतभेद असणे स्वाभाविक आहे. इतिहासाबाबत अभ्यासाच्या पद्धतीनेच वादविवाद झाले पाहिजेत, तेथे आंदोलनाला स्थान असू नये, असे मत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी व्यक्त केले.

पराग टोपे लिखित 'तात्या टोपेज् ऑपरेशन रेड लोटस' या ग्रंथाचे प्रकाशन भारत इतिहास संशोधक मंडळाचे चिटणीस डॉ. श्री. मा. भावे यांच्या हस्ते झाले.

पुरंदरे म्हणाले, इतिहासाच्या नव्या दृष्टिकोनातून पराग टोपे यांनी हा ग्रंथ लिहिला आहे. इतिहासात मतभेद असणे स्वाभाविक आहे. इतिहासातील घटना म्हणजे मानवी जीवनाचा क्रम. त्यात एखादा विरोधी पुरावा मिळू शकतो. मात्र, त्याचा अभ्यास हा अभ्यासकाच्या भूमिकेतूनच झाला पाहिजे. १८५७ च्या समराला बंड, शिपाईगर्दी किंवा फसलेला उठाव म्हणणे अन्यायाचे ठरेल, ते स्वातंत्र्य समरच होते.

बलकवडे म्हणाले, तात्या टोपे यांच्याविषयीच्या काही कागदपत्रांचा अभ्यास करून १८५७ च्या उठावाची कारणमीमांसा करून या विषयाला नव्याने चालना

**३री आवृत्ती**

## सुंदर मन

**एडवर्ड डी बोनो** अनु. सुभाष जोशी

आपल्या सर्जनशील विचार सामर्थ्यांनी आपलं व्यक्तिमत्व अधिक आकर्षक करण्यासाठी हे पुस्तक जरुर वाचा.

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

देण्याचा प्रयत्न स्वागतार्ह आहे. इंग्रजांनी इतिहासाला विद्रूप करण्याचा प्रयत्न केला व काही स्वकीय इतिहासकारही त्याला बळी पडले. त्यामुळे आपला इतिहास अजूनही अपूर्ण आहे. १८५७ बाबत नव्या पद्धतीने अभ्यास झाला पाहिजे.

लेखक पराग टोपे यांनी ग्रंथामागील भूमिका स्पष्ट केली. तात्या टोपे यांचे कार्य लोकांसमोर नेणे हा या ग्रंथाचा उद्देश आहे. इंग्रजांनी आपले महत्त्व वाढविण्यासाठी व दहशत बसविण्यासाठी चुकीचा इतिहास लिहिला. तात्या टोपे यांच्या रणनीतीला इंग्रजांनी इतिहासात योग्य स्थान दिले नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले.

### * सर्कसपटू दामू धोत्रे यांचे पुण्यात स्मारक हवे

सर्कस क्षेत्रात जागतिक स्तरावर महाराष्ट्राचे व देशाचे नाव उंचावणारे सर्कसपटू दामू धोत्रे यांच्या कार्याची माहिती नव्या पिढीला व्हावी, यासाठी त्यांचे पुण्यात स्मारक व कायमस्वरूपी सर्कस संग्रहालय व्हावे अशी मागणी 'दामू धोत्रे प्रतिष्ठान'तर्फे महाराष्ट्र दिनानिमित्त करण्यात आली आहे. अध्यक्ष आनंद धोत्रे म्हणाले, ''दामू धोत्रे मूळचे पुण्याचे. त्यांचा जन्म ३१ ऑगस्ट १९०२ रोजी पुण्यात झाला. घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे त्यांनी सर्कशीत प्रवेश केला. त्यांचे मामा श्री. शेलार यांची सर्कस त्या वेळी पुण्यात होती. सुरवातीला छोट्या-छोट्या खेळानंतर त्यांची वाघ, सिंह अशा प्राण्यांशी जणू दोस्तीच झाली. तरुण वयातच ते रिंगमास्टर झाले. त्यांनी सिलोन, बँकॉक, पेनांग, चीन, ब्रह्मदेश, इंडोनेशिया, फ्रान्स, अमेरिका आदी देशांचा दौरा केला. जगप्रसिद्ध 'रिंगलिग ब्रदर्स ॲण्ड बर्नुस ॲण्ड बेली म्युझियम'मध्ये धोत्रे यांचे पुतळे व साहित्य जतन करून ठेवण्यात आले आहे. १९५१ मध्ये ते भारतात परतले व पुण्यातील सुभाषनगरमध्ये राहिले. यासाठी त्यांचे स्मारक पुण्यात व्हावे अशी आमची मागणी आहे.''

### * अभ्यासपूर्ण साहित्याचा चिरकाल उपयोग

ज्ञानदा, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा व गरवारे महाविद्यालयाचा हिंदी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात डॉ. ओमप्रकाश शर्मा लिखित 'शैलीकार डॉ. शंकर पुणतांबेकर', तसेच डॉ. इंद्रजित राठोड लिखित 'गोविंद मिश्र का कथा साहित्य' या पुस्तकांचे प्रकाशन झाले. याप्रसंगी महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेचे कार्याध्यक्ष प्राचार्य सु. मो. शाह, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीकांत गुप्ता, हिंदी विभागाध्यक्ष शैलजा मांडके, 'ज्ञानदा' संयोजक प्रा. नीला बोरवणकर उपस्थित होत्या.

डॉ. शंकर पुणतांबेकर यांच्या विनोदी लेखनात भीतीचे वातावरण दिसते, असे मत ज्येष्ठ हिंदी साहित्यकार डॉ. दामोदर खडसे यांनी व्यक्त केले.

प्राचार्य सु. मो. शाह म्हणाले, सखोल अभ्यास, चिंतन, बारकाव्यांचे संशोधन हे टप्पे पूर्ण करून लेखन करणारा लेखक परिपूर्ण ठरतो. त्याचे साहित्य टिकते. डॉ.

ओमप्रकाश शर्मा आणि डॉ. राठोड यांची पुस्तके तरुणांना मार्गदर्शक ठरतील.

चव्हाण म्हणाले, 'डॉ. इंद्रजित राठोडांनी संशोधन प्रक्रियेनुसार 'गोविंद मिश्र का कथा साहित्य' या विषयावर संदर्भग्रंथ सिद्ध केला आहे.'

डॉ. राठोड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रा. नीला महाडिक यांनी सूचसंचालन केले. प्रगती प्रकाशनचे जिग्नेश फुरिया व शैलजा प्रकाशनचे रामेंद्र तिवारी यांचा सत्कार करण्यात आला.

### * आत्मचरित्रांचे ग्रंथालय

अतुलनीय कार्य करणाऱ्या महान व्यक्तींची आत्मचरित्रे आणि चरित्रग्रंथ वाचकांना सहज उपलब्ध व्हावे यासाठी एक स्वतंत्र ग्रंथालय सुरू करण्यात येणार आहे. तरुणवर्गाला देश-विदेशांतील महान व्यक्तींबद्दल अपवादानेच माहिती असते. चरित्र अथवा आत्मचरित्रग्रंथही वाचनासाठी मिळू शकत नाहीत. अशोक शेटे आणि त्यांच्या मित्र परिवाराने थोर व्यक्तींची चरित्रे आणि आत्मचरित्रे यासाठी स्वतंत्र ग्रंथालय सुरू करण्याचा संकल्प सोडला आहे. ५०० ग्रंथ जमल्यानंतर हे ग्रंथालय सुरू होईल. आपल्याजवळील चरित्रात्मक ग्रंथ या ग्रंथालयास भेट म्हणून द्यावयाचे असतील त्यांनी ते न्यू इंडिया स्टाफ क्वार्टर्स, बी-८,१६ ए, सी. डी. बरफीवाला मार्ग, अंधेरी (प.) मुंबई ४०० ०५८ या पत्त्यावर पोचवावेत. ग्रंथ पाठविण्याचा खर्च देण्यात येणार नाही. अधिक माहितीसाठी अशोक शेटे यांच्याशी ९८२०३४९४९५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

### * जागतिक पुस्तक दिनानिमित्त कार्यक्रम

पुणे महानगरपालिका सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने जागतिक पुस्तक दिनानिमित्त २३ एप्रिल रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक विलास वाघ यांच्या हस्ते झाले. यावेळी विश्रामबाग विभागाचे आरोग्य निरीक्षक श्रीनिवास गुंजीकर, प्रदीप बोराटे, वाचनालयाचे अध्यक्ष अनिल अगावणे, पियुष शहा, योगेश वराडे, ललितकुमार अगावणे, राजेंद्र घोलप, अर्जुन आदमाने व प्रमोद गोखले उपस्थित होते. यावेळी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, जयंतराव टिळक व अशोक गांधी यांना स्मृतिदिनानिमित्त आदरांजली वाहण्यात आली.

### * 'चांगल्या कविता समाजाला वास्तवाचे भान करून देतील'

कवींनी समाजाच्या समस्यांबाबत जागरुक राहायला हवे. त्यातूनच चांगल्या कविता जन्माला येऊन त्या समाजाला वास्तवाचे भान करून देतील, असे मत कवी रामदास फुटाणे यांनी व्यक्त केले.

बंगलोरच्या नवोदित कवयित्री अनघा तांबोळी यांच्या 'भेळ' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन फुटाणे यांच्या हस्ते झाले.

*** साहित्य महामंडळाचे कार्यालय मुंबईत**

अखिल भारतीय मराठी साहित्य वर्षांसाठी महामंडळाचे कार्यालय ३ वर्षांसाठी मुंबई मराठी साहित्य संघ या घटक संस्थेकडे आले आहे. प्रा. उषा तांबे यांची महामंडळाच्या अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. डॉ. उज्वला मेहेंदळे आणि गुरुनाथ दळवी हे अनुक्रमे कार्यवाह आणि कोषाध्यक्ष म्हणून काम पाहणार आहेत.

प्रा. तांबे यांनी विविध महाविद्यालयांतून गेली अनेक वर्षे इंग्रजीचे अध्यापन केले असून 'एसएनडीटी' महिला विद्यापीठातून त्या निवृत्त झाल्या आहेत. डॉ. मेहेंदळे या गेली १५ वर्षे मुंबई मराठी साहित्य संघाच्या सदस्या आहेत. तर दळवी यांनी एल. एस. रहेजा स्कूल ऑफ आर्किटेक्चरमध्ये प्राचार्य आणि संचालक म्हणून काम पाहिले आहे.

*** साहित्य संस्थांचे नेतृत्व तरुणांकडे द्या**

राज्यातील सर्वच मराठी साहित्य संस्थांतील व्यवहार पन्नाशीच्या आतील लेखकांकडे सोपवावे, असे आवाहन प्रवीण बर्दापूरकर यांनी द्वितीय ग्रंथोदय पुरस्कार वितरण प्रसंगी केले. प्रवीण बर्दापूरकर म्हणाले, महाराष्ट्रातील मराठी साहित्य संस्थांचे व्यवहार ज्यांच्या हाती केंद्रित झाले आहेत. त्यांच्याबद्दल सर्वांच्या मनात अविश्वासाची भावना निर्माण झाली आहे. बदलत्या जगाचे भान या नेतृत्वाला राहिले नसून साहित्य संस्थांतील व्यवहार पारदर्शी असण्याऐवजी पोलादी भिंतीआड बंदिस्त करण्यात आले आहेत. त्यामुळे साहित्य व्यवहाराचा सर्वसामान्य रसिकांशी संबंध तुटला असून साहित्याची चळवळ क्षीण झाली आहे. बदलत्या जगाचे भान येण्यासाठी या संस्थांचे व्यवहार तरुणांच्या हाती सोपवण्याची वेळ आली आहे.

निवडणूक प्रक्रियेत भाग घेऊन विद्यमान नेतृत्वाला पदावरून दूर करता येईल,




**शांततेनं काम करा!**

**पॉल विल्सन** अनु. सुनंदा अमरापूरकर

रोजच्या रुटीन वर्कमधील तोचतोपणा
घालवण्यासाठीचे सोपे उपाय...

**२४०रु. पोस्टेज २५रु.**

असा सल्ला देऊन विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर म्हणाले, नेतृत्व सोडा म्हटल्याने कोणी नेतृत्व सोडत नसते.

*** जंगली महाराजांचे जीवनकार्य रुपेरी पडद्यावर**

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री सद्‌गुरू जंगली महाराज यांच्या जीवनकार्याचा वेध घेणारा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. रामचंद्र धुमाळ हे जंगली महाराजांची व्यक्तिरेखा साकारणार असून, शेखर नाईक दिग्दर्शन करणार आहेत.

चार एप्रिल १८१० रोजी पुण्यातील शिवाजीनगर (तेव्हाचे भांबुर्डे) भागातील रोकडोबा मंदिर येथे सद्‌गुरू जंगली महाराजांनी समाधी घेतली. या घटनेला १२० वर्षे पूर्ण होत असताना त्यांच्या जीवनाचा वेध घेणारी कलाकृती साकार होत आहे. चित्रपटाचे साठ टक्क्यांहून अधिक चित्रीकरण झाले आहे. कैलास थोपटे निर्माते आहेत. धुमाळ यांच्यासह रमेश मेढेकर, सायली रवींद्र आणि प्रशांत तपस्वी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. संदीप धर्माधिकारी यांच्या गीतांना माधुरी अशिरगडे यांनी संगीत दिले आहे.

नाईक म्हणाले, ''लहानपणी अभ्यासासाठी जंगली महाराज आणि पाताळेश्वर मंदिरात जात असे. येथील रस्त्याला जंगली महाराजांचे नाव देण्यात आले आहे. पण त्यांच्याविषयी फारशी माहिती नाही त्यामुळे चित्रपट निर्मिती करण्याचे ठरविले. चित्रकार डी. डी. रेगे यांनी लिहिलेले पुस्तक वाचून महाराजांचे वास्तव्य असलेल्या दक्षिण सोलापुरातील होनमुर्गी, अहिरवाडी, कर्नाटकातील जमखंडी, कुरुंदवाड, नृसिंहवाडी, देहू वगैरे ठिकाणांना भेट दिली. अशा संतांचे चरित्र नव्या पिढीला प्रेरणा देईल.''

*** वसंतराव देशपांडे चौक**

पुणे महापालिकेच्या वतीने कमला नेहरू पार्कसमोरील चौकाचे वसंतराव देशपांडे चौक असे नामकरण अभिनेते प्रभाकर पणशीकर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी अभिनेते दिलीप प्रभावळकर, सुबोध भावे, गायक संजीव अभ्यंकर, नृत्यकलाकार मनीषा साठे, उपेंद्र भट, शैला दातार, बापू देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन नगरसेवक विकास मठकरी यांनी केले होते.

पणशीकर म्हणाले, ''वसंतरावांचे नाव केवळ चौकाला देऊन थांबू नका, त्यांच्या स्मृतीला उजाळा देण्यासाठी कमला नेहरू पार्कमध्ये त्यांचे संगीत ऐकण्याची नियमित व्यवस्था केली पाहिजे.''

## * कान महोत्सवात 'बांगड्या'

'बांगड्या' नावाचा लघुपट कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये १२ ते २३ मे दरम्यान जागतिक स्तरावर प्रदर्शित झाला. दिग्दर्शक केदार जपे यांचा हा पहिलाच लघुपट आहे. तो सोळा मिनिटांचा आहे.

चिंगी या लहानगीला बांगड्यांशी खेळायला आवडते. तिचे वडील आत्महत्या करतात. काही दिवसांनी तिच्या आईच्या मनातही आत्महत्येचे विचारचक्र घुमायला लागते. या विचारापासून आईला परावृत्त करण्याचा चिंगीचा संघर्ष आणि त्यातून उलगडणारे आत्महत्येचे दाहक सत्य, अशी या लघुपटाची कथा आहे. कर्जाच्या बोजाखाली दबलेले शेतकरी कुटुंब आणि परिणामी, आत्महत्येचा प्रयत्न, कर्तासवरता गेल्याने उजाड झालेले घर, जगण्याची त्यांची धडपड... या गोष्टी चित्रपटांमधून प्रदर्शित झाल्या. काही चर्चा मर्यादितच राहिल्या. पण, 'बांगड्या' मधून आशावाद दाखवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. कुटुंबाचे रंगहीन आयुष्य दाखवण्यासाठी हा लघुपट मुद्दाम ब्लॅक ॲण्ड व्हाइट ठेवण्यात आला आहे, छायाचित्रकार हर्षल शिपोसकर आणि एडिटर प्रशांत बोरकर यांनी हे आव्हान लीलया पेलले आहे.

मंगळवेढ्याजवळील धरमगाव येथे या चित्रपटाचे शूटिंग झाले. मैथिली कदम, मधुगंधा कुलकर्णी, मनोज आचार्य आणि हितेंद्र उपासनी यांच्या यामध्ये प्रमुख भूमिका आहेत.

## * खेड साहित्य संमेलन

''एकमेकांची सुखदु:खे वाटून घेणे म्हणजेच मानवी जीवन. संहारक शक्तींचा प्रभाव वाढत असताना साहित्यातील नैसर्गिकता जपून भवतालच्या वास्तवाशी आपली नाळ कायम ठेवणे हेच खरे साहित्य आहे,'' असे प्रतिपादन तिसऱ्या रत्नागिरी जिल्हा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. अनिल अवचट यांनी खेड येथे केले.

२४ आणि २५ एप्रिल रोजी कोमसापचे तिसरे रत्नागिरी जिल्हा साहित्य संमेलन खेड येथे साजरे झाले.

'निसर्ग, माणूस आणि साहित्य' या विषयावर झालेल्या चर्चेत सुरेखा दळवी, डॉ. मिलिंद कुलकर्णी, राजेंद्र केरकर, अभिजित हेगशेट्ये यांनी भाग घेतला. कोकणातला प्रसन्न निसर्ग साहित्यातून हरवत चालला आहे. प्रत्यक्षात त्याचा संहार होत आहे, हा निसर्ग प्रसन्न रहावा यासाठी 'निसर्ग आणि साहित्य' हे सत्र घेतल्याचे डॉ. महेश केळुसकर यांनी सांगितले.

गंगाराम गवाणकर यांनी 'वस्त्रहरण' नाटकाच्या कालावधीतले किस्से सांगून हास्याची मेजवानी दिली. 'मराठी पाऊल अडते कुठे' या परिसंवादात दिनकर गांगल,

प्रा. अशोक बागवे, सोमनाथ कोमरपंत, प्रा. सुहास बारटक्के यांनी आपले विचार मांडले. तरुण संगीतकार आणि गायक कौशल इनामदार यांच्या मैफलीनंतर संमेलनाचा समारोप झाला.

*** निनाद बेडेकर यांचा सत्कार**

'साठाव्या वर्षी साठ दुर्ग' हा संकल्प पूर्ण केल्याबद्दल इतिहास संशोधक निनाद बेडेकर यांचा गोनीदा दुर्गप्रेमी मंडळातर्फे सिंहगडावर शिबिरातंर्गत कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. या शिबिरात डॉ. जयंत नवरंगे यांचे 'आरोग्य विचार', निनाद बेडेकर यांचे 'कवी भूषण' तर इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांचे 'शिवकालीन दुर्ग' या विषयांवर व्याख्यान झाले. या वेळी डॉ. विजय देव, डॉ. वीणा देव, मुकुंद गोंधळेकर, शेखर नानिवडेकर, आनंद देशपांडे, अभिजित बेल्हेकर, मोहन शेटे, रवींद्र यादव, कुलदीप देसाई, मनोज भांगरे, श्रद्धा तिसगावकर आदी उपस्थित होते.

*** किल्ले आणि निसर्ग परिचय अभ्यासक्रम**

स्वस्तिश्री हॉबीज संस्थेतर्फे किल्ले आणि निसर्ग परिचय अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या अभ्यासक्रमात किल्ले, मंदिरे, लेणी याबरोबरच आकाशदर्शन, पशू-पक्षी, वनस्पती आदी निसर्ग घटकांचाही समावेश होता. ऐतिहासिक वास्तू आणि नैसर्गिक घटकांचा शास्त्रोक्त अभ्यास, जतन-संवर्धनाचे महत्त्व आणि प्रत्यक्ष दर्शन असे या अभ्यासक्रमाचे स्वरूप होते. यासाठी डॉ. गो. बं. देगलुरकर, निनाद बेडेकर, अरविंद परांजपे, डॉ. सतीश पांडे, प्रा प्र. के. घाणेकर, प्रमोद मांडे, महेश तेंडुलकर, डॉ. आनंद पाध्ये, डॉ. मंदार दातार, डॉ. अमित म्हेत्रे यांनी मार्गदर्शन केले. हा अभ्यासक्रम ३ ते ३१ मे दरम्यान आठवड्यातून तीन दिवस घारपुरे प्रशाला, सरस्वती मंदिर संस्था येथे घेण्यात आला.

*** 'ग्रंथसरिता' उपक्रमाचे उद्‌घाटन**

'ग्रंथसरिता' या 'ग्रंथाली'च्या फिरत्या पुस्तक विक्री उपक्रमाचे औपचारिक उद्‌घाटन राज्यपाल के. शंकरनारायण यांनी राजभवन येथे केले. मैत्रेय प्रकाशन, ग्रंथाली आणि साहित्ययात्रा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ग्रंथसरिता' संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा करणार आहे. सुमारे ५००० विविध पुस्तके ग्रामीण भागात 'ग्रंथसरिता'च्या माध्यमातून पोहोचणार आहेत. अलिबागपासून सावंतवाडी, गोवा, बेळगाव आणि कोल्हापूर असा पहिला टप्पा 'ग्रंथसरिता'ने २६ मे रोजी पूर्ण केला, असे अरविंद जोशी, शैलेश वाजा आणि सुदेश हिंगलासपूरकर यांनी सांगितले.

'ग्रंथाली'च्या वतीने दिलीप चावरे यांनी राज्यपालांचे स्वागत करून त्यांना 'ग्रंथसरिता' उपक्रमाची माहिती दिली. या उपक्रमाची प्रशंसा करताना शंकरनारायण

म्हणाले की, ग्रामीण जनतेला रास्त दरात पुस्तके उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. त्यास सक्रिय शुभेच्छा म्हणून राज्यपालांनी 'ग्रंथाली'च्या पुस्तकांचा १५ हजार रुपयांचा पहिला संच खरेदी केला.

'ग्रंथाली'तर्फे श्रीमती लतिका भानुशाली यांनी राज्यपालांना 'ज्ञानेश्वरी'ची इंग्रजी प्रत भेट दिली. ज्ञानेश्वरीतील काही श्लोकांचा मल्याळम भाषेत अनुवाद झाल्याची आठवण याप्रसंगी राज्यपालांनी बोलून दाखवली.

याप्रसंगी सर्वश्री शिरीष वीरकर, अरुण जोशी, धनंजय गांगल, विनायक गोखले आणि मनोज आचार्य उपस्थित होते.

### * राजधानीत महाराष्ट्र सुवर्णमहोत्सव

महाराष्ट्रातील समावेशासाठी आर्त हाक देणाऱ्या सीमावासीयांच्या व्यथांकडे आपण लक्ष दिले पाहिजे, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी सीमावासीयांच्या भावनांना दिल्लीत वाचा फोडली. मराठी बांधवांनी लढून मिळविलेला महाराष्ट्र एकसंध राखण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न केले पाहिजेत, असे सूचक आवाहन करून त्यांनी वेगळ्या विदर्भाच्या हालचालींचा राष्ट्रपतींच्या उपस्थितीतच समाचार घेतला.

या सोहळ्यात 'विक्रमादित्य' सचिन तेंडुलकर, हवाईदलप्रमुख पी. व्ही. नाईक, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, अभिनेते नाना पाटेकर वगैरे मराठी मातीतील 'नवरत्नांना' शाल, सन्मानचिन्ह व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. राष्ट्रपतींच्या हस्ते वरील मान्यवरांसह उद्योजक अतुल किर्लोस्कर, साहित्यिक मधू मंगेश कर्णिक. संगीतकार यशवंत देव, माजी हवाईदलप्रमुख अनिल टिपणीस यांचाही सत्कार करण्यात आला. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी भाषणात महाराष्ट्राने गेल्या पन्नास वर्षांत केलेल्या प्रगतीचा आढावा घेतला. 'आध्यात्मिक लोकशाही' दृढमूल केलेल्या महाराष्ट्राने अलीकडे दहशतवाद्यांशी लढताना जी इच्छाशक्ती, करारीपणा दाखवला, त्याचेही त्यांनी कौतुक केले.

मावळंकर सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे, अवजड उद्योगमंत्री विलासराव देशमुख, खासदार सुप्रिया सुळे, राज्यमंत्री गुरुदास कामत, माजी मंत्री वसंत साठे, डॉ. देवीसिंह शेखावत, राज्यपाल शिवराज पाटील, डी. वाय. पाटील, मुरलीधर भंडारे अशा मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

### * सुरभी वाचक मंच

'भारतीय स्त्री शक्ती जागरण' संचालित वारजे येथील 'सुरभी वाचक मंचा'ला १२ जानेवारी २०१० रोजी पाच वर्षे पूर्ण झाली. सुमनताई कुंटे यांनी अवघ्या आठ सदस्यांनिशी सुरू केलेला हा उपक्रम अल्पावधीत लोकप्रिय झाला. वाचनाची,

साहित्याची आवड असणाऱ्या या स्त्रिया दर गुरुवारी ४ ते ५ या वेळात एकत्र जमतात. कथा, कादंबऱ्या, नाटके, कविता, मासिके, वर्तमानपत्रातील वैशिष्ट्यपूर्ण लेख यावर चर्चा करतात.


८ मार्चच्या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सुरभी वाचक मंचाने श्रीमती पुष्पाताई वागळे यांचा सत्कार केला. वाचक मंचाच्या वृंदाताई दिवाण आणि अरुणाताई गोखले या पुरस्कारप्राप्त सदस्यांचाही सत्कार करण्यात आला.

*** अशोक पत्की यांची मुलाखत**

'केतकीच्या बनी तिथे नाचला गं मोर', 'राधा ही बावरी', 'टांग टिंग टिंगा', 'तू सप्तसूर माझे' यांसह विविध मालिकांची शीर्षकगीते आणि जिंगल अशा सादरीकरणातून ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की यांनी आपला चार दशकांचा संगीत प्रवास उलगडून दाखवला.

डी. एस. कुलकर्णी फाउंडेशनतर्फे आयोजित 'जिंगल्स ते सिनेमा' या गप्पांच्या कार्यक्रमात पत्की यांच्याशी राजेश दामले आणि मिलिंद कुलकर्णी यांनी संवाद साधला. मधुरा दातार यांनी गायनाची, तर अजय धोंगडे यांनी तबल्याची साथ केली. पत्की म्हणाले, ''लहानपणापासून मला संगीताची आवड होती, पण संगीतकार मात्र मी योगायोगाने झालो. गिरगाव येथे आमच्या घराशेजारीच सुधीर फडके हे 'पेइंग गेस्ट' म्हणून राहत असत. आई दळण आणायला जाताना मला त्यांच्याकडे सोडायची. त्या वेळी त्यांच्या संगीताचे संस्कार माझ्यावर झाले. 'सुमन कल्याणपूर यांचा पेटीवाला' ही माझी ओळख झाली. पुढे जितेंद्र अभिषेकी यांच्या सहवासात मला खूप शिकायला मिळाले. चित्रपट संगीत, नाट्य संगीत, मालिकांची टायटल साँग्ज, जिंगल यांसह 'मोरूची मावशी', 'ब्रह्मचारी' या नाटकांनी मला नाव दिले.''

विविध कलाकारांबरोबर काम करताना आलेले अनुभव सांगताना पत्की म्हणाले, ''कलाकाराने केवळ पैशांसाठी काम करू नये. पैसे येतात आणि जातात, पण स्वत:ला छान वाटते आणि आनंद मिळतो म्हणून आपण काम केले तर त्याचे समाधान चिरकाल राहते.''


**द मॅजिक ऑफ थिंकींग बिग**

४थी आवृत्ती

**डेव्हिड जोसेफ श्वार्झ** अनु. प्रशांत तळणीकर

उच्च ध्येये गाठण्यासाठी तुमचे बोट धरून
नेणारा महान मार्गदर्शक

**२००रु. पोस्टेज ३०रु.**

## * रिक्षा, एसटी प्रवाशांना आता एसएमएसद्वारे तक्रार करता येणार

खासगी व शासकीय प्रवासी वाहतुकीचा बेलगाम कारभार आणि त्यातील ढिसाळ यंत्रणेमुळे प्रवाशांना अनंत अडचणींना सामोरे जावे लागते. तक्रार कोणाकडे करायची म्हणून अनेकजण दुर्लक्ष करतात. आता प्रवाशांना आपली तक्रार एसएमएसद्वारे मोबाईलच्या माध्यमातून करणे शक्य होणार आहे. ग्राहक पंचायतीने राज्यात प्रथमच हा उपक्रम सुरू केला आहे. ग्राहकांना ९५९५९५२८०६ या क्रमांकावर तक्रार नोंदवता येईल. अंमलबजावणी दोन दिवसांत होईल. रिक्षांतून प्रवास करताना मीटार चालू नसल्याने रिक्षाचालक जास्तीचे भाडे घेऊन लुबाडणूक करतात. याबाबत प्रवासी अनेक वेळा नाराजी व्यक्त करतात. मात्र, या रीतसर तक्रार कोणाकडे करायची याची माहिती नसल्याने अडचण होते. सध्या मोबाईलचे युग आहे. त्या दृष्टिकोनातून एसएमएसद्वारे तक्रार नोंद करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

## * 'कोण आहे रे तिकडे'

हिंदी चित्रपटसृष्टीतील मोठमोठ्या कॉर्पोरेट कंपन्या मराठी चित्रपटांची निर्मिती आणि वितरण करीत आहेत. हिंदीमध्ये वीसहून अधिक चित्रपटांसाठी कार्यकारी निर्माते म्हणून जबाबदारी सांभाळणारे शैजू नंबिदाथ आणि रमेश शर्मा 'कोण आहे रे तिकडे' या मराठी चित्रपटाचे सादरकर्ते बनलेले आहेत. शैजू आणि रमेश यांची 'कॅट-न-माऊस' नावाची कंपनी आहे. हिंदीमध्ये त्यांना 'वैसा भी होता है - पार्ट २', 'क्विकगन मुरगन' अशा काही चित्रपटांसाठी कार्यकारी निर्माते म्हणून जबाबदारी सांभाळली होती. निर्माता दीपक भोसले यांच्या 'कोण आहे रे तिकडे' या चित्रपटाचे ते वितरक आहेत. भविष्यात मराठी चित्रपटाची निर्मिती करण्याची त्यांची इच्छा आहे. 'कोण आहे रे' या चित्रपटाचे दिग्दर्शन तानाजी घाडगे यांनी केले. अरविंद जगताप यांनी कथा, पटकथा, संवादलेखन व गीतलेखन यांची जबाबदारी उचलली आहे.

## * प्राज्ञ पाठशाळेचा 'धर्मकोश प्रकल्प'

वाई येथील प्राज्ञ पाठशाळेच्या धर्मकोश प्रकल्पासाठी वेदाचार्य घैसास गुरुजी वेदपाठशाळेशी सामंजस्य करार करण्यात आला असून, उर्वरित खंडांमध्ये संस्कृतबरोबरच हिंदी आणि इंग्रजीतून माहिती देण्यात येणार आहे.

प्राज्ञ पाठशाळेतर्फे धर्मकोश आणि विश्वकोश असे दोन महत्त्वाकांक्षी प्रकल्प चालू आहेत. स्वामी केवलानंद सरस्वती यांनी १९२५ मध्ये धर्मकोश प्रकल्पाची सुरुवात केली. याअंतर्गत व्यवहारकांड, उपनिषत्कांड, संस्कारकांड, राजनीतिकांड, वर्णाश्रम धर्मकांड, शुद्धिश्राद्धकांड, प्रायश्चित्तकांड, शांतिकांड, पुराणागमधर्मकांड, समयकांड आणि मोक्षकांड अशा अकरा कांडांमध्ये ४० खंडांच्या प्रकल्पाचे नियोजन

करण्यात आले. यापैकी पहिल्या चार कांडांचे काम पूर्ण झाले असून, पाचव्या कांडाचे चार भाग मिळून आतापर्यंत २३ खंडाचे काम झाले आहे. संस्थेचा विश्वकोश प्रकल्प महाराष्ट्र सरकारचा असून, त्यासाठी सरकारचे अनुदान प्राप्त होत आहे. मात्र धर्मकोश प्रकल्प केवळ खासगी देणग्यांच्या आधारे केला जात आहे.

वेदमूर्ती मोरेश्वर घैसास गुरुजी म्हणाले, ''न्याय, शास्त्र, वेदान्त याची जाण असणारे विद्वान मदतीला घेऊन वर्षाला किमान दोन खंड याप्रमाणे हा प्रकल्प पूर्ण करण्याचा मानस आहे.''

प्राज्ञ पाठशाळेच्या अध्यक्षा डॉ. सरोजा भाटे म्हणाल्या, ''या प्रकल्पासाठी वेदान्ती पंडित दुर्मिळ झाले आहेत. त्याचप्रमाणे आर्थिक चणचणदेखील भासत आहे. समान उद्दिष्ट असलेल्या दोन संस्थांच्या एकत्रित प्रयत्नांतून हा प्रकल्प गतिमान करण्याच्या उद्देशातूने सामंजस्य करार केला आहे. हिंदी आणि इंग्रजी अनुवादाचा समावेश करून आगामी दहा वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहे.''

### * 'गजानन विजय' ग्रंथ पोहोचला सातासमुद्रापार

गजानन महाराजांच्या समाधी शताब्दीच्या निमित्ताने देशविदेशातून लाखोंच्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत आहेत. दर्शनासोबतच संत दासगणू विरचित 'श्री गजानन विजय' ग्रंथाचे पारायण केले जाते. शताब्दीच्या निमित्ताने संस्थानने या ग्रंथाची विशेष आवृत्ती काढली आहे. ५५ रुपये किंमत असलेल्या या आवृत्तीच्या ५० हजार प्रती छापल्या आहेत. विशेष म्हणजे ग्रंथाचे इंग्रजीसह तेलगू, कानडीमध्येही अनुवाद झालेले आहेत.

संस्थानने १९३९ मध्ये पुण्यात गजानन विजय ग्रंथाची छपाई केली. त्या वेळी केवळ दोन हजार प्रती छापल्या होत्या. त्यानंतर मराठी भाषेतील प्रतींची विक्री १४ लाखांवर झाली आहे. १९ रुपये किमतीचा छोटा ग्रंथ, आणि ३५ रुपये किमतीचा रंगीत छायाचित्रे असलेला ग्रंथ लोकप्रिय आहे. या ग्रंथाने १३ लाखांचा आकडा पार केला आहे. गुजराथी, हिंदी भाषेतील अनुवादालाही मोठी मागणी आहे.

'श्रीं'चे भक्त जसे देशात आहेत, तसेच परदेशातही आहेत. भारतातील विशेषत: महाराष्ट्रातील हजारो भाविक अनेक देशांत वास्तव्याला आहेत. त्यांना मराठी येत असल्याने ते मराठी ग्रंथाचे पारायण करतात. मात्र, त्यांची मुले व ज्यांना धार्मिक आस्था आहे अशी त्यांची मित्रमंडळी इंग्रजी गजानन विजयचे पारायण करतात. इंग्रजीच्या प्रतींची विक्री २५ हजारांवर झालेली आहे. दासगणूंच्या ओव्या सोप्या इंग्रजीमध्ये जी. एन. नाईक यांनी अनुवादित केल्या आहेत.

### * 'शककर्ते शिवराय'ची आवृत्ती

नागपूर येथील छत्रपती सेवा प्रतिष्ठानतर्फे शिवचरित्रकार विजयराव देशमुख

ऊर्फ सद्‌गुरूदास लिखित 'शककर्ते शिवराय' या द्विखंडात्मक शिवचरित्राची नवी आवृत्ती सव्वीस वर्षानंतर प्रकाशित होत आहे. त्याचबरोबरीने देशमुख लिखित 'महाराजांच्या मुलखात' हे दुर्मिळ पुस्तकही निघणार आहे. सुमारे ११५० पृष्ठांच्या दोन खंडांतील या चरित्रामध्ये अनेक दुर्मिळ रंगीत छायाचित्रे, तसेच नकाशे समाविष्ट आहेत.

हे शिवचरित्र १९८२ मध्ये प्रकाशित झाले. शेकडो दुर्मिळ साधने, बखरी, कागदपत्रे, शिलालेख आणि ताम्रपटांचे कसून अध्ययन करून, त्याचप्रमाणे शिवचरित्राशी संबंधित भौगोलिक स्थानांना प्रत्यक्ष भेट देऊन संशोधनातून 'शककर्ते शिवराय' सिद्ध झाले. इतिहास संशोधक प्रा. ग. ह. खरे, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, गो. नी. दांडेकर आणि समाजविज्ञानकोशकर्ते स. मा. गर्गे यांनी या शिवचरित्राची प्रशंसा केली आहे. प्रकाशनपूर्व नोंदणी - अजय देशमुख (९८८११४१८२५)

*** हार्वर्ड बिझनेस स्कूलचा पहिला भारतीय अधिष्ठाता**

जगप्रसिद्ध 'हार्वर्ड बिझनेस स्कूल'च्या १०२ वर्षांच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच या संस्थेच्या अधिष्ठातापदी एका भारतीय वंशाच्या व्यक्तीची, नितिन नोहरिया यांची निवड झाली असून १ जूनपासून ते आपल्या पदाची सूत्रे हाती घेणार असल्याचे 'हार्वर्ड बिझनेस स्कूल'चे अध्यक्ष ड्र्यू फाऊस्ट यांनी सांगितले. नोहरिया यापूर्वी वरिष्ठ सहाय्यक अधिष्ठातापदी कार्यरत होते. १९८८ पासून ते या संस्थेत आहेत. विद्यमान अधिष्ठातापदावर असणाऱ्या जय लाईट यांनी गेल्या वर्षी आपल्या निवृत्तीची घोषणा केली. त्यामुळे नोहरिया यांची निवड झाली. नितिन नोहरिया हार्वर्ड बिझनेस स्कूलला आणखी प्रगतीशील बनविण्यात यशस्वी होतील, असा विश्वास फाऊस्ट यांनी व्यक्त केले की, नोहरिया हे जागतिक तोंडवळा असलेले असामान्य विद्वान, हुशार शिक्षक आणि गुरू आहेत. नोहारिया यांनी १९८४ साली आयआयटी मुंबईमधून केमिकल इंजिनिअरिंगमध्ये 'बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी'ही पदवी संपादन केली. १९८८ साली त्यांनी मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या सोलान स्कूल ऑफ मॅनेजमेंटमधून व्यवस्थापन शास्त्रात डॉक्टरेट केली.





**अस्तित्व** (८वी आवृत्ती)

**सुधा मूर्ती** अनु.प्रा.ए.आर. यार्दी

भारतीय संस्कारांची साक्ष देणारी उत्कंठावर्धक कादंबरी

**८०रु. पोस्टेज २०रु.**

## * सर्व भाषांसाठी देवनागरी लिपी स्वीकारा - डॉ. द. भि. कुलकर्णी

''भारतातील सर्व भाषांनी देवनागरी लिपी स्वीकारावी असा प्रचार करण्याची आवश्यकता आहे. पण त्यासाठी आग्रह धरायचा नाही, कारण त्यामुळे आंदोलने होतील,'' असे मत साहित्य संमेलनाध्यक्ष डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या पंधराव्या स्थापनादिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात कुलपती आणि राज्याचे वनमंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या हस्ते विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात, प्राचार्य शिवाजीराव भोसले, पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. श्रीधर गुप्ते, सामाजिक कार्यकर्त्या सिंधूताई सपकाळ आणि ज्येष्ठ समाजवादी विचारवंत राजाभाऊ तुपे यांना 'जीवनसाधना गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

डॉ. द. भि. कुलकर्णी म्हणाले, ''भाषा आणि शब्द सैलपणे वापरल्यानेच विविध गोंधळ निर्माण होतात. ते टाळण्यासाठी सर्व भाषांनी देवनागरी लिपी स्वीकारली पाहिजे. नुकताच मी बेळगाव दौरा केला. तेथील मराठी भाषकांची कुचंबणा होत असल्याचे जाणवले. आंदोलनामुळे सगळेच प्रश्न सुटत नाहीत. तर, त्यासाठी बेळगावमध्ये महाराष्ट्र सदन उभारले पाहिजे. त्यासाठी कोणाच्या परवानगीची गरज नाही आणि त्याला कोणी आक्षेपदेखील घेऊ शकत नाही. महाराष्ट्र सरकारने उभारावे किंवा भारती विद्यापीठासारख्या शिक्षणसंस्थेने हे काम करावे. सुसज्ज ग्रंथालय, अतिथिगृह अशा सुविधा तेथे उपलब्ध कराव्यात. त्यातून त्या भागातील मराठी भाषकांना आपण आधार देऊ शकतो.''

डॉ. थोरात म्हणाले, ''देशात उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण बारा टक्के असले तरी महाराष्ट्रात हेच प्रमाण सतरा टक्के आहे. केरळ, पंजाब, हरियाना ही राज्ये महाराष्ट्राच्या तुलनेत पुढे आहेत. उच्च शिक्षणात महाराष्ट्र प्रगत हे चित्र असले तरी ग्रामीण भागातील फक्त पाच टक्के मुली उच्च शिक्षण घेतात हे वास्तव आहे. हे प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना करून सर्वांना समान संधी देणारी शिक्षणपद्धती विकसित करायला हवी.'' डॉ. शिवाजीराव कदम यांनी प्रास्ताविकात विद्यापीठाच्या वाटचालीचा आढावा घेतला. डॉ. नितीन नायक यांनी आभार मानले. डॉ. ज्योती मंडलिक आणि प्रा. राजेंद्र उत्तुरकर यांनी सूत्रसंचालन केले.

## * प्रवासवर्णनाला पुरस्कार

मराठी प्रवास वर्णन लेखक - वाचक मंचतर्फे जानेवारी २००९ ते डिसेंबर २००९ या कालावधीत प्रकाशित झालेल्या सर्वोत्कृष्ट प्रवासवर्णनात्मक पुस्तकाला गौरविण्याचे ठरविले आहे. स्पर्धेसाठी कोणत्याही तऱ्हेचे शुल्क नाही. रोख रकमेची एकूण तीन पारितोषिके देण्यात येतील.

पुस्तक पाठविण्याचा पत्ता : सौ. सुनंदा कापरे, पहिला मजला, ४ सद्‌गुरू छाया सोसायटी, रामबाग लेन २, कल्याण (प.) ४२१ ३०१. संपर्क - डॉ. सुनिल कवठे, कार्याध्यक्ष- ९८२२०१७५५३

*** 'निरामय सुखी जीवनासाठी हास्ययोग' डीव्हीडीचे प्रकाशन**

'हास्य' हा योगप्रकार असून त्यामुळे शारीरिक व मानसिक स्थिती चांगली राहते. चैतन्य हास्य योग मंडळाने हास्याला एक उंची दिली आहे असे गौरवोद्‌गार जागतिक आरोग्य संघटनेचे माजी संचालक डॉ. गुरुराज मुतालिक यांनी काढले.

चैतन्य हास्य योग मंडळाच्या 'निरामय सुखी जीवनासाठी हास्ययोग' या डीव्हीडीचे प्रकाशन करताना डॉ. सरदेसाई म्हणाले, ''हास्यामुळे मनाची प्रसन्नता वाढते. प्रसन्न मन शरीरात चांगले बदल घडवून आणते. ज्याचे मन प्रसन्न असते, त्याची बुद्धी काम करते. योगाच्या चार पायऱ्या आहेत. पहिली पायरी शरीर आणि मन, दुसरी मन आणि बुद्धी, तिसरी बुद्धी आणि आत्मा, तर चौथी पायरी चैतन्य, ते चराचरामध्ये एकच असते.''

हास्य चळवळीचा प्रचार ५५ देशांत होत आहे. राज्यात अंदाजे पाचशे हास्यक्लब आहेत. विठ्ठल काटे आणि सुमन काटे यांच्या प्रेरणेने चैतन्य हास्ययोग मंडळाची सुरुवात १९९७ साली झाली. या उपक्रमामुळे अनेकांचे मधुमेह, अल्सर, रक्तदाब, हृदयविकार, ताणतणाव, निद्रानाश, गुडघेदुखी, संधिवात इत्यादी विकार आटोक्यात आल्याचे विठ्ठल काटे यांनी सांगितले.

डॉ. नानासाहेब परुळेकर सकाळ चॅरिटी ट्रस्टने उत्तिष्ठत जागृत या मासिकाचा हास्यसंघ विशेषांक प्रसिद्ध केला आहे. त्यात सुमारे दीडशे हास्यसंघांची आणि हास्यप्रकारांची माहिती देण्यात आली आहे.

*** जनहित याचिकांमुळे मूलभूत हक्क अबाधित**

मूलभूत हक्कांविषयी आपल्या देशात कागदोपत्री तरतुदी सर्वांत उत्तम आहेत; पण त्यांची अंमलबजावणी केली जात नाही. उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिकांमुळे हे हक्क अबाधित राहिले आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ वकील व्ही. पी. शिंत्रे यांनी केले.

वक्तृत्वोत्तेजक सभेतर्फे आयोजित वसंत व्याख्यानमालेत बोलताना 'मानवी हक्क आणि जनहित याचिका' या दोन्ही संकल्पना एकमेकांना जवळ असल्याचे सांगून शिंत्रे यांनी राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि कायदेशीर अशा चार प्रकारची आक्रमणे मानवी हक्कांवर होत असल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले, ''मूलभूत अधिकार, नागरी अधिकार आणि मानवी अधिकार एकच आहेत. समानता, अभिव्यक्ती स्वातंत्र्य असे विविध अधिकार घटनेने दिले असले, तरी त्यावर काही बंधनेही घटनेने

घातली आहेत. या हक्कांच्या अंमलबजावणीकरता बाल, महिला, अल्पसंख्याक असे विविध प्रकारचे सात आयोग आपल्या देशात आहेत. यावरून आपल्या देशात मानवी हक्कांच्या तरतुदी कागदोपत्री उत्तम दिसतात; पण त्याची अंमलबजावणी केली जात नाही. या हक्कांची अंमलबजावणी होत नाही म्हणून पुन्हा न्यायालयात जावे लागते हे दुर्दैव आहे.''

''आणीबाणीनंतरच्या काळात आपल्या देशात राजकीय अस्थिरता निर्माण झाली. त्यानंतरच जनहित याचिका दाखल होण्याचे प्रमाण वाढले. मानवी हक्कांवर जी राजकीय अतिक्रमणे झाली ती न्यायव्यवस्थेने हाणून पाडली आहेत. जर जनहित याचिका दाखलच झाल्या नसत्या, तर मानवी हक्कांचे काय झाले असते? काही जनहित याचिकांमध्ये निर्णय देताना न्यायालयाने समतोल साधला आहे. आपल्याकडे जनहित याचिकांचा वापर आणि प्रसार झाल्याने शेजारील पाकिस्तान, नेपाळ आणि दक्षिण आफ्रिकेतील राष्ट्रांतही या जनहित याचिकांचा वापर होऊ लागला आहे. मानवी हक्काच्या लढ्यासाठी उच्च आणि सर्वोच्च न्यायालयेच आशास्थान आहेत.''

*** महाराष्ट्र मागास नाही, पण विकसितही नाही**

''संयुक्त महाराष्ट्राच्या पन्नास वर्षानंतर हे राज्य मागासलेले नक्कीच नाही, पण विकसितदेखील नाही.'' असे मत प्रा. सुहास पळशीकर यांनी व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुणे विभागातर्फे 'गेल्या पन्नास वर्षांत काय मिळवलं, काय गमावलं आणि काय मिळवायचं आहे?' या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. सिंबायोसिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार आणि आमदार उल्हास पवार चर्चासत्रात सहभागी झाले होते. ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य पी. बी. पाटील अध्यक्षस्थानी होते.

प्रा. पळशीकर म्हणाले, ''महाराष्ट्राचा विकास म्हणजे कोणाचा विकास हे ठरवावे लागेल. राज्याच्या कृषी क्षेत्रातील दर हेक्टरी उत्पादन मागास राज्यातील दरहेक्टरी उत्पादनापेक्षाही कमी आहे. राज्याच्या उत्पादनात एकट्या मुंबईचा वाटा २५ टक्के आहे. उत्पादनातील औद्योगिक क्षेत्राचा वाटा वाढत नाही. सरकार लोकाभिमुख व्हावे ही अपेक्षा फोल ठरली आहे. राज्याच्या प्रगतीसाठी राजकीय कल्पनाशक्ती आणि धाडसाची गरज आहे. शेतीतील छुपी बेरोजगारी दूर करण्याबरोबरच शहरी भागात रोजगार हमी योजना राबविली पाहिजे.''

डॉ. मुजुमदार म्हणाले, ''यशवंतरावांनी ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार केला. वसंतदादा पाटील यांनी विनाअनुदानित तत्त्वावर शिक्षण संस्थांना परवानगी दिली. अभियांत्रिकी, वैद्यकीय महाविद्यालये फायद्याची हे राजकारणी आणि उद्योगपतींच्या लक्षात आल्याने दुर्दैवाने शिक्षणसम्राट निर्माण झाले. शिक्षणक्षेत्रात केरळ, हिमाचल

प्रदेश, तामिळनाडू आणि उत्तरांचल ही राज्ये महाराष्ट्राच्या तुलनेत आघाडीवर आहेत. कौशल्य विकसित करणारी शाळा महाविद्यालये त्याचप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यात एक विद्यापीठ सुरू केले पाहिजे.''

पवार म्हणाले, ''एकाच पक्षाची सरकारे जाऊन आघाडी सरकारमुळे अस्थिरतेकडे वाटचाल सुरू आहे. सहकारातील प्रामाणिकपणा आणि ध्येयवाद संपला. सवंग लोकप्रियतेच्या मागे लागलेले राजकारणी हा लोकशाहीतील सगळ्यात मोठा धोका आहे.''

प्रा. पाटील म्हणाले, ''विकासाच्या चक्रामध्ये नियोजन, कार्यक्षमतेने अंमलबजावणी आणि मूल्यमापन हे तीन टप्पे आहेत. मूल्यमापनाबाबत आपण गाफील राहिलो. महाराष्ट्राला महान करणाऱ्या गोष्टी आणि लहान करणाऱ्या गोष्टी कोणत्या याचा परखडपणे वेध घेतला पाहिजे. सार्वजनिक जीवनाचे लेखापरीक्षण करण्याची व्यवस्था उभी करायला हवी.''

*** ना. धों. महानोर यांच्या हस्ते 'मोगरा फुलला'चे प्रकाशन**

स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्यावरील 'मोगरा फुलला' या संपादित पुस्तकाचा प्रकाशन सोहळा कवी ना. धों. महानोर यांच्या हस्ते पार पडला. लतादीदींचा वाढदिवस, अमृत महोत्सव, पुरस्कार अशा विविध प्रसंगांच्या निमित्ताने साहित्य, संगीत व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी लिहिलेले २१ दर्जेदार लेख व ४ मानपत्रे त्यात आहेत. आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे, राम शेवाळकर, व. पु. काळे, शांता शेळके, मोहन वाघ, गौतम राजाध्यक्ष, अनिल मोहिले, विजय तेंडुलकर, शिरीष पै अशा नामवंतांनी लतादीदींवर केलेली शब्दसुमनांची बरसात व त्यांचे लतादीदींच्या सहवासातले मौलिक क्षण यांचा खजिना एकत्रितपणे या ग्रंथातून वाचकांसमोर येतो. या पुस्तकाच्या संपादनाचे काम सौ. रेखा चवरे, कारंजा (लाड) यांनी केले आहे.

पद्मभूषण सन्मानाने सन्मानित संगीतकार श्रीनिवास खळे यांची प्रस्तावना पुस्तकाला लाभली असून 'परचुरे प्रकाशन मंदिर' ने ते प्रकाशित केले आहे.

*** सायकिअॅट्री – शास्त्र आणि कला**

सायकिअॅट्री हे अर्धशास्त्र आहे, अशी टीका पूर्वी व्हायची, ते एका अर्थी खरेच आहे; कारण त्यातला अर्धा भाग कला आहे... आमच्या शास्त्राचा (सायकिअॅट्री) खरेतर सामाजिक ठसा पडलेला नाही, कारण आम्ही इथल्या मातीतल्या शहाणपणापासून फटकून आणि केवळ पाश्चात्यांवर अवलंबून राहिलो... ताणतणावांनाच मानसिक आजार मानून त्यावर औषधांनीच उपचार करण्याची मुभा आता अनेकजण घेत आहेत... मानसिक आरोग्याबद्दल अशी मार्मिक मते व्यक्त करत ज्येष्ठ मनोविकारतज्ज्ञ आणि लेखक डॉ. आनंद नाडकर्णी यांनी मिश्कील शैलीने आपला जीवनप्रवास

उलगडला.

डॉ. नाडकर्णी यांच्या 'शहाण्यांचा सायकिअॅट्रिस्ट' या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनानिमित्त समकालीन प्रकाशनातर्फे डॉ. अवचट यांनी अनौपचारिक संवाद साधला. डॉ. नाडकर्णी यांच्या इन्स्टिट्यूट ऑफ सायकॉलॉजिकल हेल्थ या संस्थेबद्दलही अनेक गोष्टी पुणेकरांना नव्याने ऐकायला मिळाल्या. ''दुसऱ्याचे दु:ख समजून घेण्याचा तुझा सतत प्रयत्न असतो, तर आम्हाला तुझ्या मानसिक दु:खाच्या प्रवासाबद्दल काही सांग,'' असे म्हणत डॉ. अवचटांनी नाडकर्णी यांना भूतकाळात नेले. लहानपणी पोलिओशी सामना करायला लागण्यापासून ते एमबीबीएसला नापास होण्यापर्यंतचे अनेक मानसिक धक्के, त्यातून सावरण्यासाठी कुटुंबियांनी दिलेला हात, हे सारे डॉ. नाडकर्णी यांनी अतिशय प्रांजळपणे पण खुमासदार शैलीत सांगितले.

समाजातील मानसिक रोगांबद्दलचा स्टिग्मा कमी करायचा असेल तर फक्त एकेकट्या रुग्णावर उपचार करून उपयोग नाही, हे लक्षात आल्याने इन्स्टिट्यूट ऑफ सायकॉलॉजिकल हेल्थ या संस्थेची स्थापना केल्याचे डॉ. नाडकर्णी यांनी सांगितले. डिस्ट्रेस, डिऑर्डर, डेव्हलपमेंट आणि डिस्टिग्मटायझेशन ही आमच्या कामाची चतु:सूत्री आहे. समाजाचे, समाजातील प्रत्येकाचे मानसिक आरोग्य चांगले रहावे, यासाठी विवेकनिष्ठ मानसोपचार पद्धती वापरण्याचा हा प्रयत्न आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

*** 'सकारात्मक पद्धतीने जीवन जगण्याचा आनंद घ्या'**

वाढते शहरीकरण आणि प्रदूषण रोजचे धकधकीचे जीवन यामुळे गेल्या २० वर्षांमध्ये भारतात हृदयरोगाचे प्रमाण वाढले आहे. योग्य आहार आणि नियमित व्यायामाकडे लक्ष दिल्यास हृदयरोग दूर होण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास हृदयरोगतज्ज्ञ डॉ. जगदीश हिरेमठ यांनी व्यक्त केला.

पी. एम. शहा फाऊंडेशन आणि वर्धमान प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने 'डॉक्टर तुमच्या भेटीला' हा कार्यक्रम वर्धमान प्रतिष्ठानच्या सभागृहात आयोजित

मराठी भाषेची तत्त्वे, तिच्या उद्‌गमापूर्वीच्या विविध अवस्थांचे संशोधन, भाषाशास्त्राच्या विविध अभ्यास पद्धती यांनी परिपूर्ण असा संदर्भ ग्रंथ!

मराठी भाषा
उद्गम
व
विकास

**३२०रु. पोस्टेज ३०रु.**

**कृ. पां. कुलकर्णी**

करण्यात आला होता. या वेळी ॲड. चेतन गांधी आणि विलास राठोड व्यासपीठावर उपस्थित होते.

डॉ. हिरेमठ पुढे म्हणाले की, आज सकारात्मक जीवन जगण्याची गरज आहे. जीवनाचा आनंद घ्यायला शिकले पाहिजे, तरच आपण तणावमुक्त जीवन जगू शकतो. मात्र आज प्रत्येकजण आजाराला आमंत्रणच देत असल्याची खंत वाटते. चिंता करणे हा सर्वांत मोठा आजार आहे, तो प्रथम बाजूला सारून जीवन जगायला शिकले पाहिजे. सुखाच्या मागे धावत असताना नेमके काय हवे आहे तेच आपण विसरत चाललो आहोत. चिंता आणि काळजी करून कुठलीही समस्या सुटत नाही. त्यामुळेच हृदयरोगासारख्या आजारांना सामोरे जावे लागते. असे डॉ. हिरेमठ यांनी सांगितले. व्यायाम आणि आहाराकडे पूर्ण लक्ष दिल्यास हृदयरोग दूर होऊ शकतो असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. डॉक्टरांवर विश्वास ठेवला, तर ते तुमच्यासाठी झोकून देऊन काम करतील असेही सांगितले. हृदयरोग टाळण्यासाठी समाजामध्ये जनजागृतीची गरज आहे. बाहेरील देशांमध्ये जनजागृतीमुळे हृदयरोगाचे प्रमाण आटोक्यात आणले आहे, हे त्यांनी स्पष्ट केले.

*** भारतीय कवयित्री संमेलन**

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे व अखिल भारतीय कवयित्री संमेलन यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय कवयित्री संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनाच्या समारोप समारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण उपस्थित होते.

अध्यक्षस्थानी साहित्यिक माधवी वैद्य या होत्या. या वेळी विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटीचे प्रमुख प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, नवी दिल्ली येथील ऑल इंडिया पोएटेस कॉन्फरन्सचे संस्थापक डॉ. लारी आझाद, महासचिव डॉ. शोभना जैन, कवयित्री सरस्वती चिम्मळगी, प्रा. डॉ. मंगेश तु. कराड व प्रा. सुधीर राणे हे उपस्थित होते.

डॉ. एस. एन. पठाण म्हणाले की, आज सर्वत्र स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करीत आहेत. त्यामुळे समाजात व कुटुंबात समानता येऊ घातली आहे. या संमेलनामध्ये भारताच्या अनेक राज्यांतून आलेल्या कवयित्रींनी आपापल्या भाषेमध्ये कविता सादर केल्या. या कवितांच्या माध्यमातून विश्वशांतीचा संदेश जगासमोर मांडण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामध्ये स्त्रियांची भूमिका अर्थातच महत्त्वाची आहे. स्त्रीमध्ये दु:ख सहन करण्याची जबरदस्त ताकद आहे. या वेदनेतूनच कविता जन्म घेते. ते दु:ख आपल्यात सामावून इतरांना सुखी ठेवणे ही भारतीय नारीची परंपरा आहे.

श्रीमती माधवी वैद्य म्हणाल्या, स्त्री ही अबला नसून, सबला आहे. म्हणून तिने

न्यूनगंड टाकून देऊन कणखरपणे उभे राहिले पाहिजे. सरस्वती, लक्ष्मी आणि दुर्गा अशा तिन्ही देवतांचे वास्तव्य स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वात असते. म्हणून माणूस घडविण्याची जबाबदारी स्त्रीवरच आहे. त्यासाठी सर्वप्रथम स्त्रीने स्वत:कडे आत्मविश्वासाने पाहणे गरजेचे आहे.

*** सुगम संगीत कार्यशाळा**

''कवितेमध्ये अनेक शक्यता दडलेल्या असतात. त्यामुळे संगीतकार आणि गायकाने कवितेचा उगम, शैली, चाल तसेच वृत्त हे बारकावे जाणून घेतले पाहिजेत. अभ्यास असेल तरच कविता कसदार आहे की नाही, याची जाणीव होते,'' असे मत प्रसिद्ध कवी संदीप खरे यांनी व्यक्त केले.

'पुणे भारत गायन समाज' संस्थेतर्फे आयोजिण्यात आलेल्या 'सुगम संगीत कार्यशाळे'मध्ये खरे आणि प्रसिद्ध संगीतकार आणि गायक डॉ. सलील कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

खरे म्हणाले, ''कवितेतील वृत्त, तिचा भावार्थ याचा विचार करून संगीतकाराने संगीत दिले आणि गायकानेही त्याची जाणीव ठेवून गायन केले, तरच कवितेचे मर्म श्रोत्यांपर्यंत पोहोचते. भावगीत हे शब्दवेधी संगीत असते. शब्द आणि सूर हे एकत्र येऊन संदेश देत असतात. त्यामुळे कवितेला समजून घेणे आवश्यक आहे.''

कवितेतील बारकावे, कवितेला संगीतबद्ध करताना वापरायचे नियम सांगून खरे यांनी कार्यशाळेत कविता संगीतबद्ध करताना आलेले अनुभव प्रकट केले.

*** बालसाहित्यसभा, कोल्हापूर**

'मराठी बालकुमार साहित्य सभा' कोल्हापूर ही संस्था जुलै १९९२ पासून कार्यरत आहे.

मराठी वाचन-लेखनाची आवड शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाढावी या दृष्टीने संस्थेचे उपक्रम असतात. शाळा–शाळांत जाऊन गोष्टी, कविता, गाणी सादर करणे, विद्यार्थ्यांसाठी लेखन शिबिरे आयोजित करून गोष्ट आणि कविता कशी लिहावी याची दिवसभराची कार्यशाळा घेणे, बालकुमारांसाठी निबंध, स्वरचित कविता, कथालेखन सादरकरणाच्या स्पर्धा घेणे, बालकुमार साहित्य संमेलन भरविणे इत्यादी.

याशिवाय दरवर्षी उत्कृष्ट बालसाहित्याला 'सभे'तर्फे पुरस्कार दिले जातात. महाराष्ट्र, गोवा अशा ठिकाणांहून बालसाहित्याची पुस्तके पुरस्कारासाठी येतात. प्रथम चारच पुरस्कार होते. गेल्या वर्षी तेरा साहित्यिकांना पुरस्कार देण्यात आले. सभेने आतापर्यंत फुलोरा, चांदोबाची वाडी, कवितेचा गाव हे बालकवितासंग्रह (प्रातिनिधिक) आणि गोष्टी मजेमजेच्या, धमालगोष्टी, गम्मतगोष्टी असे बालसाहित्य प्रकाशित केले आहे. कोल्हापुरातील नामवंत बालसाहित्यिक 'सभे'त कार्यरत आहेत. यामध्ये सर्वश्री

वसंतराव आणि मुकुंदराव निगवेकर, शशिकांत महाडेश्वर, मोहन जोशी, श्याम कुरळे, डॉ. मा. ग. गुरव, अशोक पाटील, नीलम माणगावे, डॉ. वासंती इनामदार-जोशी, सुधा कोपर्डेकर, अनुराधा खांडेकर, स्नेहा वाबळे, कुसुमताई कुलकर्णी, गोविंद गोडबोले, बाबुराव शिरसाट, मीनाक्षी सरदेसाई इत्यादींचा सहभाग आहे.

कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील शहरी, ग्रामीण परिसरात 'सभा' उपक्रम राबवते. कुरुंदवाड, गडहिंग्लज, हुपरी या ठिकाणी प्रत्येकी एक तर कोल्हापुरात तीन बालकुमार साहित्य संमेलने आयोजित केली.

### * 'दिनविशेष कोश'

महाराष्ट्राचा १ जानेवारी ते ३१ डिसेंबर असा प्रत्येक दिवसांचा गेल्या ४५० वर्षांचा इतिहास सांगणारा दिनविशेष कोश डायमंडने काढला आहे.

प्रा. गणेश राऊत आणि वि. ना. होनप या दोघांनी वर्षभर खपून हा ६४० पृष्ठांचा कोश तयार केला. हजारो कात्रणे, शेकडो नोंदी, शेकडो संदर्भग्रंथ या सगळ्यातून 'महाराष्ट्र दिनविशेष' हा कोश सिद्ध झाला. कोशात अचूकता यावी म्हणून भरपूर मेहनत घेतली. रुढ अर्थाने दिनविशेष म्हणजे नवं लेखन नव्हे. दिनविशेष हे संकलन आहे. या कोशात अर्थकारण, समाजकारण, राजकारण साहित्य, इतिहास, क्रीडा अशा सर्वच क्षेत्रांचा धांडोळा या ग्रंथात घेतला आहे. दिनांकाव्यतिरिक्त १३ परिशिष्टे आणि २ सूची या कोशात दिलेल्या आहेत.

यात पुरस्कार, साहित्य संमेलने, नाट्यसंमेलने, अनियतकालिके, ठळक दिनविशेष, टोपणनावे, मराठी भाषा, मराठीचे कालखंड, काही महत्त्वाचे शक व त्याचे इसवीसन मध्ये रूपांतर, महाराष्ट्रातील दुष्काळ, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील हुतात्मे, मुंबई प्रांताचे (१९३६-३७) मधील मंत्रिमंडळ, औद्योगिक कामगार चळवळी, निवडक व्यक्तीसूची, संदर्भसूची अशा माहितीचा समावेश आहे.

### * 'सिमरन'चे अमेरिकेत प्रकाशन

कॅलिफोर्नियातील 'मराठी मित्रमंडळाने' आपल्या सहकाऱ्यांचा मेळावा आयोजित केला हाता. मराठी मित्रमंडळाचे संस्थापक दिवाकर (दादा) कारखानीस यांचे 'सिमरन' नावाचे पुस्तक आणि ज्येष्ठ कवी, कथाकार आणि नाटककार विजय पाठारे यांची The Wrath of Womb Goddess नावाची नवी कादंबरी प्रसिद्ध झाली. या दोन्ही लेखकांचा सन्मान मराठी मित्रमंडळांने केला. या समारंभाला कॅलिफोर्नियातील मराठी मंडळाचे सभासद एकत्रित आले होते. त्यात श्री. व सौ. माधव काळे, श्रीनिवास माटे, आशिष महाबळ, प्रशांत वैद्य, जयंत आणि रेखा खारकर, दादा पानट, कुमार चित्रे, प्रमोद आणि आरती तेंडुलकर, मनोज आणि अनघा चित्रे अशी बरीच मंडळी हजर होती.

'सिमरन' पुस्तकाचे प्रकाशन विजय पाठारे यांच्या हस्ते झाले. ते म्हणाले की, 'दादांनी आपल्या पणतीला लिहिलेली ही पत्रे म्हणजे आपल्या मराठी अनिवासी भाषिकांच्या आशाआकांक्षांच्या परिपूर्तीचा चालताबोलता दस्तऐवज आहे. दादांनी जणू पुढच्या पिढीला दिलेला हा वसा आहे. त्यांची कळकळ आणि समयोचित विवरण काळजाला भिडणारं आहे. त्यात उपदेश करण्याचा आविर्भाव नाही, फक्त प्रामाणिक निरुपण आहे. त्यात आत्मचरित्राचा दंभ नाही तर आत्मपरीक्षणाचा प्रामाणिकपणा आहे. सिमरन ही पुढच्या पिढ्यांचे एक प्रातिनिधिक चिन्ह आहे. प्रत्येक मराठी कुटुंबाने हे पुस्तक वाचणे आवश्यक आहे.'

श्री. श्रीनिवास माटे म्हणाले की, माणसामाणसांतील आणि राष्ट्रांतील भाडणे, वैमनस्य आणि युद्ध यांचे वास्तव चित्र सिमरनसमोर उभं करताना दादा म्हणतात, 'युद्ध जणू वारसाहक्काने आपल्याकडे येत असतं.' पण तरीही ते आशावाद विसरले नाहीत. आपल्या पिढीपेक्षा पणतीच्या पिढीपुढे वेगळे आणि नवीन प्रश्न, नवीन आव्हाने, नवीन संधी आणि सुविधा आहेत याची सिमरनला जाणीव करून देऊन या सर्व गोष्टींना सामोरे जाण्याचं प्रोत्साहन देतात.'

श्री. पाठारे यांच्या The Wrath of Womb goddess पुस्तकाचे रसग्रहण करताना प्रमोद तेंडुलकर म्हणाले की, 'तालिबान, सी. आय. ए., सी. बी.आय. आणि पौराणिक देवी आदिती यांच्या चित्तथरारक कथानकांवर ही कादंबरी लिहिली आहे. कादंबरीचे कथानक चीन, पाकिस्तान, तुर्कस्तान, अफगाणिस्तान, अमेरिका, इटली, हिंदुस्थान, नेपाळ इत्यादी अनेक देशांतून फिरते आणि ही सर्व गुंतागुंत लेखकाने मोठ्या कौशल्याने हाताळली आहे. कादंबरी वाचनीय असून, शेवटपर्यंत उत्सुकता कायम टिकविते.'

*** टी-शर्टची 'व्यर्थ न हो बलिदान' मालिका**

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी भारतीय वस्त्रशिल्पतर्फे 'व्यर्थ न हो बलिदान' ही टी-शर्टची मालिका सादर करण्यात आली आहे.




भि.ग. रोहमारे पुरस्कार ०८,माणिक साहित्य कथा पुरस्कार ०९, दहिवळ गुरुजी साहित्य पुरस्कार ०९

**आसूड** —————— अशोक कोळी

समाजरचनेचा बळी ठरलेल्या कष्टकरी माणसाच्या अंतर्मनाचा वेध घेत, सामाजिक वास्तवाचा आविष्कार उलगडत शोषणव्यवस्थेवर फटकारलेला...

**९०रु. पोस्टेज २०रु.**

मराठी प्रेमाचा प्रसार करण्यासाठी दोन वर्षांपासून विविध निमित्ताने मराठीवर आधारित टी-शर्टची निर्मिती करण्यात येत आहे. महाराष्ट्राच्या विविध अभिमान गीतांचे रेखाटन, सेनापती बापट यांचे रेखाचित्र, आचार्य अत्रे यांच्या 'मराठा'च्या अंकासाठी कविवर्य सुरेश भट यांनी लिहिलेल्या पंक्ती, मराठीसंदर्भातील साहित्य-काव्यपंक्ती असे या विविधरंगी टी-शर्टचे स्वरूप असेल.

राज्यातील १५ जिल्ह्यांमध्ये हे टी-शर्ट उपल्बध आहेत. त्याचप्रमाणे www.marathimanoranjan.com या संकेतस्थळाच्या माध्यमातूनही ऑर्डर नोंदविण्याची सोय आहे, अशी माहिती अश्विनी तेरणीकर यांनी दिली.

### * शाळांमधील वर्गांचे नेटवर्क

देशभरातील शाळांमधील वर्गावर्गात पोचविण्यासाठी 'डेल' या संगणक कंपनीतर्फे नेटवर्क प्रस्थापित केले जाणार आहे. दोन हजारांहून अधिक ई-पाठ्यपुस्तकांच्या माध्यमातून क्रमिक चर्चेची देवाणघेवाण करणारे नेटवर्क शिक्षणविश्वाचा चेहरामोहरा बदलून टाकणार आहे.

'डेल'च्या भारतामधील सार्वजनिक उपक्रमांचे सरव्यवस्थापक नीरज गुप्ता यांनी ५ मे रोजी दिल्लीत या नेटवर्कची माहिती दिली. देशातील १३ लाखांहून अधिक शाळांपैकी फक्त १४ टक्के शाळांमध्येच संगणक व माहिती तंत्रज्ञानाधारित सुविधा आहेत; त्यामुळे ई-साक्षर होण्याच्या मोहिमेत मुले मागे पडण्याची शक्यता आहे. 'डेल'तर्फे अमेरिका, इंग्लंड, ब्राझील, मेक्सिको, चीन, कॅनडा आदी देशांमध्ये अशा प्रकारे वर्गांचे नेटवर्क प्रस्थापित करण्यात आले आहे. त्याचा विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांनाही फायदा होत आहे.

वर्गातील फळ्याऐवजी आता ई-फळा योजना कार्यान्वित केली जात आहे. तसेच शालेय शिक्षणामध्ये माहिती-तंत्रज्ञानाच्या आधारे विविध उपक्रम राबविण्यासाठी केंद्र सरकार कोट्यवधी रुपयांचे अनुदान देत आहे. या पार्श्वभूमीवर वर्गांच्या नेटवर्कमुळे शाळांमध्ये ई-वातावरण निर्माण होण्यास मदत होईल.

सध्या वर्गामध्ये अध्यापन करण्यासाठी मर्यादित साधने उपलब्ध आहेत. या नेटवर्किंगमुळे शिक्षकांचे कार्यही अधिक आव्हानात्मक व रंजक होईल असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला.

### * सर्वांत लहान उपग्रहनिर्मितीत पुणेकर विद्यार्थिनीचा वाटा

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेतर्फे (इस्त्रो) प्रक्षेपित करण्यात येणाऱ्या आतापर्यंतच्या सर्वांत लहान उपग्रहाच्या निर्मितीमध्ये एका पुणेकर विद्यार्थिनीचा सहभाग आहे. अखिल भारतीय श्री शिवाजी स्मृती संस्थेच्या (एआयएसएसएमएस) माहिती-तंत्रज्ञान महाविद्यालयातील झोहरा अझीझ अली मांझियानी ही उपग्रहाच्या कॅमेऱ्याची

तंत्रप्रणाली विकसित करणाऱ्या पथकामध्ये कार्यरत होती.

भारताच्या अवकाश मोहिमांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यासाठी 'इस्त्रो' तर्फे विशेष मोहिम हाती घेण्यात आली आहे. आगामी प्रक्षेपणामध्ये विद्यार्थ्यांनी तयार केलेला १० बाय १० बाय १३.५ सेंटिमीटर एवढ्या छोट्या आकाराचा उपग्रह अवकाशात सोडण्यात येणार आहे. त्याचे वजन ८५० ग्रॅम असून सुमारे ५५ लाख रुपये खर्चून त्याची निर्मिती करण्यात आली आहे. या उपग्रहाद्वारे अंतराळात स्थिर ठेवण्यात येणाऱ्या कॅमेऱ्याद्वारे पृथ्वी व वातावरणाची विशेष छायाचित्रे संशोधन कक्षाकडे पाठविण्यात येणार आहेत. त्यासाठी उपग्रहातील कॅमेऱ्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्याच पथकामध्ये झोहराने योगदान दिले. बंगलोरच्या एनएमआयटी तंत्रज्ञान संस्थेमार्फत ती या प्रकल्पात सहभागी झाली. 'इस्त्रो'चे समन्वयक राघवमूर्ती यांनी झोहराच्या कार्याची दखल घेऊन तिला प्रशस्तिपत्रक पाठविले आहे.

### * शाळांसाठी आर-फाय तंत्रज्ञान विकसित

सध्याच्या संयुक्त कुटुंब पद्धतीमध्ये आईबाबा दोघेही करिअरला महत्त्व देणारे. नोकरीसाठी दिवसभर बाहेरच. आपला लहानगा वेळेवर शाळेत पोहोचला का, शाळेतून घरी आला का, अभ्यासात तो प्रगती करत असेल ना... अशा एक ना अनेक कारणांमुळे त्यांना दिवसभर काळजी लागून राहते. यावर आता पिनॅकल टेलिसर्व्हिसेसने उपाय शोधला असून, आर-फाय या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मोबाइल अलर्ट्सने मुलांची हालचाल पालकांना समजणार आहे.

जोग एज्युकेशन ट्रस्ट, अरिहंत एज्युकेशन फाउण्डेशन, चाटे ग्रुप ऑफ स्कूल्स या शाळांमध्ये ही यंत्रणा येत्या जून-जुलैपासून वापरली जाणार आहे. जोग, चाटे आणि अरिहंतच्या शाळांमधील सुमारे १२५०० विद्यार्थ्यांना आयडी कार्ड देण्यात आले असून, त्यासाठी वर्षाला ७०० रुपये शुल्क आहे.

आर-फायसाठी नॉंग रेंज रेडिओ फ्रिक्वेन्सी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.

पुण्याव्यतिरिक्त नागपूर, दिल्ली आणि गुडगाव या शहरांमधील शाळांना या तंत्रज्ञानाचा फायदा होणार आहे.

### * 'हाल्या हाल्या दूध दे'वर समीक्षा ग्रंथ प्रकाशित

पुणे, कोल्हापूर, नांदेड विद्यापीठात पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमात असलेल्या बाबाराव मुसळे यांच्या 'हाल्या हाल्या दूध दे' कादंबरीवर प्रा. डॉ. तुषार चांदवडकर यांनी संपादित केलेला समीक्षा ग्रंथ प्रकाशित झाला आहे. 'हाल्या हाल्या दूध दे' ही कादंबरी मेहता पब्लिशिंग हाऊसने 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कादंबरी' या स्पर्धात्मक उपक्रमात निवडली होती.

### * सिन्नर सार्वजनिक वाचनालयाला पुस्तकांची देणगी

सिन्नरच्या चोखंदळ वाचकांना नवं काहीतरी वाचायला मिळावं म्हणून जगन्नाथ गंगावणे यांनी १३६ पुस्तके सिन्नर सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष कृष्णाजी भगत यांच्या स्वाधीन केली. त्यासाठी २३ हजार रुपये खर्च आला. जगन्नाथ गंगावणे यांनी १९९७ पासून २ लाख ८१ हजार रुपयांची ग्रंथसंपदा सिन्नर सार्वजनिक वाचनालयास भेट दिली आहे. बालवयातच वाचनाची गोडी लागली तर ती आयुष्यभर पुरते. त्यातून बालमनावर संस्कार होतात. जीवन समृद्ध होते असे ते मानतात. यावेळी श्री. गंगावणे यांच्यासह त्यांचे पुत्र डॉ. सुरेश गंगावणे, कन्या सौ. प्रतिभा कमलाकर बोरकर, नात पल्लवी बोरकर यांच्यासह संचालक मंडळ उपस्थित होते.

### * एक वेबसाइट, अवघ्या मराठीजनांसाठी

जगभरातील मराठी बांधव एका छत्राखाली यावे, अधिक ग्लोबल व्हावे या दृष्टीने www.globalmarathi.org ही वेबसाईट हक्काचे व्यासपीठ ठरेल, असा विश्वास माय विश्वचे मंदार जोगळेकर यांनी व्यक्त केला.

ऑनलाइन विश्वकोश हे या वेबसाइटचे मुख्य आकर्षण असेल. कुठल्याही विषयाची सखोल माहिती ऑनलाइन पाहता यावी, अशी सोय या वेबसाइटवर आहे. प्रकाशित होणाऱ्या नव्या मराठी पुस्तकाची तसेच विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या सामाजिक संस्थांची माहिती येथे अपडेट करता येईल.

मराठी साहित्याची माहिती, संस्कृती, यशकथा, मुलाखती, कविता, पर्यटन, राजकारण, समाजकारण आदी गोष्टींचा समावेशही वेबसाइटवर असणार आहे.

### * मराठी विभागातले नवे अभ्यासक्रम

पुण्यात शिक्षण, नोकरी, व्यवसायासाठी येणाऱ्या अमराठी मंडळींना मराठीची ओळख व्हावी, यासाठी विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे मराठी भाषा प्रशिक्षणाचा डिप्लोमा सुरू करण्यात येणार आहे. याखेरीज मराठी भाषेशी संबधित निर्मिती व्यवहार, प्रशासकीय मराठी लेखन आणि स्क्रिप्ट रायटिंगचे सहा महिन्याचे डिप्लोमा कोर्सेस जुलै महिन्यापासून प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात येणार आहेत.

अमराठी व्यक्तींसाठी सुरू करण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमात भाषा ओळख आणि संभाषण कौशल्य शिकवण्यात येणार आहे. कोणत्याही शाखेच्या पदवीधरास या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येईल. अभ्यासक्रमासाठी तीन हजार रुपये फी असेल.

प्रकाशन व्यवसायात असणाऱ्या मंडळींना मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी ग्रंथ निर्मिती व्यवहार हा अभ्यासक्रम सुरू केला जाणार आहे. अलीकडच्या काळात स्पर्धा परीक्षांकडे मुलांचा ओढा जास्त आहे. त्यांच्यासाठी प्रशासकीय मराठी लेखनाचा

अभ्यासक्रम, मराठी मालिकांची संख्या वाढत आहे, म्हणून स्क्रिप्ट रायटिंगचा सहा महिन्यांचा अभ्यासक्रम, मराठीचा डिप्लोमा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत.

### * 'सदाफुली' कविता संग्रहाचे प्रकाशन

''वयाची सत्तरी ओलांडली तरी मराठी भाषा आणि तिच्या माध्यमातून समाजाला दिशा देण्याचे काम कुसुमताई धर्माधिकारी आपल्या कवितांच्या साहाय्याने करतात, हे कौतुकास्पद आहे,'' असे मत प्रा. रंजना फडके यांनी व्यक्त केले.


धर्माधिकारी यांच्या 'सदाफुली' या कविता संग्रहाचे प्रकाशन हडपसर येथे करण्यात आले. अर्थपूर्ण जगण्यावर विश्वास असल्याने इतरांसाठी जगण्याचं बळ यावे, असे त्यांना वाटते. बऱ्याचशा कविता प्रासंगिक आहेत. नातवाचे बारसे, नातवाचा साखरपुडा, मुलाचे लग्न, नवीन घरात प्रवेश, पतीची पंचाहत्तरी, मुला-नातवंडांबरोबर राहून कुटुंबात आलेले सुख-दु:खाचे तसेच समाजाचे अनुभव त्यांनी साध्या भाषेत मांडले आहेत.

### * 'जननी'ची कान महोत्सवासाठी निवड

ग्रामीण भागातील वैद्यकीय व्यवस्था आणि मुलगा होण्यासाठीचा हव्यास, कर्जबाजारी शेतकरी कुटुंबाचे वास्तव, यावर प्रकाशझोत टाकणारा रिमा अमरापूरकर दिग्दर्शित 'जननी' हा 'सामाजिक लघुपट' कान महोत्सवात १५ मे राजी दाखविला गेला.

राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय येथे निमंत्रितांच्या उपस्थितीत या लघुपटाचा विशेष प्रयोग झाला. प्रसिद्ध लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. अनिल अवचट यांच्या हस्ते लघुपटातील कलाकार आणि तंत्रज्ञांचा सत्कार करण्यात आला. सामाजिक कार्यकर्त्या रेणू गावस्कर, मानसोपचारतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी या वेळी उपस्थित होते.

डॉ. अवचट म्हणाले, ''खेड्यातल्या वैद्यकीय सेवेतील अनाचार पाहून सुन्न झाल्यासारखे वाटते. सदाशिव अमरापूरकर माझे मित्र असल्यामुळे रिमा बालपणापासूनची माझी मैत्रीण आहे. तिच्याशी मी अनेकदा खेळलो आहे. तिचा 'हा खेळ' मात्र माझ्या अंगावर आला.''

**इन द नेम ऑफ ऑनर**

**मुख्तार माई** अनु. उल्का राऊत

पाकिस्तानातल्या गरीब, निरक्षर स्त्रीवर ग्रामपंचायत सदस्य सामूहिक बलात्कार करतात. त्या क्रूर अन्यायातून जन्माला येते एक झुंजार वीरांगना! त्या अनोख्या स्त्रीची कर्तृत्वगाथा!

**८०रु. पोस्टेज २०रु.**

रिमा अमरापूरकर म्हणाल्या, ''मनापासून भावणारा विषय मांडला तर लोकांना तो आवडतो यावर माझा विश्वास आहे. गोखले इन्स्टिट्यूटमध्ये संशोधन प्रकल्पामध्ये सहभागी झाल्यापासून हा विषय मनात घोळत होता. हा विषय लघुपटाच्या माध्यमातून मांडता येईल असे मला वाटले. बाबांनी हा लघुपट पूर्ण झाल्यावरच पाहिला.''

*** रामाच्या अध्यक्षपदी दिनकर शिलेदार**

रामा (रिजनल ॲडव्हर्टायझिंग मार्केटिंग असोसिएशन) पुणे शाखेच्या अध्यक्षपदी दिनकर शिलेदार यांची  तर सचिव आणि खजिनदारपदी अभय लोहोकरे आणि अंजन बर्वे यांची निवड झाली आहे. जाहिरातदार व जाहिरात माध्यमे यांच्या बरोबरचा सुसंवाद वाढविणे, त्यांना जास्तीत जास्त सेवा देणे व व्यावसायिकांच्या अडचणींचे निवारण करणे या उद्देशाने ही संस्था कार्य करते.

*** 'म्हणींच्या लोककथा'चे प्रकाशन**

नवसाक्षरांचे साहित्य आणि बालसाहित्य यांचे नीट मूल्यमापन झालेले नाही, याला एकूण मराठी समीक्षाच जबाबदार आहे, असे मत ज्येष्ठ समीक्षक आणि अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले. प्रज्ञा करडखेडकर यांच्या 'म्हणींच्या लोककथा' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समीक्षक शंकर सारडा होते. यावेळी डॉ. लीला दीक्षित, प्रा. मिलिंद जोशी आदींचीही भाषणे झाली. या पुस्तकाची पहिली प्रत युनियन बँकेचे अधिकारी प्रमोद पळशीकर यांना देण्यात आली. चित्रकार चंद्रशेखर जोशी यांचा सत्कार पी. एस. पळशीकर यांच्या हस्ते तर प्रकाशक अनिल भालेराव यांचा सत्कार मिलिंद जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. मीरा सिरसमकर यांनी आभार मानले.

*** 'काल्पनिक विनोदाच्या लेखनाकडे वळले पाहिजे'**

काही संदर्भ काळाच्या ओघात गडप झाले की विनोदाची समकालीन गंमत नष्ट होते. त्यामुळे वास्तवाच्या दूर जाणारे पूर्ण काल्पनिक विनोदाच्या लेखनाकडे वळले पाहिजे, असे मत लेखिका मंगला गोडबोले यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने देण्यात येणारा कॉंटिनेन्टल पुरस्कृत 'चिं.वि. जोशी पुरस्कार' लोकसत्ताचे सहसंपादक श्रीकांत बोजेवार (तंबी दुराई) यांना 'दोन फूल, एक हाफ' या पुस्तकासाठी गोडबोले यांच्या हस्ते देण्यात आला. तसेच प्रकाशन संस्थेला देण्यात येणारा पुरस्कार पद्मगंधा प्रकाशनला देण्यात आला. 'पद्मगंधा'चे अरुण जाखडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

गोडबोले यांनी बोजेवार यांच्या लेखनाचा गौरव केला. त्या म्हणाल्या, वैविध्य,

सातत्य व संदर्भ समृद्धी ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या लेखनात 'मी' चा मोह नाही. तो नसल्यामुळे त्यात तुच्छता येत नाही. साहित्यविश्व व राजकारण हे दोन विषय प्रामुख्याने त्यांच्या लेखनात दिसतात. या दोन विषयांचे महाराष्ट्रालाच आकर्षण आहे. हा लेखक मराठी परंपरेशी घट्ट नाते सांगतो.

'लोकसत्ता' च्या लोकरंग पुरवणीमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या 'दोन फुल एक हाफ' या सदरातील लेखांचा समावेश बोजेवार यांच्या पुस्तकात आहे. बोजेवार यांनी मनोगतात या सदराची निर्मिती व त्यांच्या नामकरणाचे प्रसंग उपस्थितांसमोर उलगडले. ते म्हणाले की, ११ वर्षांपासून हे सदर सुरू आहे. त्यासाठी संपादक व माझ्या सर्व सहकाऱ्यांनी प्रोत्साहन दिले व वाचकांचा प्रतिसाद लाभला. या सदराच्या माध्यमातून राजकारण्यांची विविध रूपे पहायला मिळाली. व्यक्तीचे बाह्यरूप लक्षात घेऊन त्यांचे अंतरंग लिहितो. 'दोन फुल एक हाफ' चे हे पेग आनंदाचे आहेत. ते मी वाचकांना देतो. त्यातून ते आनंद घेतात, याचे मला समाधान आहे. पुण्यात हा पुरस्कार मिळाल्याने त्या रूपाने मला पु. ल. देशपांडे यांचीच शाबासकी मिळाली आहे असे वाटते.

### * 'ज्ञानेश्वरी' सध्याच्या मराठीत

केशव भिकाजी ढवळे प्रकाशनाने गिरगावातील मुंबई मराठी साहित्य संघात आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात रवीन मायदेव थत्ते (ज्ञानेश्वरी - ओबड-धोबड), सुमन नवलकर (इटुकली घंटुली) आणि सुवर्णा ढोबळे (मुहूर्त ते औक्षवंत) या तीन लेखकांच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. बृहन्मुंबई महापालिकेचे माजी आयुक्त शरद काळे आणि राज्य मराठी विकास संस्थेच्या संचालिका वसुंधरा पेंडसे-नाईक यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

सर्वसामान्यांसाठी भगवद्‌गीतेचा मराठी अनुवाद ज्ञानेश्वरांनी केला. मात्र आता ज्ञानेश्वरीतील मराठीत आणि सध्याच्या प्रमाण मराठी भाषेत खूपच फरक आहे. २१ व्या शतकात या ज्ञानेश्वरीचा अनुवाद प्रमाण मराठी भाषेत करून थत्ते 'ज्ञानेश्वरी' घरोघरी पोहचविण्याचे काम करीत आहेत असे प्रतिपादन पेंडसे-नाईक यांनी यावेळी व्यक्त केले.

### * 'थिंक महाराष्ट्र'ला हवा प्रत्येकाचा प्रतिसाद

मराठी माणसाचा चांगुलपणा व त्याची बुद्धिप्रतिभा व्यक्त होण्याचे माध्यम आणि सुजाण मराठी माणसाचे व्यासपीठ म्हणून सुरू करण्यात आलेल्या 'थिंक महाराष्ट्र' या वेबसाईटला जास्तीत जास्त मराठी माणसांनी भेट द्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

दोन महिन्यांपूर्वी सुरू करण्यात आलेल्या या वेबसाईटचे व्यवस्थापन करण्यासाठी

'व्हिजन महाराष्ट्र फाऊंडेशन' नावाची कंपनी स्थापन करण्यात आली आहे. दिनकर गांगल, माधव शिरवळकर, अतुल तुळशीबागवाले, भूषण केळकर हे तिचे मूख्य सूत्रधार आहेत. तर ज्योती शेट्ये, प्रमोद शेंडे, किशोर कुलकर्णी, विदुर महाजन, पद्मा कऱ्हाडे, नीलिमा कानेटकर, आदिनाथ हरवंदे, नरेंद्र काळे, सीमा दांडेकर, मंदार दातार यांची त्यांना साथ लाभली आहे.

या वेबसाईटवर काही अभ्यासू लेखकांनी नियमित लिहिण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे ही वेबसाईट दर शुक्रवारी आणि शनिवारी अपडेट होते. ती आठवड्यातून आणखी काही वारी अपडेट करण्यात येणार असल्याचे संपादक दिनकर गांगल यांनी सांगितले. या संदर्भात सूचना dinkargangal@yahoo.co.in या ई-मेल वर कराव्यात, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

### * 'धांडोळा भारतीय कुंभारांचा'चे प्रकाशन

रामलिंग कुंभार लिखित 'धांडोळा भारतीय कुंभारांचा' या संदर्भ ग्रंथाचे प्रकाशन सांगलीचे महापौर नितिन सावगावे यांच्या उपस्थितीत झाले.

देशभरातील कुंभार समाजाच्या वाटचालीचा समग्र आढावा जाती-पोटजातींच्या दुर्मिळ माहितीसह यात असल्याने या संदर्भग्रंथाला सामाजिक दस्तऐवजाचे महत्त्व आहे, असे सावगावे यांनी व्यक्त केले. मुक्त प्रकाशनाचे सुभाष पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश जमदाडे, भारत कुंडले, मिरज पंचायत समितीच्या सभापती मनोरमा कुंभार, दत्तात्रय कुंभार, सुरेश कुंभार आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

### * आंबेडकरी साहित्य संमेलन

तिसरे वामनदादा कर्डक आंबेडकरी साहित्य संमेलन १६ मे रोजी औरंगाबाद शहरात आयोजित करण्यात आले. संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध कवी फ.मुं. शिंदे होते. संमेलनाचे उद्घाटन जुन्या पिढीतील विचारवंत आचार्य सूर्यकांत भगत यांच्या हस्ते झाले. वैजापूर समर्थ शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष प्रा. मोहन आहेर हे स्वागताध्यक्ष होते.

संमेलनातील पहिलाच परिसंवाद 'वामनदादांच्या गीतांमधील वर्ग संघर्ष' या विषयावर झाला. त्यात डॉ. आनंद तेलतुंबडे, पी.बी. अंभोरे, प्रा. ऋषिकेश कांबळे, प्रा. डॉ. सोनाजी पतंगे, डॉ. दिलीप चव्हाण सहभागी होते. कथाकार आणि कवी प्रा. रवीचंद्र हडसनकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कविसंमलेनात प्रा. सागर जाधव, रवींद्र टेंभुर्णे, संघमित्रा टेंभुर्णे, प्रा. शिवाजी अंबुलगेकर, राजेसाहेब कदम, प्रा. मुकुंद राजपंखे, काशीनाथ वेलदोडे, प्रदीप जाधव यांचा सहभाग होता. एस.एम. वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली संमेलनाचा समारोप झाला. या वेळी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे उर्दू

शायर बशर नवाज, कबीर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माधव बोर्डे उपस्थित होते.

पं. प्रभाकर धाकडे यांना बनाई हरिभाऊ बोर्डे पुरस्कृत महाकवी वामनदादा कर्डक स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ११ हजार रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या मान्यवरांचा या वेळी सत्कार करण्यात आला.

*** मुलांसाठी मराठीत शेक्सपिअर**

नाटककार शेक्सपिअरची ओळख मुलांना किशोरवयातच व्हावी यासाठी 'मुलांसाठी शेक्सपिअर' ही आठ पुस्तकांची मालिका ज्येष्ठ अभिनेते प्रभाकर पणशीकर यांच्या हस्ते २७ मे रोजी एस.एम. जोशी सभागृहात प्रकाशित करण्यात आली.

रंगभूमीचा जादूगार या पुस्तकातून शेक्सपिअरची जीवनकथा समोर येते. या नाट्यकथांमधील घटनांची भौगोलक पार्श्वभूमी लक्षात यावी म्हणून कथांमधील ठिकाणे दाखवणारे नकाशे पुस्तकात दिलेले आहेत.

डॉ. हेमंत जुन्नरकर यांनी या मालिकेचे लेखन केले आहे.

*** लढणाऱ्या मातेची कहाणी समुद्रापार**

'अमेय प्रकाशन' आणि 'क्रॉसवर्ड'तर्फे कांबळे यांच्या 'आई समजून घेताना' या पुस्तकाच्या इलंदाज् स्टोरी या इंग्रजी अनुवादाचे प्रकाशन सुलोचना सातपुते, आशा हेंद्रे आणि शारदा गजरे यांच्या हस्ते झाले. प्रिया गोखले यांनी इंग्रजी पुस्तकातील काही भागाचे वाचन केले. ज्येष्ठ विचारवंत भाई वैद्य, डॉ. रावसाहेब कसबे, ॲड. रावसाहेब शिंदे, डॉ. मनोहर जाधव, प्रसिद्ध उद्योजक विठ्ठल मणियार, डॉ. सतीश देसाई आणि कागद-काच-पत्रा संघटनेच्या पूर्णिमा चिकरमाने यावेळी उपस्थित होत्या. सांगलीच्या शांतिनिकेतन महाविद्यालयात शिक्षण घेत असताना कांबळे यांना आईची माया आणि पाठबळ देणाऱ्या सुमनताई ठाणेदार यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला.

❒




**चॅम्पियन व्हा!**

डॉ. रमा मराठे

पंचसूत्रांच्या माध्यमातून जीवनात यशस्वी होण्यासाठी
खास मुलांकरता उघडलेला गोष्टीरूप खजिना!

**२२०रु. पोस्टेज ३०रु.**

## * वाई वसंत व्याख्यानमालेत 'नोबेल विजेत्या स्त्रिया'

महाराष्ट्राला दोन शतकांचा सांस्कृतिक आणि सामाजिक प्रबोधनाचा समृद्ध वारसा लाभला आहे. या प्रबोधनाच्या चळवळीत 'वसंत व्याख्यानमालेचा' फार मोठा वाटा आहे. या व्याख्यानमालेची मुहुर्तमेढ न्या. गोविंद महादेव रानडे, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक इ. तत्कालीन समाजश्रेष्ठींनी रोवली. वाई येथील वसंत व्याख्यानमालेचा आरंभ १९१७ साली झाला. यंदाचे व्याख्यानमालेचे हे ९४ वे वर्ष.

वाईच्या वसंत व्याख्यानमालेत ११ मे २०१० रोजी लेखिका आणि स्त्री-किर्लोस्कार मासिकाच्या उपसंपादिका मीरा सिरसमकर यांचे 'नोबेल विजेत्या स्त्रिया' या विषयावर व्याख्यान झाले. त्यात त्यांनी नव्वद स्लाईड्सह नोबेल पारितोषिक विजेत्या स्त्रियांच्या दुर्मिळ छायाचित्रांसह विवेचनात्मक माहिती दिली. सर्व नोबेलविजेत्या स्त्रियांच्या वैज्ञानिक क्षेत्रातील संशोधन करताना स्त्रियांना आलेल्या अडचणी, वाङ्मयात आपला ठसा उमटविताना त्यांनी केलेले प्रयत्न तसेच जगभरात शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून त्यांनी घेतलेले परिश्रम याविषयी त्यांनी सोप्या भाषेत विवेचन केले.







**नोबेल ललना** ३री आवृत्ती

मीरा सिरसमकर

नोबेल पुरस्कार विजेत्या महिलांची माहिती देणारे हे पुस्तक घरोघरी संग्रही असायलाच हवे.

१८०रु. पोस्टेज २५रु.

# कोल्ड स्टील




**टीम बुके । बायरॉन उसी**
अनु. सुभाष जोशी

**३००रु. पोस्टेज ३०रु.**

''गी, मी लक्ष्मी मित्तल बोलतो आहे. मी केवळ औपचारिकपणे हा फोन करतो आहे आहे. उद्या मित्तल स्टील तुझ्या भागधारकांसमोर आर्सेलरच्या शेअर्ससाठी थेट प्रस्ताव मांडणार आहे हे सांगण्यासाठी.''
''ही तर एकप्रकारची लढाईच आहे,'' जॉन कास्टेगन्नो जाहीर करतो. ''आपण आपल्या रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत लढलं पाहिजे.''
मित्तलचा प्रस्ताव आर्सेलरचे संचालकमंडळ एकमुखाने फेटाळून लावते.

**राहुल गोखले**

# विज्ञानातील सरस आणि सुरस

**१८०रु. पोस्टेज २५रु.**

विज्ञानइतिहासाची पाने ही शास्त्रज्ञांच्या जीवनकथांनी आणि शोधांच्या रंजक कथांनी नटली आहेत. साध्या सेफ्टी पिनपासून अणुबॉंबपर्यंत जे अनेकविध शोध लागले, ते संशोधक-शास्त्रज्ञांच्या परिश्रमांची, चिकाटीची आणि मुख्यत: त्यांच्या प्रतिमेची साक्ष पुरवितात. विज्ञानइतिहासातील अशीच काही पाने उलगडून दाखविण्याचा हा प्रयत्न. या पुस्तकात लिओनार्दो द विंची या प्रख्यात चित्रकारातील संशोधक भेटेल, नोबेल, पॉलिंग, साखारॉव्ह, भटनागर हे संशोधक-शास्त्रज्ञ भेटतील, तसेच ॲस्पिरीनपासून विजेच्या दिव्यांपर्यंत अनेक शोधांच्या रंजक कथा वाचायला मिळतील.

विज्ञानातील हे सारे 'सरस' तितकेच 'सुरस'ही आहेत.

ते तितक्याच रंजक पद्धतीने मांडलेले या पुस्तकात आढळतील.


# विशेषवार्ता

**∗ 'मैत्री पुस्तकांशी' पुस्तक प्रदर्शन, कार्टून व कॅलिग्राफी कार्यशाळा**

सुट्टीमध्ये बाल व कुमार वाचकांची पुस्तकांशी गट्टी जमवून देण्यासाठी 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या वतीने 'मैत्री पुस्तकांशी' उपक्रमाचे २३ एप्रिल ते २७ एप्रिल दरम्यान आयोजन करण्यात आले. खास लहान मुलांसाठी असंख्य पुस्तकांचे प्रदर्शन, पुस्तकांच्या खरेदीवर पुस्तके मोफत अशा आकर्षक योजनाही होत्या. कार्टुनिंग व कॅलिग्राफी कार्यशाळा नि:शुल्क. तसेच बालसाहित्यिकांना गोष्ट लिहिण्याची स्पर्धा अशा विविध कार्यक्रमांचा या उपक्रमात समावेश होता.

दि. २४ एप्रिल रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत प्रसिद्ध चित्रकार घन:श्याम देशमुख यांनी कार्टुनिंग अर्थात व्यंगचित्रकला या विषयांची कार्यशाळा घेतली. यामध्ये मुलांना कार्टुन कसे काढावे याचे थेट प्रात्यक्षिक करून दाखविले. यात मुलांचा सहभाग फार मोठ्या प्रमाणावर होता.

दि. २५ एप्रिल रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत चित्रकार घन:श्याम देशमुख यांनी फेस पेंटिंग कार्यशाळेचे आयोजन केले. यात मुलांना वेगवेगळ्या फळांच्या






थिम देऊन त्याचे तोंडावर पेंटिंग करायला सांगण्यात आले.

दि. २६ एप्रिल रोजी सुलेखनकला अर्थात कॅलिग्राफी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. प्रसिद्ध चित्रकार बाबू उडुपी यांनी मुलांना सुंदर हस्ताक्षरासाठी काही टिप्स दिल्या व मुलांकडून कॅलिग्राफीची प्रात्यक्षिके करवून घेतली.

मुलांमध्ये वाचनाची आवड विकसित करतानाच त्यांच्यातील कलागुणांना दिशा देणारा हा उपक्रम नि:शुल्क होता.

❐




# पुस्तक परिचय

**ऑस्ट्रेलियाच्या तुरुंगातून पळून आलेल्या लिंडसेला घडलेले महानगरी मुंबईचे विराट चैतन्यशाली दर्शन**

१४०० पृष्ठांची रोमहर्षक महाकादंबरी

# शांताराम




**ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्स** अनु. अपर्णा वेलणकर

'शांताराम' ही मराठीत अनुवादित झालेली कादंबरी खरोखरच बघताक्षणी 'वजनदार' आहे याची खात्री पटते. चौदाशे पृष्ठांच्या या कादंबरीचे वजन दोन किलो आहे. प्रवासात निवान्त वाचू असे म्हणायची सोय नाही. घरीच बसून वाचायला हवी. पण वाचायला अवश्य हवी अशीच ही जबरदस्त कादंबरी आहे असे बिनदिक्कत म्हणता येईल.

मुंबई महानगरीचे या कादंबरीतून होणारे दर्शन जन्मभर मुंबईत सराईतपणे वावरणाऱ्या व्यक्तींनाही नवखे, अपरिचित ठरवील; एका परदेशी माणसाला जे पहिल्या काही तासात दिसले ते आपल्याला आपली सगळी हयात येथे घालवूनही कसे दिसले नाही असा प्रश्न पडेल.

भारतीय भाषांमध्ये 'शांताराम' प्रथम मराठीत येत आहे याचेही अप्रूप आहे. लिडसेला मराठी चांगले बोलता येते. ३४ भाषांमध्ये अनुवादित झालेल्या या कादंबरीच्या लक्षावधी प्रती विकल्या गेल्या आहेत.

'शांताराम' ही कादंबरी लिहिली आहे ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्स या ऑस्ट्रेलियन हरहुन्नरी व्यक्तीने. ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्स हे त्याचे काही खरे नाव नाही... जून १९५२ मध्ये मेलबर्न शहरात त्याचा जन्म झाला तेव्हाचे त्याचे नाव ग्रेगरी जॉन पीटर स्मिथ. हेच त्याचे शाळेतील नाव. ऐन तरुणवयात त्याला मादक द्रव्यांची चटक लागली. चरस, गांजा यांच्यासाठी पैसे पुरेनात. तेव्हा त्याने नकली पिस्तुल घेऊन बँकांवर डाके घालण्याचे सत्र सुरू केले. १९७७ मध्ये तीन महिन्यांत अशा २४ चोऱ्या करून त्याने बत्तीस हजारावर ऑस्ट्रेलियन डॉलर्सची कमाई केली. पण चोरीच्या ठराविक तंत्रामुळे पोलिसांनी त्याला पकडले. १९७८ मध्ये त्याला १९ वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली. ऑस्ट्रेलियाच्या व्हिक्टोरिया तुरुंगात त्याला डांबण्यात आले. पण त्या तुरुंगातून त्याने १९८० साली दिवसाढवळ्या पलायन केले. कोठडीत त्याला एकट्याला बंद करून त्याचा खूप छळ करण्यात आला, म्हणून त्याने कारागृहातून सुटका करून घेण्याची योजना आखली असे कारण त्याने पुढे सांगितले.

ऑस्ट्रेलियातून तो न्यूझीलंडला गेला. न्यूझीलंडचा बनावट पासपोर्ट लिंडसे या नावाने मिळवून त्याने मुंबईचे विमान पकडले. पासपोर्ट बनावट असूनही मुंबई विमानतळावरून तो सहीसलामत बाहेर पडला. १९८२ ते १९९० अशी नऊ वर्षे त्याने मुंबईत काढली.

गौरवर्णीय असूनही मुंबईतल्या अंडरवर्ल्डमध्ये त्याने प्रवेश मिळवला. खोट्या नोटा वटविणे, शस्त्रास्त्रांची-दारूगोळ्याची वाहतूक करणे, खोटे पासपोर्ट बनवणे, मादक द्रव्यांची वाहतूक व विक्री, विदेशी मद्याची वाहतूक, परदेशी पर्यटकांची सरबराई वगैरे उद्योग करून पोट भरणे मुंबईत काही अवघड गेले नाही. माफिया टोळ्यांमधील स्पर्धा, बेकायदा व्यवहारातील धोके, पोलिसांचा दुटप्पीपणा वगैरे

गोष्टींना तोंड देतच आपले बस्तान बसवावे लागते. त्यामुळे आर्थर रोड कारागृहातही त्याला काही दिवस काढावे लागले. एक गौरवर्णीय तरुण येथील भाषा बोलतो, येथील जनरीतीत रुळतो याचेही अप्रूप असते. त्यामुळे स्मगलिंग वगैरे धंदे करणेही सोपे जाते. परदेशी तरुणींच्या मार्फत अनेक कामे करून घेता येतात. धनिकांना आणि राजकीय नेत्यांना मुली पुरवणे हाही एक प्रतिष्ठेचा व्यवसाय ठरतो. त्यांचे खास अड्डे असतात असे अफलातून तपशील 'शांताराम' या कादंबरीत येतात आणि मुंबई शहराची वेगळीच ओळख दृढ होत जाते.

'शांताराम' या कादंबरीत ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्सच्या आयुष्यातील अनेक घटना आल्या असल्या तरी हे पुस्तक म्हणजे आत्मकथन नव्हे असे पुन:पुन्हा लेखक सांगतो. इतरांच्या जीवनात घडलेल्या घटनांचाही वापर जरुरीप्रमाणे केला गेला आहे. असे घडण्याची शक्यता आहे या कसोटीवर त्या घटनांचा उपयोग करून घेण्यात आला आहे. 'शांताराम'च्या लेखनाची प्रक्रिया दीर्घकाळ चाललेली होती. १९९०मध्ये भारतातून ग्रेगरी डेव्हिड ऑस्ट्रेलियाला परत गेला. आपण होऊन कारागृहात गेला. कारागृहात त्याने आत्मचरित्रातील घटनांचे लेखन सुरू केले. पाचसातशे पाने लिहून झाली. ती कारागृहाच्या अधिकाऱ्यांनी ताब्यात घेऊन नष्ट केली. एकदा नाही दोनदा. 'शांताराम' या कादंबरीचे लेखन तुरुंगातून बाहेर पडल्यावर झाले. मुंबईतील अनुभवांवर आधारलेली ही कादंबरी 'फिलॉसॉफिकल थ्रिलर' आहे असे लेखकाचे मत आहे. शांतराम हे नाव नायकाला मुंबईत भेटलेला गाइड आणि पुढे जिव्हाळ्याचा मित्र झालेला प्रभाकर खाडे याची आई देते. प्रभाकरच्या सुंदरवाडी या गावी सहा महिन्यांचा काळ शांताराम घालवतो. तेथेच मराठी शिकतो. मराठी संस्कृतीचे धडे गिरवतो. 'मराठी बोलणारा गोरा साहेब' म्हणून त्याचे मुंबईतही कौतुक होते.

रॉबर्ट्सच्या 'शांताराम'मध्ये मुंबईतील वास्तव्याचा एक दशकाचा कालखंड आला आहे. त्या आधी आणि नंतरचा काळ चितारणाऱ्या आणखी दोन पुस्तकांच्या लेखनाचा रॉबर्टचा संकल्प आहे. एकूण तीन कादंबऱ्यांची ही मालिका असेल. १९९० मध्ये मुंबई सोडल्यावर रॉबर्ट्सने ऑस्ट्रेलियातील कारावासात आपल्या शिक्षेचा काही कालावधी पूर्ण केला. एकदा तुरुंगातून परत पलायन केले; परंतु त्यामुळे शिक्षेत वाढच होईल हे लक्षात आल्यावर पुन्हा त्याने तुरुंगात घुसखोरी केली. आपला शिक्षेनंतरचा काळ कुटुंबाबरोबर उजळ माथ्याने स्वातंत्र्याच्या वातावरणात घालवता यावा असा त्याचा इरादा होता. आजही आहे. फ्रान्स, स्वित्झर्लंड, जर्मनी या देशातही काही काळ त्याने घालवला. नंतर मुंबईला येऊन गोरगरीबांच्या आरोग्यासाठी आणि कल्याणासाठी एक धर्मादाय ट्रस्टची स्थापना त्याने केली. त्याची पत्नी फ्रँक्वा सटुर्डझा ही दि होप फॉर इंडिया फाउंडेशनची अध्यक्ष आहे.

इ. स. २००३ मध्ये 'शांताराम' ही कादंबरी ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये

स्क्राइब पब्लिकेशन्सतर्फे प्रकाशित झाली. इ. स. २००४मध्ये ग्रेट ब्रिटनमध्ये लिटल ब्राऊन या प्रकाशन संस्थेतर्फे तिचे प्रकाशन झाले. भारतात या कादंबरीच्या प्रसिद्धीसाठी रॉबर्ट्सचा दौरा झाला. अनेक शहरात शांतारामचे प्रकाशन आणि लेखकवाचक भेटीचे कार्यक्रम झाले. तुरुंगातून पळालेला, माफिया अंडरवर्ल्ड टोळीत काम करणारा गुन्हेगार मुंबईच्या प्रेमात पडतो आणि मुंबईच्या झोपडपट्टीतही सुख शोधतो; त्याच्या मुंबईतील आयुष्याचा रोमांचकारक काळ उभा करणारा कादंबरीकार म्हणून रॉबर्ट्सला विविध माध्यमांतून भरपूर प्रसिद्धी मिळाली. मुंबईचे त्याने घडवलेले दर्शन जाणकारांनाही नवलाईचे वाटते.

'शांताराम' मराठीत वाचताना पहिल्या पानापासूनच तिचे अस्सल मराठीपण जाणवते. हा अनुवाद आहे असे वाटतच नाही. मूळ इंग्रजीशी मराठी मजकूर पडताळून बघताना आरंभापासूनच हा शब्दाला शब्द, वाक्याला वाक्य असा यांत्रिक पण प्रामाणिक भाषांतराचा प्रकार नाही हे स्पष्ट होते. लिन (लिंडसे- न्यूझीलंडच्या बनावट पासपोर्टवरील नाव) आपले आत्मकथन करीत आहे असे निवेदनाचे स्वरूप आहे. प्रभाकर 'लिन', लिनबाबा असे त्याला म्हणतो. तेच नाव पुढे सर्रास वापरले जाते.

It took me a long time and most of the world to learn what I know about love and the choices we make, but the heart of it came to me in an instant, while I was chained to a wall and being tortured.

हे पहिलेच वाक्य मराठी अनुवादात दहा वाक्यांमध्ये अवतरते. मूळ वाक्यातील वेगवेगळे मुद्दे स्पष्टही करते आणि त्यांचा लयबद्ध आशय नेमका वाचकाच्या मनीमानसी नेऊन भिडवते.

*"माणसाला अक्कल यायला वेळ लागतो. मला जरा जास्तच लागला.*
*द्वेषाच्या जाळाने आयुष्य उद्ध्वस्त होते म्हणजे काय?*
*प्रेमाच्या अंकुरातून आयुष्य पुन्हा रुजतं म्हणजे काय*
*दर पावलाला तिठे, चौरस्ते लागतात. त्या क्षणी आपण कोणता रस्ता निवडतो, कोणता पर्याय स्वीकारतो? ते आपले निर्णय आयुष्यातल्या भोगांची मुद्रा कपाळावर ठोकतात, तेव्हा आत घुसणाऱ्या खिळ्यांनी रक्त वाहतं. ती भळभळ... म्हणजे काय?"*

*जगभर वणवणत फिरलो, धडपडलो, ठेचकाळलो तेव्हा या सगळ्यातलं जे काही कळलं ते शिकलो.*
*पण ज्याच्या तुकड्यांच्या शोधात आयुष्याची वणवण होते, त्याचा चटका*

*एकदाच चरचरून बसावा असा क्षण माझ्या आयुष्यात आला होता.*

*तुरुंगातल्या अंधारकोठडीत, थंडगार दगडी भिंतींना करकचून बांधलेल्या माझ्या शरीरावर चाबकाच्या फटकाऱ्यांनी रक्त फुटत होतं; तेव्हा त्या असहाय, रक्तबंबाळ अवस्थेत वेदनांनी कळवळताना मनाशी एक निर्लज्ज, निर्विकार पोकळी तयार होत गेली. त्या थंडगार निर्वातातून अचानक एक क्षणी मला जाणवलं. आय ॲम फ्री. मी स्वतंत्र आहे. मी मुक्त आहे.''*

मूळ कल्पना दृश्य-श्राव्य रूपात विस्तारित करीत स्पष्ट करण्याच्या दृष्टीने आवश्यक ते स्वातंत्र्य घेण्याचा हा प्रकार 'ट्रॅन्सलेशन'च्या मर्यादा ओलांडून ट्रॅन्स क्रिएशन- नवनिर्मितीकडे झेपावतो असे अनुवादिका अपर्णा वेलणकर अभिमानपूर्वक नोंदवतात; तो त्यांचा अभिमान सार्थ वाटतो.

त्यामुळेच मूळच्या साडेनऊशे पृष्ठांची मराठीत चौदाशे पृष्ठे झाली याचे आश्चर्य वाटू नये. मूळ इंग्रजीत पृष्ठावर ३७ ओळी आहेत, ओळींची लांबी ११.४ सेंटिमीटर - मराठीत ३३ ओळी आणि १० सेंटिमीटर यामुळेही मराठीत पानांत भर पडली आहे हेही लक्षात घ्यायला हवे.

आर्थर रोड कारागृहातील दिवस (१२५ पृष्ठे) अफगाणिस्तानचा पायी प्रवास (२०० पृष्ठे), प्रभाकरच्या सुंदर गावातील दिवस (८० पृष्ठे), झोपडपट्टीतील जीवन (१५० पृष्ठे) यात थोडेफार संपादकीय संस्कार झाले असते तर कादंबरीच्या मूळ आशयाला धक्का न लावताही तिची वाचनीयता वाढली असती. परकीय वाचकांना तो विस्ताराने सांगण्याची गरज असेल, मराठी वाचकांना ते थोडक्यात सांगूनही भागले असते.

लिन (लिंडसे) न्यूझीलंडचा खोटा पासपोर्ट मिळवून मुंबई विमानतळावर उतरतो. विमानप्रवासातच आपल्यासारख्या दोन कॅनेडियन तरुणांशी तो ओळख करून घेतो. पासपोर्टचा बनावटपणा इमिग्रेशनच्या लक्षात आला तर काय करायचे अशी चिंता लिनला भेडसावत असते. परंतु त्याच्या सुदैवाने इमिग्रेशनमधून तो सहीसलामत बाहेर पडतो. विमानतळावरून बसने फोर्ट भागात येतो. बसचा प्रवास हा भयानक गर्दीमुळे फारच जीवघेणा वाटतो.

मुंबईला विमानतळावर उतरल्याबरोबर त्याला येथील वासांचे वेगळेपण जाणवते. मसाल्यांचा वास, माशांचा वास, मुंबईचा वास. कोंदट, घामट उकाडा, दमटपणा...

वासाबरोबर दिसते ती माणसांची गर्दी. आसामी, पंजाबी, जाट, बिहारी, राजस्थानी, बंगाली, दक्षिण भारतीय, मराठा, ब्राह्मण, अस्पृश्य, हिंदू, ख्रिश्चन, मुस्लीम, बौद्ध, पारशी, जैन. आस्तिकनास्तिक. काळी. गोरी. सावळी. एकमेकांपेक्षा वेगळी, सुंदर दिसणारी, असंख्य माणसं. अगणित माणसं.

विमानतळावरून सामान घेऊन बाहेर पडल्यावर झालेली आपल्या स्वातंत्र्याची जाणीव.

नवा देश, नवा पासपोर्ट, नवी धाकधूक.

तशात 'सर, सर' म्हणत कोणीतरी लिनचा हात पकडतो.

लिनच्या पोटात खड्डा पडतो.

एक ठेंगणा, बुटका, मळका युनिफॉर्म घातलेला माणूस अस्ताव्यस्त हसत एक गिटार लिनच्या हाती देत म्हणतो, ''युवर म्युझिक सर. यू आर लुझिंग युवर म्युझिक सर.''

सामान घेताना लिनने गिटार बाजूला ठेवली ती तिथेच राहिली. तो माणूस ते गिटार नेमके लिनचे आहे हे ओळखून आणून देतो. लिनने पुढे केलेल्या नोटाही तो घेत नाही. ''नॉट मनी. वुई आर हिअर टू हेल्प सर. वेलकम टू इन इंडिया.'' आणि तो निघूनही जातो.

बसमध्ये खचाखच गर्दी. सामान टपावर.

आधी परिसर दिसतो तो स्वच्छ, प्रशस्त. आल्हादकारक. चार-सहा पदरी रस्ता.

पुढे लागते झोपडपट्टी. गलिच्छ. कचरा. चिखल. अर्धनग्न माणसे. झोपडपट्टीतील उघडेवाघडे संसार.

शेजारी बसलेला एक गोरा परदेशी तरुण म्हणतो, ''धीस इज युवर फर्स्ट टाइम? डोन्ट वरी. कचरा आणि झोपड्या– पण बाकीची मुंबई इतकी वाईट नाही... मुंबई म्हणजे खरा भारत नव्हे.''

तो शेजारचा तरुण रजनीशांच्या आश्रमात पुण्याला जाणार असतो. ''इट इज द बेस्ट आश्रम इन द कंट्री.''

तो पुढे म्हणतो, ''रात्री इथे मुक्काम करणार. हवं तर आपण तिघं हॉटेलात रूम शेअर करू. स्वस्तात पडेल.''

फोर्टमध्ये बस थांबते. विमानतळावर गिटार देणारा हसरा माणूस पुढे येतो. ''आय ॲम बॉंबे गाइड प्रभाकर. आय नो एव्हरीथिंग.''

''आय वॉट क्लीन, चीप हॉटेल.'' लिन त्याला म्हणतो. त्या तिघांना घेऊन प्रभाकर समुद्रकाठच्या इंडिया गेस्ट हाऊसमध्ये जातो... भाडे ठरते १२० रुपये.

नंतर प्रभाकर लिनला चरस आणून देतो. जेवायला हॉटेलात नेतो. ''मुंबईतले उत्तम फूड तुम्हाला खाऊ घालतो.'' असे तो म्हणतो.

''स्मोकिंग, ड्रिंकिंग, डान्सिग, म्युझिक, सेक्स, नो प्रॉब्लेम हिअर.'' प्रभाकर दिमाखात सांगतो.

लिन प्रभाकरला व्हिस्कीची बाटली भेट देतो.

हॉटेलात जाताना एका टपरीवाल्याला प्रभाकर ती बाटली विकतो.

त्यावेळी रस्त्यावरून जाणाऱ्या डबलडेकर बसची धडक लिनला बसणार, एवढ्यात एक तरुणी त्याला मागे खेचते. सुंदर, शिडशिडीत अंगकाठी, काळेभोर केस. युरोपियन. डौलदार. ''यू आर लकी. दॅट वाज क्लोज.'' ती त्याला वाचवते. तेवढ्यात एकजण तिला हाक मारतो. ''कार्ला, कम ऑन. यार.''

लिनला कार्ला आपली गार्डियन एंजल - संरक्षक देवदूत वाटते.

प्रभाकरही कार्लाला ओळखत असतो. कार्ला तुला हवीच काय? असे तो विचारतो. ''अशा हजारो मुली मुंबईत आहेत,'' असेही सांगतो.

लिओपाल्ड बीअरबारमध्ये प्रभाकर त्याला जेवणासाठी घेऊन जातो. कार्लाची तेथेही गाठ पडते. डिडिअर लेवी वगैरेही भेटतात. ''पैसा हेच दैवत'' असे लेवी मानतो.

मुंबईतला पहिला दिवस पार पडतो.

प्रभाकर, कार्ला, डिडिअर, लिओपोल्ड बार... एकेक मित्र आणि स्थळ आपलेसे होत जाते. मुंबईबद्दलची परकेपणाची भावना दूर होते.

भारतात कुणाशीही कुठलाही व्यवहार करताना नेहमी मन काय सांगेल ते ऐकायचे, डोके चालवण्याच्या भानगडीत पडायचे नाही. बुद्धीऐवजी भावनांच्या भरवशावर घेतलेले निर्णय जेथे अचूक ठरतात, असा जगाच्या पाठीवरचा एकमेव देश म्हणजे भारत - हे सूत्र लिनच्या मनावर पुढे बिंबते.

कार्लाची आणि लिनची चांगली घसट होते.

लिनला मुंबईची एकेक स्थळे ठाऊक होत जातात. प्रभाकर त्याचा गाइड असतो.

एका टॅक्सीवाल्याचे ड्रायव्हिंग भयानक असते. अपघात होतो. लोक ड्रायव्हरला बेदम मारतात.

प्रभाकर लिनला काही मराठी शब्द शिकवतो. प्रभाकर त्याला आपल्या खेड्यात नेतो. लिनचे तेथे 'शांताराम' असे नामकरण होते.

तेथून मुंबईला परतल्यावर लिन एका झोपडपट्टीत राहतो. डॉक्टरकी करतो. २५००० वस्तीत तो एकटा डॉक्टर.

माफिया डॉन अब्दुल कादर खान भाईचा चेला होऊन काळ्या पैशाचे व्यवहार कसे करायचे याचे धडे घेतो... प्रोफेशनल क्रिमिनल बनतो. माफिया गँगचे काम कसे

चालते ते उलगडत जाते. त्याचेही एक तात्त्विक अधिष्ठान.

डॉन फादरच्या प्रत्येक कृतीमागे एक हेतू असतो. एक ठाम विचार असतो. **''स्वत:चं प्राक्तन बदलण्याची क्षमता प्रत्येक माणसामध्ये असते, ही क्षमता म्हणजे त्याची इच्छाशक्ती असे कादरभाईचे प्रतिपादन असते. या पृथ्वीवर जगणाऱ्या प्रत्येक माणसाच्या हृदयाचा एकेक ठोका म्हणजे अगणित शक्यतांचं विश्व अशी त्याची श्रद्धा असते. माणूस आपलं आयुष्य बदलू शकतो असे लिनला त्याक्षणी जाणवतो. हा बदल घडवून आणायला प्रेमाचा एक हलकासा स्पर्शही पुरेसा असतो हेही त्याच्या लक्षात येते. मात्र आयुष्य हे प्रवाही हवे.''**

आणखी खूप काही 'शांताराम'मध्ये दिसते.

स्वत:च्या जगण्यातलं वास्तव नजरेआड करणारं सत्य-नियती घडवत असते.

सारे दुवे सलग जोडलेले संपूर्ण सत्य प्रेम आणि क्षमा दोन्हीपेक्षा मोठे असते.

मुंबईचं एक अजोड, असामान्य, अजरामर चैतन्य या कादंबरीत वेगवेगळ्या रूपांतून समोर येत राहते.

एक उन्नयन करणारा वाचनानुभव म्हणून शांतारामचे महत्त्व मनावर ठसते.

**किंमत : ९९०रु.    सभासदांना : सवलतीत    पोस्टेज : ४०रु.**
**सवलतीत : ८५०रु. सवलत ३० जून २०१० पर्यंत**

## सभासदांना सूचना


सध्या पोस्टातून अंक न मिळाल्याच्या किंवा उशिरा मिळत असल्याच्या तक्रारी खूप वाढल्या आहेत. आमचे पोस्टिंग दर महिन्याच्या ११ तारखेला नियमित होत असते. वाचकांनी कृपया गैरसमज करून घेऊ नये. आम्ही पोस्टाकडेही तक्रार नोंदवली आहे. तरीही अंक न मिळाल्यास फोन किंवा पत्र आल्याबरोबर आम्ही लगेच दुसरा अंक पाठवतो. तरी कृपया वाचकांनी ही वस्तुस्थिती समजून घेऊन सहकार्य करावे ही विनंती. गैरसमज नसावा.

**संपादक**

# पुस्तक परिचय

**गुन्हेगारांचे जग**
**सकृत्‌दर्शनी दिसते तसे सरळ, स्पष्ट नसते.**

# वन शॉट




**ली चाइल्ड** अनु. बाळ भागवत

ली चाइल्ड या लेखकाने १९९७ मध्ये वयाच्या चाळिशीनंतर थरारकथा लेखनाला प्रारंभ केला. गेल्या तेरा चौदा वर्षात त्याच्या कादंबऱ्या वर्षाला एक या वेगाने निघत आहेत.

जॅक रीचर ही मिलिटरी पोलिस इनव्हेस्टिगेटरची मध्यवर्ती व्यक्तिरेखा बहुतांश थरारकथांमध्ये त्याने रेखाटलेली आहे. पट्टीचा नेमबाज असलेला जॅक रीचर कुठलेही सामान न घेता अंगावरच्या कपड्यांनिशी प्रवास करायला सदैव सिद्ध असतो. साधारण दर्जाच्या हॉटेलात तो उतरतो. साधे कपडे वापरतो. नखरा-भपका यांचे त्याला वावडे असते. आपण जेम्स बाँडचा अवतार असा भ्रम त्याला नसतो. साथीदार म्हणून तो सहसा कोणाला बरोबर घेत नाही.

मिलिटरी पोलिस म्हणून गुन्हेगारांचा छडा लावण्यात तो तरबेज असून एखादे प्रकरण त्याच्याकडे तपासणीसाठी आले म्हणजे तो अत्यंत व्यावसायिक सफाईदारपणे ते हाताळतो. गुन्हेगाराचा वा दोषी व्यक्तीचा तो सावधपणे माग काढतो, पोलिस खात्याची कार्यपद्धती अचूक ठाऊक असल्याचे पोलिस ती केस कशी हाताळतील याची मानसिकता त्याला ज्ञात असते; पोलिस अधिकाऱ्याची ती मानसिकता लक्षात घेऊन तो त्यांचा योग्य तसा उपयोग करून घेतो; तर्कसंगत युक्तिवादाने त्या केसचा उलगडा झाल्यावर आपल्या प्रतिस्पर्ध्यांना किंवा विरोधकांना तो नेमके कोंडीत पकडतो आणि जरूर तर त्यांचा पूर्ण नि:पात करतो.

लेखक ली चाइल्ड हा खरे तर ब्रिटिश नागरिक. २९ ऑक्टोबर १९५४ हा त्याचा जन्मदिवस. कायद्याचा पदवीधर. परंतु वकिली करण्याऐवजी ग्रॅनेडा टेलिव्हिजनवर तो कामाला लागतो आणि पंधरा वर्षे निरनिराळ्या लघुपटांची, मालिकांची, कार्यक्रमांची निर्मिती करतो. जाहिरातींसाठी कॉपी लिहिणे, पडेल ते काम करणे, त्याची सगळ्या गोष्टींना तयारी असते. ब्राइडस् हेड रिव्हिजिटेड, दि ज्युएल इन दि क्राऊन, प्राइम सस्पेक्ट, क्रॅकर्स वगैरे ब्रिटिश टेलिव्हिजनवर गाजलेल्या मालिकांच्या निर्मितीत ली चाइल्डचा मोठा भाग होता. श्रेय नामावलीत नाव असो नसो, त्याची कामाची हौस दांडगी असे.

१९९५ साली त्याला ध्यानीमनी नसताना नोकरीतून काढल्याची पिंक स्लिप मिळाली. टीव्हीच्या पुनर्घटनेचे कारण देऊन लठ्ठ पगाराच्या जुन्या अधिकाऱ्यांना डच्चू देण्यात आला. त्यात आपलाही नंबर लागला म्हणून नाराज न होता ली चाइल्ड प्राप्त परिस्थितीला तोंड द्यायचे ठरवतो. तसे लेखनाचे अंग त्याला होतेच. नाट्यक्षेत्राचेही आकर्षण होते. टेलिव्हिजन केंद्रामुळे विविध प्रकारचे कार्यक्रम तसेच चित्रीकरण करण्याचेही तंत्र अवगत झाले होते. कायद्याचा पदवीधर असल्याने कोर्टाच्या कामकाजाचे ज्ञान होते. नोकरी गेल्यावर पुढे काय हा प्रश्न होता. पत्नी, मुलगी यांची जबाबदारी

होती. नोकरीवरून काढताना देण्यात आलेल्या धनादेशावर काहीकाळ गुजराण होणे शक्य होते.

...आणि त्या नोकरीनंतरच्या मोकळ्या वेळात घरबसल्या ली चाइल्डच्या डोक्यात एका थरारकथेची कल्पना संचार करू लागली.

जॅक रीचर ही एक मिलिटरी पोलिसची व्यक्तिरेखा त्याच्यापुढे उभी राहिली. ती मध्यवर्ती धरून एक कथावस्तू त्याच्या मनात आकार घेऊ लागली.

...दोन महिन्यात थरारकथा टाइप होते. एका एजंटला ती दाखवण्यात येते.

तो एजंट ती थरारकथा वाचून म्हणतो, ''चांगली जमली आहे. कथावस्तू वाचकाला खिळवून ठेवणारी आहे... मी प्रकाशक बघतो.''

ली चाइल्डचे नशीब एकूण जोरदारच म्हणायला हवे. प्रकाशकाला ती थरारकथा पसंत पडते.

'किलिंग फ्लोअर' ही जॅक रीचरची पहिली थरारकथा १९९७ मध्ये प्रकाशित होते. तिच्यावर वृत्तपत्रांतून चांगले अभिप्राय येतात.

थरारकथा समीक्षक संघटनेचे उत्कृष्ट नवप्रकाशित थरारकथेचे ॲवॉर्ड तिला जाहीर होते. अँथनी ॲवार्डचाही सन्मान तिला लाभतो.

दरवर्षी एक तरी कादंबरी लिहिण्याचा करार करायला ली चाइल्डला प्रकाशक भाग पाडतो.

चित्रपटासाठी थरारकथेचे हक्क घेण्याची तयारी एक निर्माता दाखवतो. पण ली चाइल्ड आत्ताच काय घाई आहे, अजून दोनतीन कादंबऱ्या बाजारात येऊ दे असे म्हणून निर्मात्याला थोपवून धरतो. इंग्लंडपेक्षा अमेरिकेत चित्रपट निघाला तर प्राप्ती चांगली होईल असाही एक आडाखा ली चाइल्डच्या मनात असतोच.

गॉन टुमॉरो, सिक्स्टीवन अवर्स, डाय ट्रायिंग, ट्रिपवायर, दि एनिमी, रनिंग ब्लाइंड, विदाऊट फेल, बॅड लक अँड ट्रबल, दि हार्ड वे, एको बर्निंग, पर्स्वेंडर, नथींग टू लूज या त्याच्या कादंबऱ्या आज बाजारात उपलब्ध आहेत. चित्रपटाचा योग अजून यायचा आहे. पण कादंबऱ्यांची विक्री जोरात चालू आहे. त्यामुळे मानधन भरपूर मिळते. पैशाची ददात नाही.

वन शॉट ही त्याची थरारकथा इ. स. २००५ मध्ये प्रसिद्ध झाली.

या थरारकथेच्या पहिल्याच प्रकरणात आपल्याला एक रायफलधारी पुरुष मिनिव्हॅनमधून संथ गतीने फर्स्ट स्ट्रीटचा टेकडीवरचा चढ पार करून पार्किंग लॉटमध्ये प्रवेश करून, एक क्वार्टर पार्किंग मीटरमध्ये टाकून दुसऱ्या मजल्यावरच्या मागच्या बाजूला टोकाशी असलेल्या ट्रॅफिक कोन दूर करून गाडी उभी करताना दिसतो. पार्किंगमधला गुप्त कॅमेरा हे सर्व टिपत असतो.

अंगावर रेनकोट, डोक्यावर सैलसर हॅट, लाल रंगाच्या दोन छटा असलेला हॅटवरचा पट्टा, डोळ्यावर गॉगल, हातमोजे... असा त्या ड्रायव्हरचा अवतार. व्हॅन उभी करून तो गाडीशेजारी स्तब्ध उभा राहतो. त्याचे बूट वाळवंटात वापरण्यायोग्य, क्लार्क्स कंपनीने बनवलेले खाकी, स्वेड, पांढऱ्या क्रेप सोल्सचे. साठ वर्षात न बदललेले डिझाईन.

मिनिव्हॅनचा मागचा सरकता दरवाजा उघडून, आतले गुंडाळी केलेले ब्लँकेट तो उघडतो, त्यातील स्प्रिंगफिल्ड एम.१-ए सुपर मॅच ऑटो लोडर रायफल बाहेर काढतो. तिचा अक्रोडाच्या लाकडाचा दस्ता, वजनदार नळी. दहा गोळ्यांचे बॉक्स मॅगेझिन... बोल्टगनमधली उत्कृष्ट रायफल. लेक सिटी एम ८५२च्या गोळ्या भरलेल्या. हॉलो पॉइंट, बोटटेल बुलेट्स.

गॅरेजच्या भिंतीच्याजवळ जमिनीला चिकटून तो झोपतो. मग बसतो. गुडघ्यावर टेकतो. उजवा पाय दुमडून घेतो. डाव्या पायाचा खालचा भाग ताठ उभा करतो. डावे कोपर डाव्या गुडघ्यावर टेकून रायफल उचलतो. दस्ताचा पुढचा भाग काँक्रिटच्या भिंतीवर टेकवतो. श्वास आत घेतो. एक गोळी एक बळी हे नेमबाजीचे सूत्र मनात घोळवत मन शांत राखत सात मिनिटे स्तब्ध राहतो.

शुक्रवार संध्याकाळचे पाच वाजतात. उजवीकडच्या सरकारी कार्यालयातले कर्मचारी बाहेर पडतात.

रायफलधारी नेमके सावज बघून रायफलचा चाप खेचतो.

प्लाझाची भिंत आणि तलावाची भिंत यातल्या अरुंद जागेत बारा माणसे अडकलेली असतात.

पहिली गोळी एका माणसाच्या डोक्यात घुसते, तो खाली कोसळतो. पहिला बळी.

तो पुन्हा चाप खेचतो.

दुसरी गोळी पुढच्या माणसाच्या डोक्यात घुसते.

तिसरी गोळी एका स्त्रीच्या डोक्यात.

तीन शॉट्स् दोन सेकंदात... तीन जण खलास.

उरलेले नऊ जण पळत सुटतात.

चौथी गोळी एका सूट घातलेल्या माणसाच्या डोक्यात घुसते.

पाचवी गोळी एका स्त्रीच्या खांद्याजवळून सणसणत जात पाण्यात घुसते. नाहीशी होते.

सहावी गोळी मारताना रायफलधारी दिशा बदलतो.

ती गोळी पुढच्या माणसाच्या नाकातून आत घुसते. त्याच्या डोक्याचे तुकडे

उडतात.

रायफलधारी माणूस गोळीबार थांबवतो. रायफल मागे घेतो. गोळ्यांची आवरणे गोळा करतो. पाच शेल्स मिळतात. सहावे घरंगळत अर्धा इंच रुंद-नऊ इंच खोल फटीत पडते. ते मिळवणे अवघड. ते तसेच सोडून पाच शेल्स रेनकोटच्या खिशात टाकून तो आपल्या व्हॅनपर्यंत पोचतो. रायफल ब्लँकेटमध्ये गुंडाळून मागचा दरवाजा बंद करतो. व्हॅन सुरू करतो आणि एक्झीट रॅम्पकडे व्हॅन दौडवतो. पोलिसांच्या गाड्यांचे सायरन्स ऐकू येतात. तो त्यांच्या विरुद्ध दिशेने व्हॅन पळवतो.

काम फत्ते. सहा गोळ्यांत पाच बळी. सहीसलामत सुटका.

मिनिव्हॅन एका घरापुढे थांबते. गॅरेज उघडते. व्हॅन आत. ड्रायव्हर मागच्या बाजूच्या मडरूममधून किचनमध्ये जातो. कुत्र्याला कुरवाळतो. टीव्ही सुरू करतो.

पोलीस यंत्रणा लगेच कामाला लागते.

क्राइम स्क्वॅडमधला सर्वांत वरिष्ठ डिटेक्टिव्ह इमर्सन गुन्ह्याच्या जागी पोचतो.

एका माथेफिरू माणसाचे हे काम आहे. स्वयंचलित रायफल, अंदाधुंद गोळीबार. निसटता कामा नये. बुलेटप्रूफ जॅकेट घातलेले पॅरामेडिक्स बळींच्या जवळ जाऊन पाहणी करतात.

इमर्सन शेकडो लोकांशी बोलून वस्तुस्थितीचा छडा लावतो.

टीव्ही केंद्राची प्रमुख वार्ताहर ॲन यान्नी बातम्यांचा धडाका सुरू करते.

गोळीच्या आवरणावरचे बोटांचे ठसे... इतर पुरावे...

हे काम जेम्स बार याचे असावे... तो सैन्यदलात होता. १४ वर्षांपूर्वी सैन्यातून सन्मानपूर्वक मुक्तता. विशेष नेमबाज. स्नायपर. इथून जवळच राहतो. गल्फवॉरमध्ये सहभाग.

जेम्स बारला अटक करण्याचे वॉरंट मिळवण्यात येते.

जेम्स बार घरी झोपलेला आढळतो. एकटाच.

पोलीस त्याला ताब्यात घेतात. रायफल जप्त करतात.

जेम्स बारची बहीण डेव्हिड चॅपमन या ॲटर्नीच्या कार्यालयात काम करते. तिच्या विनंतीवरून डेव्हिड जेम्सला भेटायला तुरुंगात येतो. 'तुझ्यावर फार गंभीर आरोप आहेत.'

पण जेम्स बार काही बोलत नाही.

''तुला स्वत:ला वाचवायचे नसेल तर मी तुला कशी मदत करणार?''

**''त्यांनी चुकीच्या माणसाला पकडले आहे.'' जेम्स बार म्हणतो.**

''नाकबूल करणे ही शहाणपणाची गोष्ट ठरणार नाही, तुझ्याविरुद्ध भक्कम पुरावा आहे.''

**''माझ्यासाठी जॅक रीचरला बोलवा.''**

''कुठे असतो तो? डॉक्टर आहे का?''

पण जेम्स बार त्या पुढे काही बोलत नाही...

जॅक रीचर टीव्हीवर जेम्स बारची बातमी बघतो. तो मियामीला असतो. तेथून ४८ तास बस प्रवास करून तो वॉशिंग्टनला जेम्स बारला भेटायला येतो.

परंतु त्या आधीच जेम्स बार कोमात जातो. त्यामुळे त्याला अटक करणे वा त्यावर चार्जशीट ठेवणे शक्य होत नाही.

जेम्स बार हा एक उत्कृष्ट नेमबाज म्हणून जॅक रीचरला ठाऊक असतो. जॅक स्वत:ही उत्कृष्ट नेमबाज असतो.

जेम्स बारने सहा गोळ्या मारल्या. पाच बळी घेतले. एक गोळी वाया गेली. हे काम जेम्स बारचे असणेच शक्य नाही असा जॅक रीचरचा विश्वास असतो. त्यामुळेच जेम्स बारला या प्रकरणात मुद्दाम अडकवण्यात आले आहे असा संशय जॅक रीचरला येतो.

तो जेम्स बारच्या बहिणीला भेटतो. ॲटर्नीला भेटतो. डॉक्टरांना भेटतो.

टीव्ही वार्ताहर ॲन यान्नीला भेटतो. त्याचवेळी त्याच्यावर हल्ला होतो. आपण या शहरात आलो हे कोणाला तरी खटकते आहे हे जॅक रीचरच्या लक्षात येते.

हेलेन रोदिन ही जेम्सच्या बहिणीची मैत्रीण. ती जेम्सची केस हातात घेते.

हेलेनचे वडील हे ॲलेक्स रोदिन जेम्सची केस घेण्याचे टाळतात. त्यांना हरणारी केस नको असते. हे हेलेनलाही तू ही केस घेऊ नकोस असा सल्ला देतात. केस हरणे आणि पैसे गमावणे दोन्ही गोष्टी टाळाव्या असे त्यांचे मत.

जॅक रीचर जेम्स बारच्या घराला भेट देतो. त्याचे मित्र कोण याची चौकशी करतो.

जेम्सच्या संभाव्य विरोधकांचा शोध जॅक घेतो. मूळ रशियन असणाऱ्या चेन्को रस्किन, व्हेक, ग्रिगोर लिन्स्की, सॉकोलाव्ह, व्हादिमीर... यांची टोळी त्याला काम करताना दिसते.

नेमबाजीच्या सरावासाठी जेम्सबार हा गनी सॅम्युएल कॅश याच्या केंटकीमधील शूटिंग रेंजवर अधूनमधून जात असतो. त्याचे तेथील रेकॉर्डही जॅक बघतो. जेम्सबरोबर चार्ली नावाचा त्याचा मित्रही नेहमी येत असे, पण त्याची नेमबाजी बेतासबात होती असे कॅशकडून त्याला सांगण्यात येते.

चार्ली बुटका असतो. जेम्सच्या घराची त्याला चांगली माहिती असते. त्याच्या कुत्र्याशीही त्याची ओळख असते.

जॅक रीचरला हा चार्ली म्हणजे रशियन चेन्को आहे असा संशय येतो.

जॅक रीचर जेम्स बारच्या गोळ्यांना बाळी पडलेल्या पाच जणांची माहिती मिळवतो. त्याने घेतलेले बळी हे अपघाती नव्हते. ते सहेतुक बळी होते असे त्याला वाटते. रशियनांशी त्यांचा संबंध असणार असाही त्याचा आडाखा असतो. पूर्वायुष्यातील काहीतरी घटनांचा या हत्यांशी संबंध असायला हवा, हे त्याला कळते.

जेम्स बारच्या डॉक्टरांचे रिपोर्ट बघितल्यावर जॅक रीचर हेलेनला म्हणतो, ''जेम्स बार याने हे खून केलेले नाहीत. त्याला बळीचा बकरा बनवण्यात आले आहे.''

...पोलीस डिटेक्टिव्ह इमर्सन, ॲलेक्स रोदिन, हेलेन रोदिन, रोझमेरी बार सर्वच जण बुचकळ्यात पडतात.

...जॅक रीचरला बोलावा असे जेम्स बारने ॲटर्नी डेव्हिडला का सांगितले असावे याचा शेवटी उलगडा होतो.

तो मूळातूनच वाचणे सोयीचे.

ली चाइल्डच्या कल्पकतेचे कौतुक करावे तेवढे थोडेच!


**किंमत : ३४०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : ३०रु.**

२री आवृत्ती

## द अफगाण

**फ्रेडरिक फोरसिथ**

अनु. बाळ भागवत




**२००रु. पोस्टेज २५रु.**

रेड फ्लॅग नोटिस जारी केलेल्या फोनवरून केला गेलेला एकच फोन, छापा मारल्यावर लॅपटॉप हातात पडू नये म्हणून त्याची मोडतोड करायचा प्रयत्न, स्वत: पकडले जाऊ नये म्हणून चौथ्या मजल्यावरून घेतलेली उडी ब्रिटिश आणि अमेरिकन इन्टेलिजन्स एजन्सीजची एवढीच खात्री पटते की, जगाला थक्क करेल अशा भयानक घातपाताचा कट अल काईदाने रचलेला आहे. पण तो कोणत्या स्वरूपाचा आहे, कधी घडणार आहे आणि लक्ष्य काय आहे याचा थांगपत्ता लागत नाही. अल काईदामध्ये स्वत:चा माणूस घुसवून कुठल्याही तऱ्हेची माहिती काढणे आजपर्यंत त्यांना कधीही जमलेले नाही.अफगाण आहे इझमत खान, ग्वाटेनामो बे इथे पाच वर्षे तुरुंगात असलेला तालिबान कमांडरआणि अफगाण आहे इराकमध्ये जन्मलेला, पंचवीस वर्षे जगाच्या कानाकोपऱ्यात लढल्या गेलेल्या युद्धांचा अनुभव असलेला कर्नल माईक मार्टिन.

जबरदस्त पूर्वतयारी आणि दैवावरच भरवसा ठेवून, जिथल्या भीषण गोष्टींची कल्पना करणेही केवळ अशक्य आहे, अशा अंधाऱ्या अरब जगतात अरब म्हणून इझमत खान म्हणून वावरत कर्नल माईक मार्टिन त्या कटाचा छडा लावू शकेल?

# T बुक क्लब १८

**सभासद फी ५०रु. आजच सभासद व्हा!**

**पाचवे पुस्तक**




## द फर्म

**जॉन ग्रिशॅम** अनु. अनिल काळे

**४४०रु. सभासदांना २२०रु.**
**पोस्टेज ४०रु.**


एक माफिया फॅमिली :
विविध प्रकारच्या गुन्ह्यांमधून जमवलेला
प्रचंड काळा पैसा पांढरा करणारी...
त्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकणारी...
एका वकिलांची फर्म :
माफिया फॅमिलीचा सभ्य धुवट चेहरा असलेली...
फॅमिलीच्या काळ्या पैशाचं बेमालूमपणे
'शुद्धीकरण' करणारी... एक वकील :
नुकताच शिक्षण घेऊन बाहेर पडलेला अत्यंत हुशार, चलाख तरुण फर्ममध्ये नोकरी मिळवतो. त्याला आणि त्याच्या सुंदर बायकोला स्वप्नं पडतात ती फक्त उज्ज्वल भविष्यकाळ, भरपूर पैसा, बीएमडब्ल्यू यांची. प्रत्यक्षात मात्र दोघंही एकीकडे माफिया फॅमिली, तर दुसरीकडे एफबीआय, अशा कात्रीत सापडतात...
आणि जीव वाचवण्यासाठी पळत सुटतात...
दिशा मिळेल तिकडे.

# पुस्तक परिचय

कौटुंबिक अत्याचारावर अकुंश आणणारी एक लँडमार्क केस

**नवऱ्याच्या छळाला वैतागून किरणजीत त्याच्या बिछान्यावर पेट्रोल ओतून त्याला पेटवून देते, आणि...**

# सर्कल ऑफ लाइट




**किरणजीत अहलुवालिया आणि राहिला गुप्ता**

अनु. उषा महाजन

'सर्कल ऑफ लाइट' ही किरणजीत अहलुवालिया हिची आत्मकथा १९९७ मध्ये प्रथम इंग्रजीत प्रसिद्ध झाली. 'पुरुषांच्या हातून अनन्वित छळ झालेल्या समस्त महिलांना' ती अर्पण करण्यात आली आहे.

भारतात पंजाबमध्ये, फगवाडा शहराजवळच्या चक-कलाल या छोट्या गावातील शीख कुटुंबातील पाच भाऊ आणि तीन बहिणी असा मोठा गोतावळा असलेली किरणजीत अहलुवालिया वयाच्या २४व्या वर्षी इंग्लंडमध्ये राहणाऱ्या दीपक या शीख तरुणाशी विवाह करण्यासाठी क्रॉले या भागात राहणाऱ्या विवाहित बहिणीच्या घरी पोचते. दीपकचे घर तेथून जवळच असते. दीपकची लग्नाची खरेदी चालू असताना किरणजीतला त्याच्या स्वभावातला रागीटपणा अनुभवायला मिळतो. दीपकच्या एका मैत्रिणीकडे जाण्याचे ती टाळते तेव्हा तो रागाने म्हणतो, ''मला नाही हिच्याशी लग्न करायचे. समजते काय ही स्वत:ला? खोटारडी, वाया गेलेली मुलगी आहे ही! मी नाही हिचे नखरे चालवून घेणार. मैत्रिणीकडे आधी येते म्हणाली. आता नाही म्हणतेय. मी थकलेय म्हणतेय. महाराणीच लागून गेलीय जणू.''

दीपकची आई त्यावर त्याला फैलावर घेते. ''अरे, इतक्यातच आपलं खरं रूप तिला दाखवतोस काय? तिने आपल्या घरच्या लोकांना हे सांगितलं तर लग्न मोडतील ते. माझी लाज बाहेर काढणार तू–''

किरणजीतला वाटते, हे लग्न करू नये. घरच्यांना आताच सांगावे.

पण पुन्हा स्थळ धुंडाळणे... परत तेच दिव्य... त्यामुळे ती गप्प राहते.

मेंदी, संगीतसंध्या वगैरे कार्यक्रम होतात. त्यावेळी किरणजीतचा हात मुठ्ठी तळताना भाजतो. हा अपशकुनच झाला असे तिला वाटते.

लग्नाच्या आदल्या दिवशी दीपकच्या घरी नाचगाण्याचा मोठा कार्यक्रम होतो. त्यांच्या घरातलं पहिलं लग्न. सर्वांचाच उत्साह.

लंडनमधल्या साऊथहॉल भागातील एका सार्वजनिक हॉलमध्ये लग्न होते. ग्रंथसाहिबभोवती फेरे चालू असताना किरणजीतला आपल्या वडिलांची आठवण येऊन रडू अनावर होते. किरणजीत चार महिन्यांची असतानाच ते पेनिसिलीनच्या इंजेक्शनची रिॲक्शन येऊन मरण पावले होते. मामा, मावशी, भावंडे, भावजया आई- सर्वांच्या प्रेमाच्या वर्षावात ती लहानाची मोठी झालेली असते.

लग्नानंतरच्या पहिल्या रात्रीच दीपकचा आडदांड धसमुसळेपणा किरणजीतला खूप वेदनादायक ठरतो. वेदनेने कण्हताना त्याचे न पेलणारे वजन तिला गुदमरून टाकते. सकाळी उठण्याचे त्राणही उरत नाही. सगळे अंग ठणकत राहते. दीपक तिला फैलावर घेतो. दीपकची आई त्याला म्हणते, ''तू खाली जा. पुरुषात बस. इथं बायकात बसू नकोस.'' दीपक तिलाच डाफरून म्हणतो, ''माझी बायको आहे ही. मी तिला हवं तसं वागवीन. तिच्यावर हुकमत गाजवशील तर याद राख.''

रात्री किरणजीत दीपकला हॉटेलच्या खोलीत आल्यावर सांगते, ''माझ्या पायात भयंकर वेदना होताहेत. मला आज सेक्सची अजिबात इच्छा नाही. मी तुझीच आहे. पण एक दिवस कळ काढ.'' दीपक त्या दिवशी ते मान्य करतो. मात्र एका अटीवर. ''नंतर राजीखुशीनं सर्व करायला हवंस.''

...परंतु दीपकच्या स्वभावातील संशयीपणा, लंपटपणा, छळवादीपणा, किरणजीतला मारहाण करणे, टाकून बोलणे, अपमान करणे, केस ओढत फरफटत नेणे वगैरे प्रकार सर्रास चालू राहतात.

...किरणजीतला दिवस जातात. मुलगी होते. त्यानंतरही दीपकच्या वागण्यात काही फरक पडत नाही.

''दहा वर्षे मी फक्त भीती, भीती आणि भीतीच्याच पोटी काढली,'' असे किरणजीत म्हणते. (पृष्ठ ८१)

दीपक शेजारी झोपताना आपण एखाद्या राक्षसाशेजारी झोपलोय असे जाणवे. हा कधी घाव घालील नेम नाही. रात्रभर डोळ्याला डोळा लागत नसे.

एखादा पदार्थ आवडला नाही तर जेवताना तो सगळी प्लेट सिंकमध्ये फेकून देई. मसाल्याच्या डब्यात पाणी ओतण्याची धमकी देई. सासू-सासरे रात्रपाळीवर कामाला गेले की या दोघांमध्ये भांडणे होत.

''मी दीपकची मालमत्ता होते. माणूस नव्हते. माझ्या स्वत:च्या काही इच्छा नव्हत्या. स्वप्ने नव्हती. तो जे सांगेल तेच करायचे, तेच खायचे.'' (८३)

दीपक पॅरानॉइड होता. सगळेजण आपल्याविरुद्ध कट करताहेत, आपल्याविरुद्ध बायकोचे कान भरताहेत असे त्याला वाटे.

''शिव्या, मारझोड, ठोसे मारणे, आरडाओरडा, आदळआपट, किंचाळणे, काचेच्या वस्तू फोडणे अशा आसुरी प्रकारांनी भरलेलं माझं आयुष्य म्हणजे एक न संपणारं चक्र बनून गेलं होतं... एवढं सगळं सोसून मला दीपकच्या सेक्सच्या मागणीपुढं शरण जावं लागायचं... गप्प बस, नाहीतर ते तुझ्या तोंडात खुपसेन आणि... मी एक स्त्री होते. म्हणून मला अशा संकटांना तोंड द्यावे लागत होते. हे वास्तव स्वीकारण्याऐवजी मी माझ्या नशिबालाच दोष देत असे. पूर्वजन्मात आपण काहीतरी भयंकर पाप केलं असावं...'' (८५)

आपल्या भावांना हे सारं कळवावं असा विचार मनात येई. पण ती तो दाबून टाके. आपले भाऊ दीपकला खूप ठोकतील... त्याचे हातपाय मोडून टाकतील असे भय तिला वाटे... दीपक तिच्या भावांना टरकून असे...

आत्महत्या करण्याचे विचारही किरणजीतच्या मनात वरचेवर येत. चालत्या रेल्वेगाडीपुढे झोकून द्यावे असे वाटे. ''असला कसला नवरा माझ्या वाट्याला आला होता? तो मला जगूही देत नव्हता, मरूही देत नव्हता. रात्रंदिवस मला पिळवटून काढत होता. माझं शोषण करीत होता. त्याच्या लहरीवर सर्व काही चालायचे.'' (१०२)

घटस्फोटाचे विचारही मनात येत पण घटस्फोट घेणे म्हणजे स्वत:ला काळिमा फासणे होय असे तिला वाटे. (११५)

दीपक प्लॅस्टिक फॅक्टरीमध्ये मशीन ऑपरेटरचे काम करी. ते सोडून पुढे त्याने ब्रिटिश रेल्वेमध्ये गार्डची नोकरी धरली.

१९८१ मध्ये किरणजीत बेल अँड चर्च या कॉस्टिक सोडा फॅक्टरीत तिच्या आईच्या शिफारशीने व प्रयत्नाने नोकरी मिळवते. पुढे गॅटविक विमानतळावरच्या रेस्टॉरंटमध्ये ग्राहकांना शीतपेये व खाद्यपदार्थ देण्याचा जॉब या मायलेकींना मिळतो.

१९८३ मध्ये किरणजीत टॉमी या आपल्या भावाला फोनवर सांगते, ''दीपकबरोबर राहून माझ्या वाट्याला दु:खाखेरीज काहीही आलेलं नाही. त्याला कायमचं सोडून द्यावं असं मला वाटतंय.''

या फोनची माहिती मिळाल्यावर दीपक किरणजीतला मारहाण करतो. तिला कामावर जाऊ देत नाही. स्वत:ही कामावर जात नाही. तिच्यावर जणू पहारा देत बसतो.

त्याच दिवशी किरणजीत पॅरासिटॅमलच्या वीस गोळ्या गिळून टाकते. आपल्या नऊ भावंडांना निरोपाची पत्रे लिहिते. तेवढ्यात टॉमी तिला भेटायला येतो, ''आमच्याबरोबर चल. तुला घेऊन जायला आलोय.'' असे तो म्हणतो.

त्यावर ती उत्तर देते, ''आता खूप उशीर झाला तुला. मला जगावंसंच वाटत नाही. या बघ– या गोळ्या मी घेतल्यात. ही पत्रं वाच.''

टॉमी तिला हॉस्पिटलमध्ये घेऊन जातो. वाटेत उलट्या होतात. तिच्या पोटातून विषारी द्रव्यं धुवून बाहेर काढतात. रात्री तिला हॉस्पिटलमध्ये ठेवतात.

किरणजीतला मारहाण चालूच राहते. तेव्हा ती वकिलाचा सल्ला घेते.

जिन्यावरून एकदा दीपक तिला ढकलतो. तिची करंगळी मोडते. वकील न्यायाधीशांकडे तिला घेऊन जातो. दीपकला कोर्टाकडून नोटिस येते. तो थैमान घालतो. तशात किरणजीत गरोदर राहते. वकील तिला केस मागे घेण्याचा सल्ला देतात.

किरणजीत बाळंत होते. मुलगा होतो. संदीप नाव ठेवतात.

दीपक संदीपशी प्रेमाने वागतो. घरातले वातावरण चांगले राहते.

पुन्हा किरणजीतला दिवस जातात. राजीवचा जन्म होतो. दीपकला पोस्ट ऑफिसमध्ये नोकरी मिळते.

दोन मुलांचे संगोपन करताना किरणजीतची फारच धावपळ होते.

१९८६ मध्ये दीपक स्वत:च्या नव्या घरात राहण्यास जातो. किरणजीतलाही स्वप्नपूर्तीचा आनंद होतो.

१९८९ मध्ये किरणजीतला एक फोन येतो, ''तुमच्या नवऱ्याचं बाहेर एक

प्रेमप्रकरण चालू आहे.''

दोघांत पुन्हा वाद सुरू होतो. दीपकशी बोलण्याचा शेवट किरणजीतच्या मारहाणीत हे ठरलेलं.

दीपकचे एका गोऱ्या बाईबरोबरचे अफेअर चालू असल्याचे स्पष्ट होते. दीपक किरणजीतला म्हणतो, ''मी हे घर सोडून जाणार आहे.'' तेव्हा किरणजीत त्याला पत्र लिहून कळवते, ''संदीप आणि राजीव यांना आईवडील म्हणून आपल्या दोघांचीही गरज आहे. या पत्राद्वारे मी अखेरची विनंती करते. आपण दहा वर्षे बरोबर घालवली. मला आता फक्त दहा मिनिटे दे. तुला माझ्याबरोबर राहायचं नसेल तर माझी हरकत नाही. मुलांसाठी तरी काळजीपूर्वक वागायला हवं.''

दीपकचे त्या गोऱ्या बाईबरोबर संबंध चालूच राहतात. त्यावरून वादावादी, मारहाण हे प्रकार नित्याचेच.

८ मे १९८९ रोजी मध्यरात्री दीपकच्या खोलीत जाऊन किरणजीत त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न करते. पण तो काही न बोलता झोपून राहतो. किरणजीत पेट्रोलचा कॅन त्याच्या गादीवर रिकामा करते. प्लॅस्टिकच्या कपात पेटती मेणबत्ती ठेवून ती गादीजवळच्या टेबलावर ठेवते. पेटता पलिता दीपकच्या खोलीत टाकून तिचे दार बाहेरून लावून घेते.

खोली पेट घेते. लोक रस्त्यावर गर्दी करतात.

दीपकचे पाय पेटलेले असतात. ते ब्लँकेटमध्ये गुंडाळलेले असतात.

अँब्युलन्स येते. अग्निशामक दलाचे बंब येतात.

किरणजीतचे हातही भाजलेले असतात. हॉस्पिटलमध्ये उपचार होतात...

आठ दिवस दीपक मृत्यूशी टक्कर देत असतो. नंतर त्याचा जीव जातो.

किरणजीतला जन्मठेपेची शिक्षा होते.

परंतु तिची केस पुढे साऊथहॉल ब्लॅक सिस्टर्स (एसबीएस) संस्थेच्या नजरेला येते. किरणजीतवरील खटला नव्याने चालवला जातो. किरणजीतची निर्दोष म्हणून सुटका होते. २००१ सालचे एशियन वुमेन्स अॅवॉर्ड तिला देण्यात येते. साऊथहॉल ब्लॅक सिस्टर्सच्या संपादिका राहिला गुप्ता या किरणजीतच्या केसची संपूर्ण माहिती घेऊन तिचे आत्मकथन सिद्ध करतात.


इ. स. २००७ मध्ये तिच्या जीवनावर आधारलेला 'प्रव्होक्ड' हा चित्रपट कान्स महोत्सवात गाजतो.

घरगुती हिंसाचाराविरुद्ध लढण्याचे बळ देणारी ही आत्मकथा अनेक पीडित व्यथित महिलांच्या जीवनात नवा प्रकाश आणणारी आहे.

**किंमत : ३५०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : ३०रु.**

नवे कोरे

# स्लमगर्ल ड्रिमिंग




**रुबिना अली**
अनु. **मैत्रेयी जोशी**

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

रुबिना अली. मुंबईतल्या झोपडपट्टीत राहून चंदेरी चित्रपटसृष्टीतली चमचमती तारका बनण्याचे स्वप्न पाहणारी एक सिनेमावेडी मुलगी. वय केवळ ८-९ वर्षांचं.

तिचं हे स्वप्न एक दिवस खरोखरीच साकार होतं आणि ती थेट ऑस्करपर्यंत मजल मारते.

'स्लमडॉग मिलीयनेअर' मधल्या या चिमुरड्या चित्रतारकेचा हा ऑस्करपर्यंतचा प्रवास आपल्याला या पुस्तकात बघायला मिळेल. तोही तिच्याच शब्दांत!

ऑस्कर जिंकूनही पुन्हा त्याच बकाल वस्तीत परत येणाऱ्या रुबिनामध्ये बालसुलभ निरागसता आणि परिस्थितीनं शिकवलेलं शहाणपण यांचं मजेदार मिश्रण आढळतं. कादंबरीच्या अखेरच्या भागात तर अतिक्रमण विभागाकडून तिचं ते झोपडंही पाडण्यात येतं आणि नाईलाजाने तिला तिच्या अब्बांच्या मित्राच्या घरी राहायला जावं लागतं.

एकीकडं चटका देणारं दाहक वास्तव तर दुसरीकडे हॉलिवूडच्या झगमगत्या दुनियेत अनुभवलेली 'रेड कार्पेट ट्रीटमेंट'! तो मानसन्मान, ते सत्कार समारंभ, ती यशाची धुंदी!... या साऱ्यांचा ताळमेळ घालत रुबिना एक दिवस फार मोठी अभिनेत्री बनण्याची स्वप्नं पाहत आहे.

हा तिचा दुर्दम्य आशावाद कौतुकास्पदच!

# पुस्तक परिचय

**शास्त्रीय संशोधक आणि शोध यांच्या कल्पनेपेक्षाही चमत्कृतिपूर्ण कहाण्या**

# विज्ञानातील सरस आणि सुरस




**राहुल गोखले**

'विज्ञानातील सरस आणि सुरस' हे पुस्तक नावाप्रमाणेच वाचनीय आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'केसरी'मध्ये वर्षभर सदर म्हणून लिहिलेल्या ५२ लेखांचे हे संकलन आहे. या लेखांमध्ये विविधता आहे. शास्त्रज्ञ, संशोधक, उद्योजकांचे धावते परिचय काही लेखांत वाचायला मिळतात. प्राणवायूचा शोध, भूलशास्त्रातील प्रगती, ॲस्पिरिनची किमया, विजेच्या बल्बचा शोध व प्रसार, शिवणयंत्राचा शोध, मलेरियाच्या जंतूंचा शोध व बंदोबस्त, रक्तगटांचा शोध, क्ष किरणांचा शोध, पेनिसिलीनचा वापर, नायलॉनची उपयुक्तता, निऑन साइन्स, विमानाचे उड्डाण, चौकातले सिग्नल्स, मद्यपान करून वाहन चालवणाऱ्यांवर अंकुश ठेवणाऱ्या चाचण्या, इन्शुलिन व मधुमेह, झेरॉक्सचे तंत्र, हृदयरोपणाची शस्त्रक्रिया, कृत्रिम लेन्सने रुग्णाला नवी दृष्टी देणे, रेफ्रिजरेटर, अणुबॉंब, गुन्हेगारांचा शोध घेणाऱ्या लायडिटेक्टर ते नार्को ॲनॅलिसिससारख्या चाचण्या, डीएनए, मूलद्रव्यांचे नामकरण वगैरे शोधांच्या संदर्भातील गमतीजमती, स्पर्धा, श्रेयाबद्दलचे वाद, संशोधकांना लाभलेले वा न लाभलेले आर्थिक तसेच व्यावहारिक यश, मानसन्मान यांच्याबद्दलच्या मनोरंजक माहितीचा भला मोठा खजिनाच राहुल गोखले यांनी 'विज्ञानातील सरस आणि सुरस' या पुस्तकाद्वारे जिज्ञासू वाचकांसाठी खुला केला आहे.

विज्ञानातील क्लिष्टतेला बुजणाऱ्या वाचकांनी 'विज्ञानातील सरस आणि सुरस'सारखी पुस्तके वाचायला हवीत; म्हणजे विज्ञानातील रंजकतेची लज्जत त्यांना चाखता येईल. मानवी जीवनातले जे नाट्य कथाकादंबऱ्यातून समोर येते, तेच नाट्य शास्त्रज्ञ-संशोधकांच्या जीवनकथांमध्येही नियतीचे आणि आशानिराशेचे चमत्कृतिपूर्ण रंग भरत असते आणि एखाद्याला यशाच्या शिखरावर नेऊन बसवते तर दुसऱ्याला त्याच्या कर्तृत्वाचे उचित फळही लाभू देत नाही.

राहुल गोखले यांना हे दैवगतीचे फेरे न्याहाळण्यातही रस वाटतो; त्यामुळे कोडॅक कॅमेऱ्याचा शोध लावणाऱ्या मॅक्स ईस्टमनच्या अंतिम क्षणांचे वर्णन करताना ते सांगतात, ''ईस्टमनने खूप प्रचंड संपत्ती मिळवली. भरपूर देणग्या दिल्या. मणक्याच्या आजाराने त्रस्त झाल्यावर वयाच्या ७७व्या वर्षी आपल्या संपत्तीची व्यवस्था लावून त्याने १४ मार्च १९३२ रोजी गोळी मारून आपल्या जीवनाचा निरोप घेतला. त्यापूर्वी लिहून ठेवलेल्या चिठ्ठीत म्हटले होते, 'माय वर्क इज डन, व्हाय वेट? (माझे काम पूर्ण झाले आहे. आता थांबायचे कशासाठी?)''

एडिसनने विजेच्या दिव्याचा शोध लावून मानवी जीवनात प्रकाशाचे पर्व सुरू केले. हजारावर पेटंट्स त्याच्या नावावर आहेत. विजेच्या दिव्याच्या शोधाचा पन्नासावा वाढदिवस मिशिगन येथे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाच्या उपस्थितीत साजरा झाला. एडिसननेही छोटेसे भाषण केले; पण त्यानंतर एडिसनला तेथे व्यासपीठावरच चक्कर आली. त्यानंतर त्याची तब्येत बिघडली. दोन वर्षांनी त्याचे देहावसान झाले.

मृत्यूपूर्वी त्याच्या पत्नीने विचारले, ''खूप त्रास होतोय का? आर यू सफरिंग?'' त्यावर त्याने उत्तर दिले, ''नाही. मी फक्त वाट बघतोय. नो. जस्ट वेटिंग.'' त्याचवेळी खिडकीतून बाहेर बघत त्याने म्हटले, ''इट्स व्हेरी ब्युटीफुल ओव्हर देअर.'' एडिसनला त्यावेळी स्वर्गाचेच दर्शन घडले असणार असे त्याच्या या अंतिम उद्गारावरून वाटते.

मनोविश्लेषण शास्त्राचा जनक डॉ. सिंगमंड फ्रॉइड. याला जबड्याचा कर्करोग झाला. उपचारांनी फरक पडेना. वेदनांची तीव्रता कमी होईना. डॉक्टरांना तो म्हणाला, ''आता फक्त असह्य वेदनाच जाणवताहेत. जगण्यात काहीच अर्थ नाही. इट इज ओन्ली टॉर्चर नाऊ अँड इट हॅज नो लाँगर एनी सेन्स.'' वेदना कमी होण्यासाठी डॉक्टरांनी त्याला मॉर्फिनचे डोस दिले. त्यामुळे फ्रॉइड कोमामध्ये गेला. काही तासांनी त्याचा श्वासोच्छ्वास थांबला.

एखादी कल्पना डोक्यात घेऊन ती प्रत्यक्ष आणण्यासाठी प्रयोगशाळेत किंवा अन्यत्र प्रयोग करीत रहायचे, त्या कल्पनेला मूर्त स्वरूप द्यायचे हा एकूणच प्रकार विलक्षण म्हणायला हवा. त्या प्रयोगाची प्रचीती येण्याचा क्षण म्हणजे चमत्काराचाच क्षण. अशा अनेक क्षणांचे निर्देश या लेखांमध्ये विखुरलेले आहेत. ते वाचताना या क्षणीही अंगावर रोमांच उभे राहतात. हे खरेच असे घडले असेल तेव्हा त्या संशोधकाला काय वाटले असेल? तर्कशक्ती येथे दुबळी ठरते.

१७ डिसेंबर १९०३ रोजी विल्बर आणि ऑर्विल या राईट बंधूंनी सकाळी १० वाजून ३५ मिनिटांनी बोचऱ्या थंडीत आपले विमान नॉर्थ कॅरोलिनामधील किटी हॉकच्या पटांगणावर नेले. पहिल्यांदा ऑर्विलने उड्डाण केले. विमानाने जमीन सोडली. हवेत झेप घेतली. कधी वर, कधी खाली... ऑर्विलच्या पोटात खड्डा पडला. बारा सेकंद विमान हवेत राहिले. नंतर जमिनीवर टेकले. आपण आपले हे यंत्र हवेत काही क्षण का होईना, तरंगत ठेवू शकलो... ऑर्विलला खरेच वाटेना.

नंतर विल्बरने ते विमान उडवले. हवेत ते उंच गेले. ऑर्विलपेक्षा ७०-७५ फूट जास्त उंच. बघणाऱ्या लोकांना स्पष्ट दिसले. हे यंत्र पक्ष्यासारखे हवेत तरंगते आहे. काही सेकंद का असेना, जमिनीचा आधार सोडून हवेत वर वर जाते आहे आणि पुन्हा खाली जमिनीवर येऊन थांबते आहे. न आदळता, न मोडतोड होता... हे सारे काहीतरी अजबगजब आहे.

तिसऱ्यांदा हे विमान दोनशे फूट वर गेले. पंधरा सेकंद हवेत राहिले. चौथ्यांदा वर गेले ते आठशे बावन्न फूट आणि हवेत राहिले तब्बल ५१ सेकंद... माणूस पक्ष्यांसारखा हवेत संचार करू शकतो... हे सिद्ध झाले. हे लक्षात आले.

या पहिल्या भरारीनंतर दहा वर्षांनी ऑर्विलने म्हटले, ''विचित्र यंत्रावर आरूढ होऊन हवा कापत उड्डाण करण्याची आज मी कल्पनाही करू शकत नाही. त्या

धाडसाचे आज मला आश्चर्य वाटते. आजवर कोणी न हाताळलेले 'कामचलाऊ' यंत्र तयार करून त्यात बसून ते चालवण्याचे केलेले साहस तो एक वेडेपणाच होता असे आज वाटते. प्रयोगशाळेत केलेले प्रयोग, यंत्राची जुळवाजुळव, बांधलेले आडाखे, केलेली निरीक्षणे... हे यंत्र आकाशात झेप घेईन असा वाटणारा विश्वास... ते सुरक्षितपणे खाली उतरू शकेल याबद्दल वाटणारा भरवसा... आज या सर्वच घटनांचे आश्चर्य वाटते.''

क्लोरिन वायूचा वापर रासायनिक शस्त्र म्हणून करण्याची कल्पना फ्रिट्झ हेबर या जर्मन-ज्यू संशोधकाने इप्र या गावी १९१५ मध्ये प्रथम राबवली. इप्रमधील फ्रेंच अल्जीरियन सैन्याच्या तुकडीवर या विषारी वायूचा मारा करण्यात आला आणि अल्जीरियन डिव्हिजनच्या सैनिकांची पळापळ सुरू झाली. काही जण खोकत होते, काहीजण ओकत होते, काहीजण काळेनिळे पडले होते, काहीजण बेशुद्ध पडले, काहीजण मृत्युमुखी पडले. एकच हाहाकार उडाला. शत्रूला नेस्तनाबूत करणे, त्याला पराभूत करणे हीच एकमेव उद्देश समोर ठेवून हेबरने या विषारी वायूचा मारा शत्रू सैन्यावर केला होता... त्याला आपल्या प्रयोगाचे हे यश बघून आनंद झाला असणारच! पण त्याच्या बायकोला आपल्या पतीचे हे क्रौर्य बघून भयंकर धक्का बसला. तिने आत्महत्या केली. हेबर हा ज्यू होता. नाझींच्या ज्यूविरोधाची झळ त्याला लागणे अटळ होते. १९३१मध्ये केंब्रिज विद्यापीठाने त्याला आमंत्रण दिले. ती संधी साधून हेबरने इंग्लंडला प्रयाण केले. त्यांनतर दोनच वर्षांनी त्याचे देहावसान झाले. ''शांततेच्या काळात शास्त्रज्ञ साऱ्या जगाचा असतो, पण युद्ध काळात तो त्याच्या देशाचा असतो.'' असे हेबर म्हणे. पण पुढे त्यालाच जर्मनीचा त्याग करणे भाग पडले. आपल्या विषारी प्रयोगाचे यश त्याला सुखावणारे ठरले असेल का? विशेषत: पत्नीच्या आत्महत्येनंतर त्याला ते यश सुखद वाटले असेल का? असा प्रश्न पडतो.

आइन्स्टाइनने अणुबॉंब बनवण्याचा सल्ला अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाला दिला. पण नंतर तो सल्ला म्हणजे आपल्या आयुष्यातील सर्वांत मोठी चूक अशी कबुली दिली.

बरट्रॅंड रसेल, मॅक्स बॉन, जोसेफ रोटबाल्ट, लायनस पॉलिंग यांनी १९५५ मध्ये एकत्र येऊन रसेल-आइन्स्टाइन जाहीरनामा प्रसिद्ध केला आणि अण्वस्त्रे नष्ट करा असे आवाहन केले.


मॉस्कोपासून ५०० मैलांवरील अर्झामास-१६ या गावी रशियन शास्त्रज्ञ अणुबॉंबची निर्मिती करीत होते. आंद्रे साखारॉव्ह यांचाही त्या शास्त्रज्ञांत समावेश होता. त्यांना रशियन हैड्रोजन बॉंबचे जनक असे मानण्यात येते. १९५३ मध्ये त्यांनी 'स्लॉयका'ची यशस्वी चाचणी घेतली. हिरोशिमावर टाकलेल्या बॉंबच्या २० पट त्याची संहारक क्षमता होती. बत्तीस वर्षे वयाच्या साखारॉव्हना स्टॅलिन पुरस्कार देण्यात आला. सोव्हिएत ॲकॅडमी ऑफ सायन्सेसचे सदस्यत्व देण्यात आले. १९५५ मध्ये

रशियाने आपल्या हैड्रोजन बाँबची चाचणी घेतली. चाचण्यांची आता गरज नाही असे साखारॉव्हचे मत, पण क्रूशेवला ते मान्य नव्हते. ''राजकारणात ज्यांना कळते त्यांच्यावर हा निर्णय सोपवावा'' असे मत व्यक्त करून क्रूशेवने साखारॉव्हबद्दल प्रतिकूल भूमिका घेतली. बाँब प्रकल्पापासून त्यांना दूर हटवण्यात आले. तशात कर्करोगाने पत्नीचे निधन झाले. सात वर्षे गोर्कीत विजनवासात काढावी लागली. १९७५ मध्ये शांततेचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. अण्वस्त्रांच्या निर्मितीतील सहभाग असूनही साखारॉव्ह यांनी अण्वस्त्रबंदीची भूमिका घेतली, त्या भूमिकेसाठी मोठी किंमत मोजली.

१९५४ मध्ये रसायनशास्त्राचा नोबेल पुरस्कार मिळवणारे लायनस पॉलिंग यांनी १९५८ मध्ये ११ हजार शास्त्रज्ञांच्या सह्यांचे अण्वस्त्रचाचण्या बंदीचे पत्रक त्यांनी काढले. 'नो मोअर वॉर' हे पुस्तक लिहिले. १९६२चा शांततेचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. मधली दहा वर्षे त्यांच्या वाट्याला उपेक्षा आली. व्हाइट हाऊसमध्ये नोबेल पुरस्काराच्या मानकऱ्यांसाठी मेजवानी ठेवण्यात आली. त्या दिवशी पॉलिंग दिवसभर अण्वस्त्रचाचण्या बंद करा असा फलक घेऊन व्हाइट हाऊससमोर निदर्शने करीत होते. रात्री मेजवानीला मात्र ते गेले.

या पुस्तकात असे अनेक किस्से आलेले आहेत. विज्ञानाच्या तपशीलापेक्षा वैज्ञानिकांच्या वृत्तीप्रवृत्तींवर आणि संघर्ष-समर प्रसंगांवर प्रकाशझोत टाकणारे तपशील शास्त्रीय संशोधनाच्या राजकीय-मानवी बाजूकडे आपले लक्ष वेधतात.

**किंमत : १८०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.**


१४०रु.
पोस्टेज २५रु.

राज्य पुरस्कार प्राप्त

**कल्पित-अकल्पित**

सुधा रिसबूड

अस्वस्थ करणारे गूढ प्रश्न आणि मनातल्या कल्पना यांच्या वलयात गुंगवून टाकणाऱ्या आगळ्या वेगळ्या विज्ञानकथा.

**आगामी**

**संवेदनशील वयाचं मुक्त आत्मकथन**

# उधाण वारा

**(माझं कुवारपण भाग २)**

**तसलिमा नासरिन**

अनुवाद

**विलास गीते**

**४००रु. पोस्टेज ३०रु.**




१९९९ साली प्रकाशित झालेल्या तसलिमा नासरिन यांच्या ‘आमार मेयेबेला’ (माझं कुवारपण) या आत्मकथनाने बंगाली साहित्यविश्वात खळबळ माजली. एक अविस्मरणीय आत्मकथन म्हणून आता ते पुस्तक मान्यता पावले आहे. ‘उतोल हवा’ (उधाण वारा) हा त्याच आत्मकथनाचा दुसरा भाग आहे.

या भागात तसलिमांच्या सोळा ते सव्वीस वर्षापर्यंतची कहाणी आहे. या पुस्तकातही त्यांच्या रोखठोकपणाचे व करुणेचे दर्शन होते. पण त्यांची भोवतालाकडे पाहण्याची दृष्टी आणखी तीक्ष्ण झाली आहे. अनुभवांचा परीघ विस्तृत झाला आहे. त्यामुळे तसलिमांची जडणघडण कशी झाली हे या पुस्तकात आणखी तपशीलवारपणे समजते. एका मागासलेल्या समाजात आणि कुटुंबात मोठ्या झालेल्या युवतीने पुराणमतवादाची बंधने कशा प्रकारे तोडून टाकली हे या पुस्तकात दिसते. त्यांचे प्रेमप्रकरण, त्यामधील आनंद-वेदना, संबंधामधले चढउतार आणि शेवटी त्यातून बाहेर पडणे– हे सारे सांगताना तसलिमांचे गद्य काव्याच्या तेजाने झळाळते.

या धारदार आत्मकथनाचा मराठी अनुवाद समर्थ अनुवादक विलास गीते यांनी तितक्याच प्रत्ययकारीपणे केला आहे.

# पुरस्कार



## * नामदेव ढसाळ यांना फुले-आंबेडकर साहित्य पुरस्कार

सातारा येथील भारतीय भटके विमुक्त विकास व संशोधन संस्था आणि फुले-आंबेडकर साहित्य पंचायत यांच्या वतीने या वर्षीच्या फुले-आंबेडकर साहित्य पुरस्कारासाठी कवी नामदेव ढसाळ यांची निवड झाल्याची माहिती संस्थेचे लक्ष्मण माने यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वर्षीच्या जीवनगौरव पुरस्कारासाठी कार्यकर्ते श्रीकांत कोरवी (इचलकरंजी) यांची निवड करण्यात आली आहे. फुले-शाहू-आंबेडकरी विचार समृद्ध करण्यासाठी व पुरोगामी चळवळ पुढे नेण्यासाठी योगदान देणाऱ्या ज्येष्ठ नामवंत व्यक्तींना फुले-आंबेडकर पुरस्काराने गौरविण्यात येते. या पुरस्काराचे स्वरूप १० हजार रुपये रोख, शाल, स्मृतिचिन्ह असे आहे. जीवनगौरव पुरस्काराचे स्वरूप ५ हजार रुपये रोख, शाल, स्मृतिचिन्ह असे आहे.

फुले-आंबेडकर पुरस्काराने यापूर्वी बाबुराव बागुल, डॉ. रावसाहेब कसबे, डॉ. वामन निंबाळकर, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. भालचंद्र फडके, डॉ. जनार्दन वाघमारे, डॉ. बाबा आढाव, डॉ. य. दि. फडके, डॉ. अनिल अवचट, ॲड. शंकरराव खरात, कवी नारायण सुर्वे, डॉ. जयसिंग पवार, डॉ. आ. ह. साळुंखे, डॉ. रूपा बोधी-कुलकर्णी, डॉ. गो. मा. पवार आदी मान्यवरांना सन्मानित करण्यात आले आहे.

## * स्नेहवर्धन पुरस्कार

''प्रज्ञा, करुणा आणि कलात्मक सौंदर्यदृष्टी ही जीवनाची मूलभूत अंगे आहेत. या मूलभूत गुणांशिवाय जीवन अपुरे आहे,'' असे मत ज्येष्ठ विचारवंत डॉ. मा. पं. मंगुडकर यांनी 'स्नेहवर्धन' प्रकाशन पुरस्कृत ग्रंथ पुरस्काराचे वितरण करताना व्यक्त केले. पुणे विद्यापीठाचे माजी प्रभारी कुलगुरू डॉ. अरुण अडसूळ यांच्या हस्ते डॉ. प्र. न. जोशी यांनी लिहिलेल्या 'महाप्रभू' व डॉ. मु. श्री. कानडे यांनी लिहिलेल्या 'मराठी रंगभूमीची पन्नास वर्षे' या दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

डॉ. प्र. न. जोशी 'संतमित्र' ग्रंथ श्रेष्ठता पुरस्कार ॲड. देवदत्त दिगंबर परुळेकर यांच्या 'तुका म्हणे' या ग्रंथाला देण्यात आला. डॉ. प्र. न. जोशी यांच्या नावाने दिला जाणारा 'विज्ञानमित्र' ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार अतुल धामणकर यांच्या 'ताडोबा वाघांचे

जंगल' या पुस्तकाला देण्यात आला. डॉ. वि. भि. कोलते 'समीक्षामित्र' ग्रंथ श्रेष्ठता पुरस्कार डॉ. रावसाहेब कसबे यांच्या 'धर्मग्रंथ आणि जीवनप्रवाह' या ग्रंथाला देण्यात आला. संजीवनी मराठी 'साहित्य सखी पुरस्कार' गिरिजा कीर यांना 'साहित्य सेवेबद्दल' देण्यात आला. प्रत्येकी तीन हजार रुपये व सन्मानचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे.

निर्मला व गणेश महादेव किराणे 'प्रकाशकमित्र' उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार केशव भिकाजी ढवळे प्रकाशनाला देण्यात आला. सन्मानचिन्ह व पाच हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

*** सावाना ग्रंथ पुरस्कार**

कुसुमाग्रज, वसंत कानेटकर, डॉ. अ. वा. वर्टी, अशोक टिळक यांचे साहित्य प्रकाशित करताना त्यांच्या सहवासातील अमूल्य क्षणांची शिदोरी माणसे वाचायला शिकवून गेली. पुढील मैफल आणि 'नाशिकमधील ५० वर्षे' या विषयावर सर्वांना सोबत घेऊन घडवून आणू, असे आवाहन प्रकाशक व लेखक रामदास भटकळ यांनी केले.

नाशिक येथील सार्वजनिक वाचनालयाच्या वार्षिक सोहळ्यानिमित्त आयोजित वाङ्मयीन पुरस्कार वितरण सोहळ्यात 'नाशिक आणि मी' या विषयावर बोलताना भटकळ म्हणाले की, वर्टींना पाहून माणसाने शब्दाला किती जागावे याचा धडा मिळाला, तर कानेटकर आणि आपली मैत्री इतकी दाट होती, की शब्दांकन म्हणून आपण त्यांचे आत्मचरित्रही लिहू शकतो.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सावाना ग्रंथ पुरस्कारांचे त्यांच्या हस्ते वितरण झाले. शैक्षणिक, वैचारिक ग्रंथास देण्यात येणारा, ग. वि. अकोलकर पुरस्कार 'हिरवे अनुबंध'च्या डॉ. द. ना. धनागरे यांना सामाजिक आणि वैचारिक ग्रंथास देण्यात येणारा मु. ब. यंदे पुरस्कार '..आणि दोन हात'चे लेखक डॉ. वि. ना. लोखंडे यांना लघुकथा संग्रहाचा पु. ना. पंडित पुरस्कार 'आपण माणसात जमा नाही'चे राजन गवस यांना डॉ. अ. वा. वर्टी कथा लेखक पुरस्कार नीरजा यांना ललितेतर ग्रंथास देण्यात येणारा डॉ. वि. म. गोगटे पुरस्कार 'ग्लोबल वार्मिंग'चे लेखक तसेच दै. लोकसत्ताचे सहसंपादक अभिजित घोरपडे यांना अनुवादित ग्रंथास देण्यात येणारा स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर पुरस्कार 'विजयाचे मानसशास्त्र' पुस्तकाचे लेखक भीष्मराज बाम व अनुवादक वंदना अत्रे यांना विनोदी ग्रंथास देण्यात येणारा डॉ. विमादी पटवर्धन पुरस्कार 'गुर्रर... आणि म्याँव' पुस्तकाच्या आनंद देशपांडे यांना प्रदान करण्यात आला.

डॉ. धनागरे म्हणाले की, पुस्तक आणि ग्रंथ यातील फरक आपल्याला ओळखता आला पाहिजे. 'हिरवे अनुबंध'चा आकृतिबंध हा व्यक्तिचित्रण म्हणून

दुर्लक्षित होऊ शकतो. मात्र त्यात आपल्या सान्निध्यात आलेल्या मुस्लिम व्यक्तींच्या, त्या समाजाच्या व्यथा, प्रश्न समजावून घेत त्यांचा उदारमतवादी चेहरा समोर आणण्याचा प्रयत्न केला आहे.

घोरपडे यांनी पर्यावरणाचे विषय थेट सर्वसामान्यांच्या जीवनाशी निगडीत असल्याचे सांगत त्यांना आता दुर्लक्षित करून चालणार नसल्याचे स्पष्ट केले. कारण, ग्लोबल वार्मिंगचे मोठे आव्हान आपल्यासमोर आहे. पुरस्काराने लेखनाची नवी उर्मी मिळाल्याचे नमूद करून लेखन करताना आपण एक भूमिका घेऊन चालल्याचे घोरपडे यांनी सांगितले.

सर्व विचार व कृतींच्या मुळाशी मानवी मन असल्याचे सांगून आज ही गोष्ट विसरून बाह्य गोष्टींवर भर दिला जात असल्याचे मत बाम यांनी व्यक्त केले.

वाचनालयाचे कार्याध्यक्ष विलास औरंगाबादकर यांनी प्रास्ताविक केले तर नंदन रहाणे यांनी सूत्रसंचालन केले.

*** मास्टर दीनानाथ स्मृती पुरस्कार**

साहित्य, कला, संगीत, नाट्य व सामाजिक क्षेत्रात मानाच्या समजल्या जाणाऱ्या मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृती पुरस्कारांना यंदा खुद्द भारतरत्न लता मंगेशकर यांच्या सहस्रचंद्रदर्शन सोहळ्याचे कोंदण लाभल्यामुळे रसिकांप्रमाणेच खुद्द 'मानकरी'ही सुखावले. षण्मुखानंद सभागृहात रसिकांच्या उदंड प्रतिसादात हा सोहळा रंगला.

दीनानाथ स्मृती प्रतिष्ठान आणि हृदयेश आर्टसतर्फे दर वर्षी संगीत, नाट्य, चित्रपट, साहित्य, समाजसेवा या क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना सन्मानित करण्यात येते. ५० हजार रुपये, चांदीचे तबक आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असते. या वर्षीच्या सत्कारमूर्तींत प्रदीर्घ संगीतसेवा करणारे हरिहरन आणि शिवानंद पाटील होते. तसेच प्रदीर्घ समाजसेवेसाठी हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्डच्या नसीमा हुरजूक यांना आनंदमयी पुरस्काराने गौरविण्यात आले.

साहित्यक्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल मधु मंगेश कर्णिक यांना सन्मानित करण्यात आले. याशिवाय, साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळविणारे वसंत आबाजी डहाके यांना शांता शेळके स्मरणार्थ वाग्विलासिनी पुरस्कार देण्यात आला. हे सारे पुरस्कार खुद्द लता मंगेशकर यांच्या हस्ते देण्यात आले.

उत्कृष्ट नाट्यकृतीसाठी ८८८८ प्रयोग करणाऱ्या प्रशांत दामले यांच्या 'बहुरूपी' या नाटकाला सन्मानित करण्यात आले.

नाट्य-चित्रपटसृष्टीतील प्रदीर्घ सेवेसाठी अभिनेते मोहन जोशी यांना, तर अभिनेत्री काजोल हिला विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले.

या वेळी शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे आणि रश्मी ठाकरे यांचेही लतादीदींकडून

सोनचाफ्याच्या परडीने स्वागत करण्यात आले. हृदयनाथ मंगेशकर यांनी प्रास्ताविक केले. 'सूर आनंदघन' हा सुंदर सुरावटींचा कार्यक्रम सादर केला गेला. यात सुरेश वाडकर, कविता कृष्णमूर्ती, बेला शेंडे, राधा मंगेशकर, साधना सरगम आणि शंकर महादेवन यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले.

*** नाट्य परिषदेच्या पुरस्काराचे मानकरी**

अ. भा. मराठी नाट्य परिषदेतर्फे देण्यात येणारा जीवनगौरव पुरस्कार यंदा ज्येष्ठ नाटककार शं. ना. नवरे आणि ज्येष्ठ अभिनेत्री मंगला संझगिरी यांना जाहीर झाला आहे, तर अन्य पुरस्कारविजेत्यांमध्ये अभिनेते भरत जाधव, संजय नार्वेकर, दिग्दर्शक मंगेश कदम, राजन ताम्हणे, अरुण नलावडे, नाटककार चं. प्र. देशपांडे, अरविंद औंधे आणि दै. 'लोकसत्ता'चे नाट्यसमीक्षक रवींद्र पाथरे आदींचा समावेश आहे. २००९मधील सर्वोत्कृष्ट नाट्यनिर्मितीचा पुरस्कार श्री चिंतामणीनिर्मित 'मन उधाण वाऱ्याचे' या नाटकाने पटकावला आहे. नाट्य परिषदेतर्फे १४ जून रोजी देवल स्मृतिदिनी होणाऱ्या कलावंत रजनीत पुरस्कार देण्यात येतील.

जीवनगौरव पुरस्कार महसूलमंत्री नारायण राणे यांच्या वडिलांच्या स्मृतिनिमित्त तातू सीताराम राणे स्मृती जीवनगौरव पुरस्कार म्हणून दिला जाणार आहे.

महाराष्ट्र शासन पुरस्कृत राम गणेश गडकरी पारितोषिकासाठी ज्येष्ठ नाटककार चं. प्र. देशपांडे, बालगंधर्व पारितोषिकासाठी नारायण बोडस, चिंतामणराव कोल्हटकर पारितोषिकासाठी डॉ. रामदास बरकले आणि केशवराव भोसले पारितोषिकासाठी रमेश कानोले यांची निवड झाली.

अभिनेते भरत जाधव (शाहू महाराज, मास्टर नरेश पारितोषिक), सतीश तारे (दिनकर कामण्णा रसिक गौरव, शंकर घाणेकर स्मृती पारितोषिक), राजन ताम्हाणे (सतीश दुभाषी स्मृती पारितोषिक), अरविंद औंधे (आचार्य अत्रे गुणगौरव पारितोषिक), उदय सबनीस (रंगदेवता पारितोषिक), अरुण नलावडे (गोपीनाथ सावकार पारितोषिक), मंगेश कदम (कमलाकर सारंग पारितोषिक), अनंत वालावलकर (म्हैसकर फाऊंडेशन पारितोषिक), सचिन मोटे (राजाराम हुमणे पारितोषिक), संजय नार्वेकर (बबन प्रभू पारितोषिक), बाबा पार्सेकर (रघुवीर तळाशिलकर पारितोषिक), रवींद्र पाथरे (वि. स. खांडेकर नाट्यसमीक्षा पारितोषिक), नाटक 'मन उधाण वाऱ्याचे' (अल्बा पंडित स्मृती मराठी रंगभूमी पारितोषिक) यांची अन्य पारितोषिकांसाठी निवड झाली.

अन्य विजेते विनायकराव थोरात (बालगंधर्व गौरव पारितोषिक), हेमंत कुलकर्णी (गो. ब. देवल पारितोषिक), विमल म्हात्रे (गणपतराव जोशी गौरव पारितोषिक), विद्या काळे (ज्योत्स्ना भोळे गौरव पारितोषिक), विनया जोशी (शांता आपटे-भार्गवराव पांगे स्मती पारितोषिक), महेश काळे (चांदोरकर स्मृती पारितोषिक),

सुनील जाधव (मा. दत्ताराम स्मृती पारितोषिक), अद्वैत दादरकर (कमलाकर गोगटे पारितोषिक), उदयन काळे (मा. दीनानाथ मंगेशकर पारितोषिक), शुभदा दादरकर (रामकृष्णबुवा वझे पारितोषिक), विजय खानविलकर (नाटककार ला. कृ. आयरे पारितोषिक), धनंजय जोशी (पं. विष्णू नारायण भातखंडे पारितोषिक), ओमप्रकाश श्रावण (बाबुलनाथ कुडतरकर स्मृती पारितोषिक), नाटक 'मदनरंग' (कलावैभव काकासाहेब खाडिलकर गौरव पारितोषिक), मीरा शेंडगे (केळुस्कर स्मृती पारितोषिक), विजय शिंदे (बाळकृष्ण भोसले पारितोषिक), हेमंत किरकिरे (प्रभाकर भालेकर स्मृती पारितोषिक), मुकुंद मराठे (पं. राम मराठे पारितोषिक), गंगाधर देव (वसंत देसाई पारितोषिक), रूपाली कोंडावार-बीरे (कुसुम कुलकर्णी गौरव पारितोषिक), प्राची देवस्थळी (माणिक वर्मा पारितोषिक), डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली (बापूसाहेब टिळक स्मृती पारितोषिक), सौ. सावरकर (चिपळूण-अन्नपूर्णा पारितोषिक), राम काजरोळकर (दादू इंदुरीकर पारितोषिक), रुपांजली तोडणकर (गणेश इंदुरीकर पारितोषिक), सतीश लोटके (बरवे स्मृती पारितोषिक), अजित केळकर (कमलाकर वैशंपायन पारितोषिक),जगदीश देवपूरकर (भालचंद्र जोशी पारितोषिक), शशिकांत लावणीस (नाट्यमंदिर पारितोषिक), विनोद जुंबडे (मोरुदादा कोठवान पारितोषिक), प्रदीप मेस्त्री (रघुवीर तळाशिलकर पारितोषिक), अरुण रहाणे (रघुवीर तळाशिलकर पारितोषिक), भारती वाघमारे आणि अरुण गीते (गुणवंत कामगार).

### * गोपाळा संस्थेला शेवाळकर पुरस्कार

नागपूरच्या रेल्वे स्थानकावर २० वर्षांपूर्वी एक वर्षाची मुलगी बेवारस अवस्थेत सापडली. या जगात आपण कसे, काय आलो हे समजण्याइतपतही तिचे वय नव्हते. पोलिसांनी त्या मुलीला उचलून अमरावतीच्या शासकीय रिमांड होममध्ये दाखल केले. तेथून तिला वझ्झर येथील गोपाळा शिक्षण संस्थेच्या कै. अंबादासपंत वैद्य मतिमंद मूकबधिर बालगृहात आणले गेले. तेथेच तिला शंकरबाबांच्या रूपाने मानसपिता मिळाला. शेकडो निराधार, अपंग चिमुकल्यांचे जीवन फुलविणारे शंकरबाबा. यांनी तिला पित्याची माया दिली. अपंग असूनही आज ती शंकरबाबांचा आधार बनलीय. बालगृहाची अधीक्षिका म्हणून बाबांनी तिच्या खांद्यावर दिलेली जबाबदारी तिने लीलया पेललीय. वक्तादशसहस्त्रेषु राम शेवाळकर यांच्या नावाने दिला जाणारा पहिला आधारवड पुरस्कार बालगृहास देण्यात आला.

अमरावती जिल्ह्यात परतवाड्याजवळ वझ्झर येथे शंकरबाबांनी (शंकरराव पापळकर) १९९२ मध्ये बालगृहाचे लहानसे रोपटे लावले. समाजाने टाकून दिलेली बेवारस, अपंग मुले या बालगृहात शंकरबाबांच्या छायाछत्राखाली आली. प्रत्येकाला बाबांनी पित्याची माया दिली. चिमुकल्यांची सर्व देखभाल स्वत: बाबा करतात...

अगदी त्यांची आई आणि पिता होऊन! त्यांनी अनेक मुलांचे पुनर्वसनही केले. अनेक मुलांना नोकऱ्याही मिळाल्या. काही मुलींची लग्नेही लावून दिली.

मुलींचा पिता म्हणून बाबांनी स्वत: त्यांचे कन्यादान केले. बाबांच्या मायेखाली वाढलेल्या, स्वत:च्या पायावर उभ्या असलेल्या चिमुकल्यांपैकी एक म्हणजे मलिका!... नागपूरच्या रेल्वे स्थानकावर बेवारस अवस्थेतून मलिकाचा प्रवास सुरू झाला. शंकरबाबांच्या आश्रयाखाली वाढत असलेल्या मलिकाच्या शिक्षण, आरोग्याची जबाबदारी हनुमान व्यायाम प्रसार मंडळाचे महासचिव प्रभाकरराव वैद्य यांनी घेतली.

मलिकाने सातवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे. वयाची अठरा वर्षे पूर्ण करणाऱ्या मलिकास संस्थेने आता बालगृहाची अधीक्षिका म्हणून जबाबदारी सोपविली आहे.

बालसुधारगृहाच्या वतीने मलिकाने राम शेवाळकर आधारवड २०१० हा एक लाखाचा पुरस्कार स्वीकारला.

### * सांगवीकर यांना 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार'

फुले, शाहू, आंबेडकर विचारमंचच्या वतीने देण्यात येणारा 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार' डॉ. नानासाहेब सांगवीकर यांना डॉ. यशवंत दंदे यांच्या हस्ते देण्यात आला. ग्रंथसंच, बोधीवृक्ष व एक हजार एकशे अकरा रुपये रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी अध्यक्षस्थानी विठ्ठल गायकवाड, पाहुणे प्रा. हेमलता रणपिसे, ॲड. प्रियांका सोनावणे, साहित्यिक वनराज मोहिते, रवींद्र माळवदकर, हाजी नदाफ, दादासाहेब सोनावणे उपस्थित होते.

### * व्यंगचित्रकार प्रशांत कुलकर्णी यांना माया कामत स्मृती पुरस्कार

लोकसभा निवडणुकीदरम्यान 'लोकसत्ता' दैनिकात प्रसिद्ध झालेल्या व्यंगचित्रकार प्रशांत कुलकर्णी यांच्या व्यंगचित्राला बंगळुरू येथील 'इंडियन इन्स्टिटयूट ऑफ कार्टूनिस्ट'तर्फे माया कामत मेमोरियल ॲवॉर्ड २००९ पुरस्कार घोषित झाला आहे.

या शिवाय 'डीएनए' वृत्तपत्राचे व्यंगचित्रकार मंजुळ किशोर, तसेच पाकिस्तानातील महंमद जरूर यांनाही हा पुरस्कार घोषित झाला आहे. परीक्षक म्हणून सुप्रसिद्ध चित्रकार वासुदेव, व्यंगचित्रकार केशव आणि नामवंत साहित्यिक गिरीश कर्नाड यांनी काम पाहिले.

दिवंगत व्यंगचित्रकार माया कामत यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी उत्कृष्ट राजकीय व्यंगचित्राची पुरस्कारासाठी निवड करण्यात येते.

### * राम पायगुडे यांच्या कादंबरीला पुरस्कार

जालना येथील नागोजीराव सतकर शिक्षण संस्थेचा नागोजीराव सतकर साहित्य

पुरस्कार राम पायगुडे (पुणे) यांच्या पट्ठे बापूरावांची पवळा या पुस्तकाला फ. म. शहाजिंदे (लातूर) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ५१०० रुपये रोख व स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. अध्यक्षस्थानी बाबुराव (मामा) सतकर उपस्थित होते. या वेळी प्रा. बसवराज कोरे यांनी पुस्तकावर भाष्य केले व राम पायगुडे यांची प्रकट मुलाखत घेतली. कवी संमेलनात ऊर्मिला चाकुरकर पैठण, रेखा गतखणे-जाधव, कैलास भाले, प्रभाकर शेळके, बबन महामुने या कवींचा सहभाग होता.

### * शाहू मोडकांचे विचार आत्मसात करण्याची गरज

'सध्या समाजात भिन्न जाती, पंथ, भाषा आणि अधिक व्यापक प्रमाणात देशपातळीवर तणावाचे वातावरण आहे. अशा वातावरणामध्ये विश्वबंधुत्वाची संकल्पना आपल्या कलाकृतींच्या माध्यमातून साकारण्याचा प्रयत्न करणाऱ्या शाहू मोडकांचे विचार समाजाने आत्मसात करण्याची गरज आहे,' असे मत अभिनेते-दिग्दर्शक विनय आपटे यांनी व्यक्त केले.

शाहू मोडक स्मृती प्रतिष्ठानतर्फे आयोजित सोळावा शाहू मोडक स्मृती पुरस्कार वितरण समारंभ बालगंधर्व रंगमंदिरात झाला. प्रतिष्ठानच्या अध्यक्षा प्रतिभा शाहू मोडक, राज्याचे माहिती आयुक्त विजय कुवळेकर, महापौर मोहनसिंग राजपाल या वेळी उपस्थित होते.

या वर्षी बालकलाकार शारवी कुलकर्णी, बालगायिका मुग्धा वैशंपायन, ज्योतिष-शास्त्रात उल्लेखनीय कार्य करणारे प्राचार्य डॉ. मोरेश्वर गोसावी, अपंगत्वावर मात करून माऊथ अँड फूट पेंटिंगमध्ये प्रावीण्य हस्तगत करणारे हरिराम कोहली यांना शाहू मोडक स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पाच हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्रक, फुल व फळांची परडी असे पुरस्काराचे स्वरूप होते.

या वेळी डॉ. गोसावी म्हणाले की, शाहू मोडक हे एक अध्यात्माने भारलेले व्यक्तिमत्त्व होते. ज्योतिर्विद्या आणि अध्यात्माला समाजात प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी सध्या आमचे कार्य चालू आहे. आजपर्यंत अनेक पुरस्कार मिळाले असले तरी आजचा हा पुरस्कार वैशिष्ट्यपूर्ण आहे. पुण्यात शाहू मोडकांचे स्मारक व्हावे व ज्योतिर्विद्येला बैठक निर्माण करून द्यावी असेही त्यांनी सुचवले.

महापौर मोहनसिंग राजपाल म्हणाले की, पुरस्कारप्राप्त कलाकार म्हणजे दुर्दम्य आत्मविश्वास आणि दैवी शक्ती असणारी माणसे आहेत. भारतीय कला, ज्योतिषशास्त्र आणि विज्ञानाची सांगड व्यवस्थितरीत्या घातली.

कुवळेकर म्हणाले की, आनंदाची निर्मिती करणे हीच प्रत्येक सजीवाच्या जगण्यामागची मूलभूत गरज असते. आपल्या अंगी असणाऱ्या विविध कलांनी

समाजातील विविध दालने करणाऱ्या आणि अंगी असणाऱ्या क्षमतांचे दर्शन घडविणाऱ्या या व्यक्ती म्हणजे कलावंतांचे प्रतिनिधीच आहेत. येथे होणारा लहान कलाकारांचा तसेच आयुष्यात ज्यावेळी सर्व संपले त्यावेळी पुन्हा जिद्दीने आयुष्याची सुरुवात करणाऱ्या हरिरामजींचा सत्कार समाजातील निराश व्यक्तींसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल. बालगायिका मुग्धा वैशंपायनच्या 'राधाधर मधुमिलिंद जयजय' व 'पवन दिवानी ना माने...' या गाण्यांनी कार्यक्रमाची सुरुवात झाली.

या कार्यक्रमातंर्गतच नेपथ्यकलाकार शिवाजीराव पवार यांना प्रतिष्ठानतर्फे वैद्यकीय मदतीसाठी धनादेश देण्यात आला. प्रतिभा शाहू मोडक यांनी प्रास्ताविक तर सुधीर गाडगीळ यांनी सूत्रसंचालन केले. सदानंद केळकर यांनी आभार मानले. प्रतिभा इनामदार यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### * कथालेखन स्पर्धा

स्टँडफोर्ड विद्यापीठ आणि रुरल रिलेशनच्या ग्यान-की ग्रंथालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या जागतिक कथालेखन स्पर्धेत सांगलीच्या संजिता ग्रामोपाध्ये यांचा पहिला तर कोल्हापूरच्या पूजा वरकड यांचा दुसरा क्रमांक आला. तसेच अमरावतीची श्रेया देशमुख, जळगावची जयश्री कोळी आणि दापोलीची श्रेया जंगम यांनाही पुरस्कार लाभले आहेत.

विजेत्यांचा राजहंस प्रकाशनच्या सुजाता देशमुख, स्टँडफोर्डच्या अनु कुलकर्णी व रुरल रिलेशनचे प्रदीप लोखंडे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. ३९०० विद्यार्थ्यांनी यात भाग घेतला. त्यात ग्रामीण भागातील ८२ माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांचा सहभाग होता. कथेचा उत्तरार्ध आणि पूर्वार्ध काय असेल यावर ही स्पर्धा आधारित होती.

### * वरुणराज भिडे पुरस्कार

पत्रकारितेत बदल होणे अपरिहार्यच असले तरी त्या बदलांची दिशा योग्य असावी, पत्रकारितेने समाजहिताचा आणि संवेदनशीलतेचा गाभा कायम राखावा, यासाठी प्रत्येक पत्रकाराने आपापल्या परीने लढण्याची गरज आहे, असे मत पत्रकारांनी वरुणराज भिडे स्मृती पुरस्कारांच्या वितरणप्रसंगी व्यक्त केले.

वरुणराज भिडे मित्र मंडळातर्फे देण्यात येणारा मुख्य पुरस्कार महाराष्ट्र टाइम्सच्या खास प्रतिनिधी प्रतिमा जोशी यांना विधानसभा अध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

तरुण भारत, पणजीचे विशेष प्रतिनिधी सागर जावडेकर आणि लोकसत्ता, पुणेचे विशेष वार्ताहर धनंजय जाधव यांना आश्वासक पत्रकारिता पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी स्टार माझाचे मुख्य संपादक राजीव खांडेकर आणि उद्योजक विठ्ठल

कामत उपस्थित होते. वळसे पाटील यांनी यावेळी मित्रमंडळाला एक लाख रुपये निधी देण्याची घोषणा केली.

माध्यमांमध्ये व्यवस्थापनाकडून येणारा दबाव, समाजातील बदलती परिस्थिती आणि निर्ढावलेले राजकारणी यामुळे पत्रकारिता कोंडीत सापडली आहे. पण परिस्थिती अवघड असली तरी त्यातून मार्ग काढणे अशक्य नाही, प्रत्येक पत्रकाराने स्वत:च्या मर्यादेत स्वातंत्र्यासाठी लढायला हवे, असे मत खांडेकर यांनी व्यक्त केले.

वरुणराज भिडे यांच्यासारखे निर्भीड, संवेदनशील पत्रकार हे अपवाद नव्हे; तर नियम असायला हवेत, अशी इच्छा यावेळी प्रतिमा जोशी यांनी व्यक्त केली. व्याकरणातील ऱ्हस्व-दीर्घाबरोबरच समस्येचे ऱ्हस्व-दीर्घही पत्रकाराला समजायला हवे. पत्रकारिता बदलली आहे, बदलते आहे. बदल अपरिहार्यच आहे, पण त्याला योग्य दिशा देण्यासाठी, अनिष्ट बदल रोखण्यासाठी पत्रकारांनी मौन सोडायला हवे, असे आवाहन त्यांनी केले. किंमत मोजून बोलण्याची तयारी पत्रकाराने ठेवायला हवी, असे त्या म्हणाल्या.

पत्रकार बंडखोर असायला हवा. मराठी पत्रकार पेटून उठताना दिसत नाहीत, अशी खंत जावडेकर यांनी व्यक्त केली. पेड न्यूजमुळे पत्रकारिता कोणत्या दिशेने चालली आहे, याचा विचार आपण करायला हवा, असे ते म्हणाले.

*** 'हमीद दलवाईंचे कार्य महत्त्वाचे'**

हमीद दलवाई हे मुस्लिम समाजाचे महात्मा फुले होते. त्यांनी मुस्लिम समाजातील लोकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रबोधनाचे महत्त्वाचे कार्य केले, असे मत ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांनी व्यक्त केले.

हडपसर येथे साधना प्राथमिक विद्यालयात हमीद दलवाई यांच्या ३३व्या स्मृतिदिनानिमित्त 'हमीद दलवाई रिसर्च इन्स्टिट्यूट' आणि 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' यांच्या संयुक्त विद्यमाने मुस्लिम समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्रीमती रौनक अफरोज शकील अहमद यांना 'हमीद दलवाई पुरस्कार' प्रदान करण्यात आला. या वेळी लेखिका विद्या बाळ, राष्ट्र सेवा दलाचे कार्यकारी विश्वस्त सुभाष वारे, इन्स्टिट्यूटच्या अध्यक्षा मेहरुन्निसा दलवाई, रझिया सुलताना आदी उपस्थित होते. वैद्य म्हणाले, ''घरचे दारिद्र्य, निरक्षर आई-वडील अशा परिस्थितीवर मात करीत काच, कागद, पत्रा गोळा करणाऱ्या महिला व मुलांच्या सबलीकरणासाठी अकोला येथील रौनक ही तरुणी कार्य करत आहे. हे करताना त्यांनी आपले शिक्षणही पुढे चालू ठेवले आहे. त्यामुळे त्यांच्या हिंमतीचे व धाडसाचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे.''

पुरस्काराला उत्तर देताना श्रीमती रौनक म्हणाल्या, ''गेल्या पाच वर्षांपासून

मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक व आर्थिक सबलीकरणासाठी मी कार्यरत आहे. कार्य करताना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते. मात्र, मानाचा 'हमीद दलवाई पुरस्कार' मिळाल्याने मला अधिक काम करण्यासाठी प्रेरणा मिळाली आहे.'' मेहरुन्निसा दलवाई यांनी पुरस्कार सुरू करण्यामागाचा हेतू सांगितला. तसेच हमीद दलवाई यांच्या कार्याची माहिती दिली.

*** धन्वंतरी कदमला कोरियातील पुरस्कार**

साताऱ्यातील मराठी मुलीच्या खेळातील कौशल्याचा झेंडा सातासमुद्रापार रोवला गेला असून, बास्केटबॉलपटू धन्वंतरी खंडोजी कदम हिला निलनानो कोर्प या दक्षिण कोरियातील कंपनीचा यंग ॲचिव्हर्स हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. ११ हजार रुपये, सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

भारतीय युवा खेळाडूंत असलेल्या गुणवत्तेस प्रोत्साहन मिळावे, यासाठी दक्षिण कोरिया येथील निलनानो कोर्प या कंपनीने पहिल्या पुरस्कारासाठी धन्वंतरी कदमची निवड केली आहे.

*** कलापिनी पुरस्काराचे वितरण**

कलाकार हा तपस्वी व चारित्र्यसंपन्न असला पाहिजे, कलाकार म्हणून सिद्ध झाल्यास तो समाजाचा होतो. त्यामुळे त्याची जबाबदारी वाढते, असे मत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या तळेगाव शाखेच्या पाचव्या वर्धापनदिन कार्यक्रमाला शिवशाहीर पुरंदरे, अभिनेत्री मृणाल कुलकर्णी (देव), नगराध्यक्ष ॲड. रवींद्र दाभाडे, सुरेश धोत्रे, माजी आमदार कृष्णराव भेगडे, डॉ. सतीश देसाई, विकास काळोखे, सुरेंद्र कुलकर्णी, कार्याध्यक्ष सुरेश साखवळकर उपस्थित होते.

मराठी नाट्य परिषद तळेगाव शाखेतर्फे शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते मृणाल कुलकर्णी यांना कलागौरव पुरस्कार देण्यात आला. पंचवीस हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि तलवार असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुरंदरे यांच्या हस्ते लेखक प्रभाकर ओव्हाळ, कवयित्री मीनाक्षी भरड, संगीतकार विनायक लिमये यांनाही पुरस्काराने गौरविण्यात आले.

मृणाल कुलकर्णी म्हणाल्या, ''बालपणी आजोबांबरोबर तळेगावात येणे असायचे. त्यामुळे आपल्या शहरात पुरस्कार देऊन होणारे कौतुक हे अभिमानास्पद आहे.''

*** डॉ. सुधाकर देशमुख यांना पुरस्कार**

''जागतिकीकरणाच्या नव्या प्रवाहातदेखील राष्ट्र आणि राष्ट्रवाद या संकल्पना कालबाह्य झालेल्या नाहीत. अस्मितेचे राजकारण संपलेले नाही. अशा परिस्थितीत

राष्ट्रनिष्ठ मानवता आणि मानवतानिष्ठ राष्ट्रीयत्व, या मनोप्रवृत्तीची गरज आहे,'' असे मत डॉ. विजय देव यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे डॉ. सुधाकर देशमुख लिखित 'राष्ट्र आणि राष्ट्रवाद' या पुस्तकास यंदाचा शं. ना. जोशी पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. सदाशिव शिवदे आणि डॉ. माधवी खरात हे निवड समितीचे सदस्य होते.

डॉ. देव म्हणाले, ''संस्कृती, भाषक, वांशिक, धार्मिक, भौगोलिक, राजकीय महत्त्वाकांक्षांचे ऐक्य असलेला समाज म्हणजे राष्ट्र. न्या रानडे यांनी सर्वप्रथम राष्ट्र संकल्पनेविषयी लेखन केले आहे. भक्ती आणि नीतीच्या माध्यमातून संतांनी सामाजिक, सांस्कृतिक आधार दिला. अभ्यासाविना अनेक लोक राष्ट्र आणि राष्ट्रवादाविषयी बोलत असतात. राष्ट्रवादी म्हणजे मूलतत्त्ववादी असा अनेकांचा गैरसमज आहे. अशा परिस्थितीत व्यक्ती, समाज आणि संस्कृतीच्या अनुषंगाने विचार करण्याची भारताला आणि विशेषत्वाने महाराष्ट्राला आवश्यकता आहे.''

डॉ. देशमुख म्हणाले, ''वैचारिक पुस्तकांना प्रकाशक मिळत नाहीत हे ध्यानात घेऊन असे लेखन प्रकाशात आणण्यासाठी साहित्य संस्थांनी पुढाकार घेतला पाहिजे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील लेखकांना प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे.''

### * 'समाजरत्न जीवन गौरव पुरस्कार'

'पोलिसांची भीती दुर्जनांना नाही तर सज्जनांना वाटते' अशी खंत ज्येष्ठ समाजवादी विचारवंत डॉ. भाई वैद्य यांनी व्यक्त केली. 'साहित्य कलायात्री संस्थे'चा 'समाजरत्न जीवन गौरव पुरस्कार' सहायक पोलिस आयुक्त रामभाऊ थोरात यांना प्रदान करताना पोलिसांची प्रतिमा सुधारली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली.

वैद्य म्हणाले, 'परदेशात शिपाई पदावर कामास सुरुवात करणारी व्यक्ती ही सर्वोच्च पदापर्यंत पोचू शकते, अशी तेथील व्यवस्था आहे. पण आपल्याकडे ही स्थिती नाही. सध्या पोलिसांची प्रतिमा चांगली नाही. समाज सुस्थिर ठेवण्यासाठी पोलिस यंत्रणेचे महत्त्व आहे. समाजातील गुन्हेगारी प्रवृत्तींना आटोक्यात ठेवण्यासाठी त्यांचा दंडक उपयुक्त ठरतो; पण सध्या पोलिसांचे काम उलट्या दिशेने चालले की काय असे वाटते. भ्रष्टाचार बोकाळला आहे, पोलिस यंत्रणा म्हणजे शासनाचा आरसा तो स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी शासनाची आहे.'

पोलिस दलात काम करीत असताना समाजकार्यही चालू ठेवल्याचे नमूद करीत सत्कारमूर्ती थोरात म्हणाले, ''चांगली कामे करताना कधी कधी कायदा बाजूला ठेवून समन्वयही साधावा लागतो.''

आमदार थोरात यांनीही पोलिसांविषयी जनतेचे मत चांगले नसल्याची खंत व्यक्त केली. प्रास्ताविक आणि आभार नम्रता लोणकर यांनी मानले.

## * निर्भीड आणि वास्तववादी लिखाणाचा प्रत्यय

'जहन्नम' या पुस्तकातून प्रतिमा जोशी यांनी कलात्मकतेचा आधार न घेता निर्भीड आणि वास्तववादी लेखन केले आहे. पुस्तकाची भाषा धाडसी असून शरीरविक्रय करणाऱ्या महिलांच्या जीवनातील वास्तव यानिमित्ताने मराठी साहित्यात आले आहे. पुस्तकाच्या निमित्ताने आपली बंद असलेली कवाडे उघडली जावीत, अशी अपेक्षा ज्येष्ठ लेखक अनिल अवचट यांनी मांडली.

मॅजेस्टिक प्रकाशनातर्फे दिला जाणारा 'केशवराव कोठावळे पारितोषिक' यावर्षी 'महाराष्ट्र टाइम्स'च्या विशेष प्रतिनिधी प्रतिमा जोशी यांच्या 'जहन्नम' या कथासंग्रहाला देण्यात आला. पार्ल्यातील लोकमान्य सेवा संघाच्या गोखले सभागृहात झालेल्या कार्यक्रमात स्मृतिचिन्ह देऊन लेखिका प्रतिमा जोशी आणि लोकवाङ्मय गृह या प्रकाशन संस्थेला गौरवण्यात आले. समारंभाला ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

समारंभाचे अध्यक्ष अनिल अवचट यांनी या पुस्तकातून समोर आलेल्या परिस्थितीत काही बदल करता येईल का याचा विचार मनात सुरू होतो, असे नमूद केले. तर जब्बार पटेल यांनी, हे पुस्तक म्हणजे कथालेखनाचा एक उत्तम नमुना आहे. यात रेखाटलेली परिस्थिती, त्यातील पात्रे, त्यांच्या तोंडी असलेली भाषा, चित्रमयता यावर एक ग्रंथ होईल असे म्हटले.

स्वतंत्रपणे लिखाण केलेला आणि कथालेखिका म्हणून माझी नवी ओळख स्थापित करणारा हा संग्रह असल्याचे नमूद करून प्रतिमा जोशी यांनी पुरस्कार मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. समाजकार्याच्या नावाखाली बाजारपेठीय मूल्यव्यवस्थेची भलामण करणाऱ्या संस्थांचे अमाप पीक एकीकडे आले असताना शरीरविक्रय करणाऱ्या महिलांचे प्रश्न स्त्रीमुक्तीच्या अजेंड्यावर घ्यावेत अशी मानसिकता आजही दिसत नाही. स्त्रियांचे आणि जातीव्यवस्थेचे भारतीय संदर्भ यांना सर्वांगाने भिडले जात नाही याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली.

पुरस्कारासाठी एकमताने 'जहन्नम'ची निवड केल्याचे परीक्षक समितीच्या वतीने प्रा. मीना गोखले यांनी सांगितले. 'मॅजेस्टिक प्रकाशन'चे अशोक कोठावळे यांनी प्रास्ताविक केले.

## * मंगेश कलोरे यांना राज्यस्तरीय साहित्य माणिक पुरस्कार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सार्वजनिक वाचनालयाचा यंदाचा राज्यस्तरीय साहित्य माणिक पुरस्कार विदर्भातील सुप्रसिद्ध वास्तुतज्ज्ञ तथा साहित्यिक श्री. मंगेश कलोरे यांच्या 'वास्तूचे

प्रवेशद्वार' या पुस्तकाला २५ एप्रिल २०१० रोजी प्रदान करण्यात आला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सार्वजनिक वाचनालय गोभणी, जि. वाशीमतर्फे महाराष्ट्रातील निवडक साहित्यकृतींना पुरस्कार देऊन गौरविले आहे.

मंगेश कलोरे हे गेल्या १८ वर्षांपासून समाज जागृतीसाठी ज्वलंत विषयांवर महाराष्ट्रातील वृत्तपत्रातून लेखन करीत आहेत. त्यांच्या समाजप्रबोधनपर लेखनामुळे त्यांना अनेक राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. मंगेश कलोरे यांचे आठवण व तुझ्याविना हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. तसेच महात्मा ज्योतिबा फुले : एक निर्भय सत्यशोधक, वास्तुशास्त्र आणि विज्ञान, वास्तुशास्त्र आणि प्लॉटचा आकार, वास्तुशास्त्र आणि रास आदि ग्रंथ नभ प्रकाशनतर्फे प्रकाशित होणार आहेत.

*** समता, नर्गिस दत्त पतसंस्था, कुदळे फाउंडेशनतर्फे पुरस्कार**

'सांस्कृतिक शहर, पेन्शनर सिटी अशी ओळख असलेल्या पुण्याचा चेहरा बदलला असून जल प्रदूषण, गुन्हेगारी असे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. या समस्या टीका करून सुटणार नाहीत. त्यासाठी आत्मचिंतन आणि एकत्रित प्रयत्नांची गरज आहे. अन्यथा भविष्यात याचे वाईट पडसाद उमटतील,' असे मत विधानसभेचे अध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केले.

समता पतसंस्था, नर्गिस दत्त पतसंस्था आणि कृष्णकांत कुदळे फाउंडेशनतर्फे 'किर्लोस्कर ऑइल इंजिन्स' यांना 'श्री समता पुरस्कार', कडेपठार ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे (जेजुरी) संस्थापक अध्यक्ष सुदाम इंगळे यांना 'श्री समता सहकार पुरस्कार', सुनील महाजन यांना 'सुनील दत्त पुरस्कार' आणि अभिनेत्री मानसी नाईक यांना 'नर्गिस दत्त पुरस्कार' वळसे पाटील आणि माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते देण्यात आले. मोहनसिंह राजपाल, कृष्णकांत कुदळे, मंगल कुदळे या वेळी उपस्थित होते.

वळसे पाटील म्हणाले, ''पुण्यातील वाढते क्रॉंक्रिटचे जंगल, जल प्रदूषण, गुन्हेगारी यामुळे शहराची संस्कृती बदलली असून यावर मार्ग काढण्यासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे.''

मोहिते पाटील म्हणाले, ''पैशाने माणूस केवळ स्वत: मोठा होतो, पण ज्या वेळ सर्वसामान्यांबरोबर सर्व स्तरांसाठी आपुलकीने काम करतो, त्या वेळी तो खऱ्या अर्थाने समाजासाठी मोठा होतो. कुदळे यांची समाजासाठी सुरू असलेली धडपड कौतुकास्पद आहे.''

*** अतुल पंडे यांना बोधचिन्ह स्पर्धेत प्रथम पुरस्कार**

प्रत्येक भारतीय नागरिकाला 'युनिक आयडेन्टिफिकेशन नंबर' अर्थात 'नागरिकांक'

देण्याच्या भारत सरकारच्या योजनेसाठी 'बोधचिन्ह' तयार करण्याच्या स्पर्धेत पुण्यातील अतुल पंडे यांनी सादर केलेल्या बोधचिन्हास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. अधिकृत बोधचिन्ह म्हणून त्या बोधचिन्हाची निवड झाली.

त्याविषयी माहिती सांगताना पंडे म्हणाले की, ''या बोधचिन्हामध्ये सूर्य व अंगठ्याचा ठसा हे दोन प्रमुख घटक मी दाखवले आहेत. जात-पात, भाषा, शिक्षण, वय, धर्म याच्या पलीकडे जाणारे हे दोन घटक आहेत. सूर्य हा निसर्ग व सकारात्मक ऊर्जेचा मूलभूत स्रोत आहे. बाहेरच्या दिशेला जाणारे सूर्यकिरण हे अखिल पृथ्वीला स्पर्श करतात. या शिवाय भारतीय संस्कृतीमध्ये सूर्य या घटकाला विशेष स्थान आहे. विश्वास, सकारात्मकता, सातत्य, प्रोत्साहन यांचे सूर्य हे प्रतीक आहे. प्रत्येकाच्या जीवनात नवीन पहाट आणणारा हा सूर्य भारतीयांना नवीन ओळख देणारा आहे, नवीन 'आधार' देणारा आहे.

या बोधचिन्हातील दुसरा घटक अंगठ्याचा ठसा हा आहे. प्रत्येक व्यक्तीची विशिष्ट ओळख स्पष्ट करण्यासाठी हाताच्या अंगठ्याचा ठसा वापरला जातो. प्रत्येक व्यक्तीच्या बोटांचे ठसे हे निसर्गत:च वेगवेगळे असतात. त्यामुळे ती प्रत्येक व्यक्तीची खरी ओळख असते. शिवाय ही ओळख शिक्षित व अशिक्षित यांच्यातील दरी मिटवते. त्यामुळे हे बोधचिन्ह या योजनेचे प्रातिनिधिक स्वरूप स्पष्ट करते.''

या स्पर्धेसाठी देशभरातून दोन हजार प्रवेशिका आल्या होत्या. त्यातून चार जणांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली होती.

प्रथम क्रमांकासाठी पंडे यांची निवड झाली व एक लाख रुपये रोख रक्कम पारितोषिक प्राधिकरणाचे अध्यक्ष नंदन निलेकाणी यांच्या हस्ते देण्यात आले.

अतुल पंडे हे मूळचे नागपूरचे असून गेल्या पाच वर्षांपासून ते नोकरीनिमित्त पुण्यात स्थायिक झाले आहेत. एका जाहिरात कंपनीत ते ग्राफिक डिझायनर म्हणून काम करतात. त्यांच्या क्षेत्रात त्यांना अनेक पारितोषिके मिळाली आहेत.

### * उपेंद्र भट यांना संगीत विश्व पुरस्कार

आजकाल संगीत क्षेत्रात नाव कमवण्यासाठी खरोखर अखंड मेहनत घ्यावी लागते. मराठीतल्या कवी, कथाकार, कादंबरीकार यांनी देखील संगीत क्षेत्राचा आदर्श समोर ठेवावा, असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

माईर्स एमआयटीतर्फे ज्येष्ठ गायक उपेंद्र भट यांना षष्ट्यब्दीपूर्ती निमित्ताने 'संगीत विश्व जीनव गौरव' पुरस्कार देण्यात आला. यावेळी शिवशाहीर डॉ. बाबासाहेब पुरंदरे, संस्थेचे प्रमुख विश्वनाथ कराड, अध्यक्ष डॉ. भास्कर आव्हाड आदी उपस्थित होते.

साहित्य वर्तुळात नव्याने आलेले साहित्यिकही जुन्या जाणत्या साहित्यिकांवर

सहज टीका करतात. नव्याने वावरणाऱ्यांनी पहिल्यांदा साधना करावी आणि त्यानंतर टीका करावी, असे कुलकर्णी यांनी नमूद केले.

संगीत शिकत असताना सातत्य आवश्यक असून मन विचलित होऊन चालत नाही. समाधी अवस्थेपर्यंत पोचण्यासाठी संगीत हे साधन होऊ शकते, असे पुरंदरे म्हणाले.

लोक तुझ्या गाण्याची प्रशंसा माझ्याजवळ करतील, तीच माझी गुरुदक्षिणा ठरेल, असे गुरू भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांनी सांगितले होते, अशी आठवण भट यांनी सांगितली.

❐


**सर्व वाचक, सभासद वर्गणी भरण्यासाठी, व पुस्तके मागविण्यासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधा**

**मेहता बुक सेलर्स**

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी
मंडपाजवळ, कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९ ते रात्री ८
(शनिवारी बंद)
फोन : (०२३१)२५४२९०१.
टेलिफॅक्स : (०२३१)२५४१८८१.
Email : mehtabooks@eth.net

**'मेहता पब्लिशिंग हाऊस'**च्या नवीन पुस्तकांची माहिती, नवनवीन योजना आणि ताज्या घडामोडी कळविण्यासाठी आपला E-mail ID आमच्याकडे हवाच!

**E-mail : info@mehtapublishinghouse.com**

आपले **E-mail ID** 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या वरील **E-mail ID** वर कळवा.

# वाचकांचा प्रतिसाद



**श्रीमती अरुंधती महाम्बरे,**

नमस्कार

आपण अनुवादित केलेले 'कार्यमग्न, व्यस्त लोकांसाठी योगसाधना' हे पुस्तक फारच उपयुक्त आहे. आरोग्यपूर्ण जीवनशैली, तणावमुक्त जीवन या दृष्टीने मार्गदर्शकही आहे.

गिरिजालाल तोष्णीवाल, अहमदनगर.

**डॉ. दिलीप बावचकर**

'एड्स' हे आपण लिहिलेले पुस्तक नुकतेच वाचले. 'एड्स' सारखा गंभीर सामाजिक विषय आपण अत्यंत सहजपणे आणि पूर्णपणे मांडल्याने पुस्तक फार आवडले.

'एड्स' संबंधी वर्तमानपत्रांच्या माध्यमातून थोडीफार माहिती माझ्या वाचनात होती. परंतु आपल्या पुस्तकाच्या माध्यमातून अनेक अज्ञात गोष्टी ज्ञात झाल्याने पुस्तक वाचण्यामागचा हेतू सार्थ झाल्याचे समाधान वाटले.

'एड्स' बाधितांसाठी आपण करत असलेले सामाजिक उपक्रम अत्यंत प्रेरणादायक आहेत.

प्रशांत मोरे, अहमदनगर





**कार्यमग्न,व्यस्त लोकांसाठी योगसाधना**

**बिजयालक्ष्मी होता** अनु. अरुंधती महाम्बरे

आपल्या दररोजच्या आयुष्यात योगशास्त्राद्वारे
निरोगी कसे रहावे याचे मार्गदर्शन

**५०रु. पोस्टेज २०रु.**

**श्री सुनीलजी मेहता**

सविनय नमस्कार.

'मेहता मराठी ग्रंथजगत' दिवाळी अंकाला महाराष्ट्र साहित्य परिषदेचे, 'रत्नाकर पारितोषिक' मिळाल्याचे वाचले. हार्दिक अभिनंदन! 'मेहता मराठी ग्रंथजगत'चे अंक चांगले असतात. साहित्य जगतात फेरफटका मारल्याचे समाधान मिळते.

गिरिजा कीर, मुंबई.

**श्री सुनील मेहता, संपादक**

स.न.वि.वि.

मे २०१० चा अंक संग्रहणीय संकलनाचा संगतवार दस्तऐवज ठरावा, एवढ्या तोलामोलाचा आहे. सर्वंकष मराठी साहित्याची ही संरक्षक भिंत ठरावी. सर्वव्यापी सर्वमान्य संस्कारक्षम संश्लेषण मराठी साहित्याचे त्यामुळे घडून येईल, असे वाटते. मेहता मराठी ग्रंथजगतचे मन:पूर्वक अभिनंदन!

प्रा. जवाहर मुथा, अहमदनगर.

**डॉ. दिलीप बावचकर**

सविनय नमस्कार

'एड्स' ह्या नाजूक विषयावर पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल आपले अभिनंदन. मला आपले पुस्तक अतिशय आवडले. पुस्तक वाचताना प्रत्येक शंकेचं निरसन झालं. माझ्या संपर्कामध्ये येणाऱ्या जास्तीत जास्त लोकांना हे पुस्तक वाचण्यासाठी मी सांगत असतो.

तुम्ही 'एड्स' वर चित्रपट काढावा असं सुचवावंसं वाटतं. त्यामध्ये 'मला भेटलेले रुग्ण' ह्या सदराखाली जे तुम्ही लिहिलं आहे त्यांचा समावेश करावा ही विनंती.

रवींद्र भगवान साठे
कांदिवली (प), मुंबई ४०० ०६७.





**एड्स**

—डॉ. दिलीप बावचकर

एड्स या भयंकर रोगाविषयी सर्व माहिती सांगणारे मराठीतील एकमेव पुस्तक

**१५०रु. पोस्टेज २५रु.**

**मा. संपादक**

डिसेप्शन पॉईंट, द दा विंची कोड, एन्जल्स अँड डेमन्स ही डॅन ब्राऊन यांची तीनही पुस्तके वाचली.

डिसेप्शन पॉईंट हे अशोक पाध्ये यांनी अनुवादित केलेले पुस्तक असंख्य घटनाक्रम कमी कालावधीमध्ये साकार करणारे आहे. अनेक महत्त्वपूर्ण पात्रे, एकाच ठिकाणी चाललेल्या घटना, कट-कारस्थाने, नायक-खलनायक यांच्या थरारक हालचाली, शास्त्र व तंत्रज्ञान यांची सांगड तसेच निसर्गाबद्दलची गूढ माहिती यात आली आहे.

२४ तासात या घटना घडतात. वास्तववादी स्थळे आणि पात्रे, त्यांच्या दैनंदिन हालचाली, अद्ययावत तंत्रज्ञान व त्याची सुनियोजित मांडणी. वाचकाला खिळवून ठेवण्याची हातोटी डॅन ब्राऊन मध्ये आहे.

समुद्रातील खडक, लाव्हा, ज्वालामुखी, मासे याबाबत शास्त्रीय माहिती, ध्रुवीय बर्फाच्छादित प्रदेशातील भौगोलिक रचना, अमेरिकेतील व्हाइट हाऊस व तेथील कामकाज पद्धत यांची सुद्धा मनोरंजक माहिती मिळते.

अशोक पाध्ये यांचे अभिनंदन.

डॉ. रवींद्र कुटे, अहमदनगर



**एन्जल्स ॲण्ड डेमन्स**

**डॅन ब्राऊन** । अनु. बाळ भागवत


प्राचीन पंथाच्या गुप्त मार्गाचा पुनर्शोध...

**३२०रु. पोस्टेज ३०रु.**

**डिसेप्शन पॉईंट**

**डॅन ब्राऊन** । अनु. अशोक पाध्ये


कधीतरी एक उल्का उत्तरध्रुवापासच्या बर्फात घुसली. मग तेथून सुरू झालं एक चमत्कारिक नाट्य! थरार, पाठलाग, हत्या. सत्य हे वेगळेच होते. मेंदूला मुंग्या आणणारी डॅन ब्राऊनची थरार कादंबरी




**५००रु. पोस्टेज ३०रु.**

# श्रद्धांजली

*** नाटककार वसू भगत**



'जंगली कबुतर' या गाजलेल्या नाटकाचे लेखक वसू भगत (७३) यांचे मालाड येथील रिद्धिविनायक हॉस्पिटलमध्ये हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी व मुलगा असा परिवार आहे.

मूळचे नागपूरचे असलेले वसु भगत पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्युटच्या पहिल्या बॅचचे गोल्ड मेडॅलिस्ट होते. दिग्दर्शन व चित्रपट लेखन या विषयात त्यांनी डिप्लोमा मिळवला होता. दिल्लीत गेल्यावर तेथील सांस्कृतिक घडामोडींबद्दल त्यांनी 'माणूस' साप्ताहिकातून विपुल लेखन केले. त्यांनी चित्रपटविषयक लेखनही केले.

त्यांच्या 'जंगली कबुतर' या कमलाकर सारंग दिग्दर्शित वादळी नाटकाचे 'नटेश्वर' या संस्थेने दोन हजारांहून अधिक प्रयोग केले. हे नाटक गुजराथी रंगभूमीवर देखील गाजले. तसेच, त्यावर हिंदी चित्रपटही निर्माण झाला. वसू भगत यांनी एकूण नऊ नाटके लिहिली. त्यातील 'वासवदत्ता', 'नियती', 'मृत्युछाया' या नाटकांना पारितोषिके मिळाली. 'प्रकाशाची झाडे' या त्यांच्या लघुकथासंग्रहाला महाराष्ट्र राज्य वाङ्मय पुरस्कारही मिळाला होता.

'अतिशय तल्लख, भाषेची उत्तम देणगी असलेला आणि सदैव विनम्र असणाऱ्या मित्राला या क्षेत्रात गुणांबरोबरच प्रारब्धाचीही साथ यशासाठी आवश्यक ठरते ती दुर्दैवाने लाभली नाही. पण त्याचं 'जंगली कबुतर कायम स्मरणात राहील' अशा शब्दात ज्येष्ठ रंगकर्मी प्रा. कमलाकर सोनटक्के श्रद्धांजली वाहिली.

*** ज्येष्ठ कवी प्रा.वि.म. कुलकर्णी**

मराठीतील ज्येष्ठ कवी प्रा.वि.म. कुलकर्णी यांचे वृद्धापकाळाने १३ मे रोजी पुण्यात निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते.

त्यांच्या अनेक गीतांच्या ध्वनिमुद्रिकाही जुन्या काळात गाजल्या होत्या. कवितेप्रमाणेच कथा, कादंबरी, टीकात्मक आणि संपादित ग्रंथ अशी त्यांची ग्रंथसंपदाही आहे.

प्रा. कुलकर्णी यांचा जन्म ७ ऑक्टोबर १९१७ रोजी सांगली जिल्ह्यातील मणेराजुरी या गावी झाला. त्यांनी पुण्यातील स.प. महाविद्यालयातून एम.ए.ची पदवी घेतली. बी.ए.मध्ये त्यांनी मराठी विषयात प्रथम क्रमांक मिळवून तर्खडकर सुवर्णपदक पटकावले. नाटककार खाडिलकर या विषयावर त्यांनी पीएच.डी मिळवली.

शिक्षणानंतर बेळगावच्या लिंगराज महाविद्यालयात १९४४ मध्ये प्रा. कुलकर्णी यांनी अध्यापनास सुरुवात केली. त्यानंतर ते सोलापूरच्या दयानंद महाविद्यालयात १९५० मध्ये मराठी विभागाचे प्रमुख झाले. त्यांनी तब्बल सत्तावीस वर्षे या महाविद्यालयात काम केले. या काळात द. ता. भोसले, निर्मलकुमार फडकुले आदी नामवंत साहित्यिकांना त्यांनी शिकविले तसेच पीएच.डीसाठी मार्गदर्शन केले.

विसर्जन, पहाटवारा, कमळवेल, अश्विनी, भाववीणा, पाऊलखुणा, प्रसाद रामायण, मृगधारा आदी कवितासंग्रह त्याचप्रमाणे फुलवेल, ललकार, चंद्राची गाडी, छान छान गाणी, हे बालगीत संग्रह तसेच वृत्ते व अलंकार, साहित्य-दर्शन, मुक्तेश्वर सभापर्व, मराठी सुनीत, रामजोशीकृत लावण्या, झपूर्झा, पेशवे बखर, रामसुतकृत साधुविलास, साहित्य शोभा वाचनमाला असे संपादित ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. माझा उजळ उंबरा, माझा पानमळा, (दोन्हींचे गायक गजाननराव वाटवे), माझ्या मराठीची गोडी (गायक कमलाकर भागवत), सावधान (वसंतराव देशपांडे), आम्ही जवान देशाचे (गायक पंडितराव नगरकर) अशा त्यांच्या ध्वनिमुद्रिकाही गाजल्या. प्रा.कुलकर्णी यांना अनेक पुरस्कारांचा मानही मिळाला. त्यात उत्कृष्ट प्राध्यापक म्हणून राज्य सरकारचा सन्मान, गदिमा पुरस्कार, भा.रा.तांबे पुरस्कार आदींचा प्रामुख्याने समावेश आहे.

*** यशवंत मांडके**

पुणे यथील अप्पा बळवंत चौकातील ग्रंथविक्रेते यशवंत विश्वनाथ मांडके (वय ७२) यांचे कर्करोगाच्या आजाराने नुकतेच निधन झाले. मांडके यांची अप्पा बळवंत चौकात रॉयल व प्रभात बुक डेपो ही पुस्तकांची दुकाने आहेत. अजित प्रकाशन ही त्यांची प्रकाशन संस्थाही आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, नातू, दोन भाऊ, दोन बहिणी, भावजय, पुतणे असा मोठा परिवार आहे.

*** डॉ. तारा वनारसे**

प्रसिद्ध लेखिका डॉ. तारा वनारसे यांचे पार्किन्सन्स व्याधीने इंग्लंडमधील हेमेल हेम्पस्टेड येथे १२ मे रोजी त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. दि. १३ मे रोजी त्यांचा ऐंशीवा वाढदिवस होता. मराठी नवकथेच्या आरंभकाळापासून त्यांचे लेखन लक्षणीय ठरले होते. 'कक्षा' हे नाटक, 'नर्सेस क्वार्टर्स' ही एकांकिका, 'पश्चिमकडा', 'केवल कांचन' हे लघुकथासंग्रह 'बारा वाऱ्यांवर घर' हा कविता संग्रह, 'श्यामिनी' व 'सूर' या कादंबऱ्या, 'तिळा तिळा दार उघड' हा प्रवासवर्णनांचा संग्रह व आता प्रकाशनाच्या उंबरठ्यावर असलेले 'गुप्त वरदान' हे भाषांतरित कथांचे त्यांच्या भाष्यासहित तयार केलेले पुस्तक असा साहित्यिक कार्याचा पट आहे. यापैकी कवितासंग्रह, 'श्यामिनी' ही कादंबरी आणि 'तिळा तिळा दार उघड' या प्रवासवर्णनाला राज्य पुरस्कार मिळाले त्या व्यवसायाने प्रसूतितज्ज्ञ होत्या. दीर्घकाळ त्यांचे वास्तव्य इंग्लंडमध्ये होते. डॉ. बेन रिचर्ड्स त्यांचे पती होते. पती निधनानंतर त्या इंग्लंमध्येच राहत होत्या.

*** ज्येष्ठ स्वांतत्र्यसैनिक राम मोहाडीकर**

ज्येष्ठ स्वांतत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील सक्रिय आंदोलक, साने गुरुजींबरोबर काम केलेले, तसेच महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या जडणघडणीत ज्यांचा सिंहाचा वाटा होता असे रामभाऊ मोहाडीकर (वय ९४) यांचे ६ मे रोजी निधन झाले. त्यांच्या मागे बंधू, प्रकाश, मुलगे मोहन आणि मिलिंद, मुलगी मीना, सून मीनल आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे.

विद्यार्थिदशेतच रामभाऊंचा साने गुरुजींशी निकटचा संबंध आला होता. पारतंत्र्याच्या काळात त्यांनी सायमन आयोगाच्या विरोधात झालेल्या आंदोलनात भाग घेतला. त्यात त्यांना अटकही झाली होती. सुभाषचंद्र बोस यांनी स्थापन केलेल्या 'फॉरवर्ड ब्लॉक'चे ते महाराष्ट्राचे सचिव होते. सेनापती बापट आणि कम्युनिस्ट पक्षासाठी श्रीपाद अमृत डांगे यांच्या चळवळीतही त्यांनी हिरिरीने भाग घेतला होता. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मोहाडीकरांनी सेनापती बापट, एस. एम. जोशी, आचार्य अत्रे यांच्यासमवेत आंदोलन केले होते. सानेगुरुजी विद्यालय, सानेगुरुजी कथामाला, गीता प्रतिष्ठान, शांतिवनची कुष्ठरोग निराकरण समिती अशा विविध संस्थांचे ते विश्वस्त होते.

*** रंगनाथ देशपांडे**

'रंगल्या रात्री अशा' आणि 'पाहू रे किती वाट' या गाजलेल्या चित्रपटांचे निर्माते रंगनाथ पांडुरंग ऊर्फ रं. पां. (दादा) देशपांडे (वय ९०) यांचे १ मे रोजी निधन झाले.

देशपांडे यांनी १९४४ मध्ये पब्लिसिटी आर्टस आणि १९६९ मध्ये प्रिंटिंग प्रेस सुरू केला. ते पुणे मर्चंट्स को-ऑप. बँक आणि दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष होते. 'रंगल्या रात्री अशा' या चित्रपटाला राष्ट्रपती रौप्यपदक आणि 'पाहू रे किती वाट' या चित्रपटाला राज्य पुरस्कार मिळाला. पंचवीस वर्षांहून अधिक काळ मधुमेह नियंत्रणात ठेवणाऱ्या देशपांडे यांनी डायबेटिक असोसिएशन ऑफ इंडिया पुणे शाखेचे सुवर्णपदक पटकाविले होते.

*** चित्रपट लेखक-दिग्दर्शक गोविंद मुनीस**

'मासूम', 'जागृती', 'चलती का नाम गाडी', 'दोस्ती', 'रात और दिन' अशा काही चित्रपटांचे पटकथा-संवादलेखक गोविंद नारायण मुनीस (वय ८०) यांचे दीर्घ आजाराने ६ मे रोजी राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, तीन मुलगे व एक मुलगी असा परिवार आहे.

कानपूर येथे शिक्षण घेऊन गोविंद मुनीस यांनी १९५३ मध्ये मुंबईत पाऊल टाकले. लेखनाची आवड त्यांना पहिल्यापासूनच असल्यामुळे येथे आल्यानंतर पटकथा आणि संवादलेखनास त्यांनी सुरवात केली. सत्येन बोस यांच्या बऱ्याचशा चित्रपटांसाठी त्यांनी पटकथा-संवाद लेखन केले. 'मासूम', 'उपहार', 'जीवनमृत्यू', 'दोस्ती' या चित्रपटांसाठी संवादलेखन केले.

*** डॉ.पी.आर. जोशी**

मुंबई ग्राहक पंचायतीचे माजी अध्यक्ष व विश्वस्त डॉ. प्रभाकर रघुनाथ ऊर्फ पी. आर. जोशी (७४) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. डॉ. जोशी हे जागतिक बँकेचे सल्लागार होते. त्यांनी बॉम्बे मॅनेजमेंट असोसिएशनचे अध्यक्षपदही भूषविले होते. त्यांना आयसीआयसीआय बँकेतील विकास बँकिंग व मर्चंट बँकिंग (डीएसपी मेरील लिंच) यांचा दीर्घ अनुभव होता. त्यांचे 'ग्लोबल कॅपिटल मार्केटस्' (इंग्रजी), 'भारताचा आर्थिक ताळेबंद' (मराठी) आणि 'भारत की अर्थनीती : नए मोडपर' (हिंदी) हे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. त्यांनी इकॉनॉमिक टाइम्स व लोकसत्ता या दैनिकात स्तंभलेखन केले होते. त्यांना ज्येष्ठ पत्रकार पुरस्कारानेही गौरविण्यात आले होते.

डॉ. जोशी हे अत्यंत कुशाग्र बुद्धीचे व अभ्यासू व्यक्तिमत्त्व होते, सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची त्यांची वृत्ती होती, त्यांच्या निधनाने पंचायतीचा एक आधारस्तंभ गेल्याची प्रतिक्रिया मुंबई ग्राहक पंचायतीचे शिरीष देशपांडे यांनी व्यक्त केली.

❐



# बालनगरी

**अनुक्रमणिका**

फ्रँकलिन आणि हरवलेला कॅमेरा १०८



**मैत्री पुस्तकांशी या उपक्रमाच्या निमित्ताने मुलांसाठी गोष्टींची स्पर्धा आयोजित करण्यात आली. त्यातील काही गोष्टी प्रसिद्ध करीत आहोत.**



## ढोंग

एकदा एका गाढवाला जंगलात सिंहाचे कातडे सापडले. ते कातडे पांघरून ते गाढव आपण सिंह आहोत, जंगलाचा राजा आहोत अशा थाटात फिरू लागले. त्यामुळे सर्व प्राणी त्याला बघून दूर जाऊ लागले. साहजिकच गाढवाला आपण खरे सिंहच आहोत असे वाटू लागले.

थोड्या वेळाने त्याला एक कोल्हा दिसला. त्या कोल्ह्याला पाहताच तो खऱ्या सिंहाप्रमाणे त्याच्यावर धावून गेला. सिंह अशा वेळी गर्जना करतो. गाढवाने सिंहाचे कातडे पांघरले असले तरी तो सिंहाप्रमाणे गर्जना कशी करणार? त्याने गर्जना केली खरी पण त्याचा आवाज निघाला तो गाढवाचा.

कोल्ह्याच्या ते लक्षात आले. तो त्या गाढवाला म्हणाला, ''मामा, आपलं ढोंग पुरे करा. आपण ओरडला नसता तर मी सुद्धा तुम्हाला सिंह समजून पळालो असतो. पण, आता आवाज ऐकून आपण खरे कोण आहात हे मला कळले.''

जंगलातल्या सर्व प्राण्यांनाही हे कळले. गाढवाला अद्दल घडली.

सिंहाचे कातडे पांघरून गाढवाचा सिंह होत नाही हे त्याला कळून चुकले.

**पार्थ मनोज जोशी,**
८२०, सदाशिव पेठ, पुणे ३०

# चार चोर

एक मोठं घनदाट जंगल होतं. त्याच्या कडेला एक गाव होतं. त्याचं नाव रामपूर. गावातील लोक खूप श्रीमंत होते.

जंगलातून एक नदी वाहत होती. नदीत असंख्य मगरी होत्या.

जंगलाच्या दुसऱ्या बाजूला एक काळेश्वर नावाचा डोंगर होता. त्यावर काळूबाई नावाची देवी होती. तिची जत्रा पावसाळ्यात असायची. पावसाळ्यात नदीला पूर यायचा.

गावच्या सरपंचांनी नदीवर मोठा व भक्कम पूल बांधून घेतला. त्यामुळे गावकऱ्यांची सोय झाली.

जंगलात एक झोपडी होती. तिच्यात चार चोर राहत होते.

गावातले लोक श्रीमंत असल्याने जत्रेला पैसे व महाग वस्तू घेऊन जात. त्यामुळे चोरांना खूप लूट मिळाली.

ही माहिती गावच्या सरपंचाला कळली. काही मुले व त्यांचे पालक जंगलात गेले. बघतात तर चोर माणसांना मारून त्यांचे मांस मगरीला देऊन सापळे रस्त्याच्या कडेला झाडावर टांगत होते. त्या मुलांना व त्यांच्या पालकांना आश्चर्य वाटले.

मग ते गावात आले व पोलिसांना भेटले. पोलिस म्हणाले, ते



चोर मोठे दरोडेखोर आहेत. ते कोणालाही जुमानत नाहीत.

मग मात्र गावकऱ्यांनी चोरांना धडा शिकवायचे ठरवले.

ती मुले व मोठी माणसे काठ्या घेऊन निघाली. सर्वजण एका मोठ्या झाडाआड लपले. ओरडायला लागले, ''पोलिस आले हो आले.''

चोर घाबरले व एका झाडाखाली जमले. तेव्हा त्यांच्या डोक्यात दगड पडायला लागले.

चोर सैरावैरा पळायला लागले. आधी नदीकाठी आले. पण नंतर त्यांना वाटच सापडेना. नंतर कशीबशी त्यांना पुलापर्यंत जायची वाट सापडली. पण पुढून दगड येऊ लागले.

ते कसेबसे पळाले.

पुन्हा गावाकडे कधीच आले नाहीत.

धाडसी गावकऱ्यांमुळे संकट टळले.

**प्रणव जाधव**
इ.५वी, अक्षरनंदन शाळा, पुणे.
'ओम', स.नं. ७२, समर्थनगर, नवी सांगवी– २७.

# घमेंडखोर मूर्तिकार

खूप खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे.

एका गावात विदूर नावाचा एक मूर्तिकार राहत होता. एक उत्तम मूर्तिकार म्हणून त्याची सर्वत्र कीर्ती होती. त्याने घडवलेल्या मूर्ती अगदी सजीवच वाटत. त्यामुळे त्यांना देशात आणि परदेशात चांगली मागणी होती. त्याच्या अद्‌भूत कौशल्याबद्दल त्याला अनेक पुरस्कारही मिळाले होते. पण जसजसा त्याचा नावलौकिक वाढत गेला तसतशी त्याची घमेंडही वाढत गेली.

एक दिवशी राजा सूर्यसेनने आपल्या शिपायांबरोबर शक्तिसेन

बाबांना मूर्तिकाराकडे पाठवले व शक्तिसेनबाबांची मूर्ती बनविण्यास सांगितले. शक्तिसेनबाबा हे राजाचे गुरू होते. ते एकदम अचूक भविष्य सांगत.

मूर्तिकाराने बाबांना आपले भविष्य सांगण्यास सांगितले, ''जगभर प्रसिद्धी, भरपूर पैसा, नावलौकिक अशा माहित असलेल्या गोष्टी सोडून काही वेगळं भविष्य असेल तर सांगा.''

विदुराला आपल्या नावलौकिकाचा बराच गर्व झालाय हे बाबांनी ओळखले. ते विदूरला म्हणाले, ''एक गोष्ट लक्षात ठेव. अहंकाराचं वारं कधी डोक्यात जाऊ देऊ नकोस.'' हे ऐकून विदूराला हसू आले.

बाबा भविष्य सांगताना पुटपुटले, ''अरे, तुझं आयुष्य फक्त चाळीस दिवसाचं राहिलंय. चाळिसाव्या दिवशी मध्यरात्री तुझा मृत्यूयोग आहे.''

शक्तिबाबांची भविष्यवाणी ऐकून विदुराला धक्काच बसला.



मरणाच्या विचाराने तो अत्यंत सावध झाला. मृत्यू कसा टाळता येईल यावर तो विचार करू लागला.

त्याने खूप विचार करून आपल्यासारखेच दिसणारे सहा पुतळे बनवले. आपल्या कलेच्या जोरावर यमराजालाही फसविण्याची त्याने योजना बनविली. हे पुतळे इतके हुबेहूब दिसत होते की त्यातून त्याला शोधणे शक्यच नव्हते. त्यामुळे तो अधिकच घमेंडी झाला. त्याचा अहंकार इतका वाढला की माझ्या कलेपुढे मृत्यूला देखील हार मानावी लागेल, असे तो म्हणू लागला.

अखेर मूर्तिकाराची मरणाची रात्र येऊन ठाकली. मूर्तिकार पुतळ्यांमध्ये जाऊन डोळे मिटून उभा राहिला.

थोड्या वेळात यमराज प्रकट झाले. सात मूर्तिकारांना बघून गोंधळूनच गेले. यातला खरा मूर्तिकार कोण? असा प्रश्न यमराजांना पडला.

यमराजांना एकदम युक्ती सुचली. ते म्हणाले, ''वाऽऽ, मूर्तिकारा, तू मला फसविण्याकरता हुबेहूब सहा मूर्त्या बनवल्यास. पण एक क्षुल्लक चूक कशी काय केलीस बरं?''

हे ऐकताच मूर्तिकार ताडकन म्हणाला, ''चूक व माझ्याकडून?, शक्यच नाही.''

यमराज हसले व म्हणाले, ''हीच तुझी चूक, मी पुतळ्यात चूक म्हटल्याबरोबर तुझा अहंकार जागा झाला. तुझा अहंकार ही तुझी सर्वात मोठी चूक आहे. ही चूक तू केली नसतीस तर ह्या मूर्तीतून तुला ओळखून घेऊन जाणं अगदीच अवघड झालं असतं. चल आता, स्वर्गाच्या यात्रेला.''

**तात्पर्य :** कोणत्याही गोष्टीचा अहंकार बाळगू नका. त्यामुळे आपलंच नुकसान होतं. अहंकार हा आपला सर्वांत मोठा शत्रू आहे.

**वरुण अमित राठी**

७ शीतल सोसायटी, शंकरशेठ रोड, पुणे - ३७.

**म्हातारी मिनी**

मिनीचा लागला
हलायला दात
सारखा तिला
एकच नाद
जीभेने दात
हलव हलवून
कधी हलवे
दोरा बांधून
एकदा दात
कुटकन पडला
मिनीला केव्हा
नाही कळला
म्हणू लागली
तिला सारी
मिनी झाली
हो म्हातारी!



**मिनीची सर्दी**

मिनी गेली होती
फिरायला वाऱ्यात
परत आली अन
सर्दी झाली जोरात
गले में खिचखिच
आणि बंद नाक
खोकला सारखा
खॉक खॉक खॉक
ऑछी ऽ ऑछी ऽ
शिंका लागल्या येऊ
मिनी विचारे हळूच,
"आई, शाळेला
नको जाऊ?"

सुप्रिया वकील

# चित्र रंगवा



## फ्रँकलिन आणि हरवलेला कॅमेरा

पोलेत बुर्ज्वा . ब्रेन्डा क्लार्क
मराठी अनुवाद : मंजूषा आमडेकर

फ्रँकलिनला 'बे' चा पाढा यायचा आणि बुटांची नाडी बांधता यायची. दुसऱ्यांना न सापडणाऱ्या वस्तू त्याला पटकन दिसायच्या. एकदा फ्रँकलिनला तीन पानी झाडाची चार पानं असलेली एक दांडी मिळाली. नंतर एकदा त्याच्या आईच्या हातून हरवलेला किल्ल्यांचा



जुडगा त्याला सापडला. पण एक दिवस मात्र फ्रँकलिनला एक खासमखास गोष्ट मिळाली.

बागेकडे जाताना त्याला एक निळसर रंगाची वस्तू रस्त्याच्या कडेला पडलेली दिसली.

''ओहो!'' फ्रँकलिन ती वस्तू उचलून घेत म्हणाला. ''कॅमेरा!''

याआधी इतकी मस्त वस्तू त्याला कधीच मिळालेली नव्हती.

फ्रँकलिननं कॅमेऱ्याच्या लेन्समधून पाहिलं. आपण एक फोटोग्राफर आहोत, अशी कल्पना करून पाहिली, अगदी त्याच्या आजीसारखाच, तिनं मागच्या उन्हाळ्यात फोटो काढले होते.

''चला, 'चीज' म्हणा!'' तो म्हणाला.

मग फ्रँकलिननं कॅमेऱ्याचं बटण दाबायचा अभिनय केला.

मग त्याच्या असं लक्षात आलं, की त्या कॅमेऱ्यानं कुणीतरी आधीच फोटो काढून ठेवलेले आहेत.

फ्रँकलिननं बागेत पोचल्या-पोचल्या लगेचच सगळ्या मित्रांना तो कॅमेरा दाखवला.

''वाव्,'' हरीण म्हणालं. ''हा तुझा आहे का रे?''

''माझा नाहीये,'' फ्रँकलिन म्हणाला. ''पण मला तो सापडलाय.''

बिव्हरनं खांदे उडवले. ''वस्तू ज्याला सापडते, त्याचीच असते.''

“तसं मी नीट पाहिलं, पण मला यावर कुणाचं नाव दिसलं नाही.” फ्रँकलिन म्हणाला.

“याचा अर्थ आता तो तुझाच आहे.” बिव्हर ठामपणे म्हणाली.

“याला काही चोरी म्हणता येणार नाही.” हरीण म्हणालं. “तुला तो सापडलाय.”

पण तरीही ज्या वस्तू आपल्या मालकीच्या नसतील त्या आपण ठेवून घ्यायच्या नसतात, हे फ्रँकलिनला माहीत होतं.

मग त्यानं नंतर कॅमेऱ्याच्या खऱ्या मालकाला शोधून काढायचं ठरवलं.

नेमका त्याच वेळी बिव्हरनं मजेदार चेहरा केला.

“झकास!” फ्रँकलिन म्हणाला.



आणि त्यानं खटकन एक फोटो काढला.

"माझा पण! माझा पण!" हरीण आणि ससा एकदमच ओरडले.

आणि मग काही कळायच्या आतच फ्रँकलिननं उरलेली सगळी फिल्म संपवून टाकली.

फ्रँकलिननं कॅमेऱ्यातून फिल्म काढून घेतली आणि ती स्वतःच्या गोट्यांच्या पिशवीत ठेवून दिली.

"आता मला आणखी रोल आणावा लागेल." तो म्हणाला.

"याचा अर्थ, तू कॅमेरा ठेवून घेणार आहेस का?" हरणानं विचारलं.

फ्रँकलिन ते ऐकून चकितच झाला.

"अरेच्चा! तो माझा नाही ही गोष्ट मी साफ विसरूनच गेलो होतो." फ्रँकलिन म्हणाला. "त्यापेक्षा हा कुणाचा हरवलेला कॅमेरा आहे ते शोधून काढलेलं बरं."

"कदाचित, तू कॅमेरा वापरलास हे पाहून त्या मालकाला तुझा राग येईल." बिव्हर म्हणाला.

फ्रँकलिन चांगलाच घाबरला. "मी या गोष्टीचा विचारच केला नाही."

आता काय करावं तेच फ्रँकलिनला कळेना. त्याच्यावर कुणी रागावलेलं त्याला मुळीच आवडायचं नाही.

फ्रँकलिननं काही वेळ विचार केला.

(क्रमशः)

The Secret Seven

# द सीक्रेट सेव्हन

धडाकेबाज छोट्या सात गुप्तहेरांची
१५ पुस्तकांची साहसपूर्ण मालिका...

- द सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची साहसी मोहीम
- शाब्बास, सीक्रेट सेव्हन
- रहस्याच्या मागावर सीक्रेट सेव्हन
- आगे बढो, सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची यशस्वी कामगिरी
- सीक्रेट सेव्हनची सरशी
- सीक्रेट सेव्हन झिंदाबाद
- सीक्रेट सेव्हन आणि रहस्य
- सीक्रेट सेव्हन समोर कोडं
- सीक्रेट सेव्हनची आतषबाजी
- 'गुणवान' सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनला धक्का
- सावधान! सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची गम्मत जम्मत



एनिड ब्लायटन | अनु. प्रियंका कुलकर्णी

किंमत प्रत्येकी ८०रु. | संपूर्ण सेटची किंमत ९९९रु.
एकत्रित पोस्टेज ४० रु.

# ओळखा पाहू



## 'नामवंत विनोदी लेखक'

विजेत्यास रु. १०१ चे रोख
पारितोषिक दिले जाईल.

आपली उत्तरे दिनांक ५ जुलै २०१० पर्यंत आम्हाला मिळायला हवीत. बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल. निकाल ऑगस्ट २०१०च्या अंकात जाहीर होईल.

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**
मेहता पब्लिशिंग हाऊस, माडीवाले कॉलनी, १९४१ सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०.

'एप्रिल' अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

खान्देशात उमललेलं कवित्व - ना. धों. महानोर

स्पर्धेचे विजेते - **प्रा. डॉ. पीतांबर सरोदे**

अश्विनी घोले, रामचंद्र आवटे, शि.वा. आठवले, हरिभाऊ शिंदे, रा.द.ढुमणे, रमेश थेटे, जानकी वाचनालय - पुणे, प्रियांका सुरळकर, चंद्रकांत अंबाडे, रविंद्र सराफ - जळगाव, अरविंद भोळे, वसंत किनगावकर - औरंगाबाद, सुरेश काटनेश्वरकर - जालना, अनिल शेळके - सोलापूर, अशोकसिंह सोलंकी - नांदेड, हादीशाहखान पठाण, असलमशाहखान पठाण - जालना, डॉ. सुशिला पाटील - अमरावती, सुरेखा हावळ, विनायक हावळ, श्रीकांत खंडकर - कोल्हापूर, ग. ना. कापडी - गोवा, मोहन पोतदार, अर्चित असनारे - अकोला, वसुधा गायधनी, वसंत गायधनी - नाशिक, भीमराव गुंडे, मिलिंद चोपकर - नागपूर,

**प्रायोजक**

श्री.राजू जगदीशचंद्र मेहता, मे. हिराचंद नानचंद अँड कंपनी,
**साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी**
टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**

**सूचना -** प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

## प्रिय वाचकमित्रहो........

आपल्या सोयीसाठी
**'मेहता पब्लिशिंग हाऊस'**चे ग्रंथदालन
आठवड्याचे सातही
दिवस नियमित सुरू राहील.
वेळ - सोम. ते शनि. ९.३० ते ६.३०
रविवारी सकाळी १० ते ४

**सभासदांनी पुस्तकखरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे.**

**सभासदांना सूचना**

भारतीय टपाल खात्याच्या नवीन अधिनियमानुसार मासिकाचे वितरण करताना पिनकोडसहित संपूर्ण पत्ता टाकणे अनिवार्य आहे. आपला अंक व्यवस्थित व वेळेत वितरित होण्यासाठी कृपया पिनकोडसह आपला संपूर्ण पत्ता लिहून पोस्टकार्डद्वारे मासिकाच्या पत्त्यावर पाठवावा. ही विनंती.

# मेहता मराठी ग्रंथजगत

**एप्रिल २००९ पासून वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत**

**एक वर्षाला २०% तीन वर्षांना २५% पाच वर्षांना ३०%**

**एक वर्षाची वर्गणी १५०रु.**

**तीन वर्षांची वर्गणी ३५०रु.**

**पाच वर्षांची वर्गणी ५००रु.**

**तीन किंवा पाच वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'चतुर बोकोबा आणि नशीबवान शेखर'**
लेखिका : वृषाली पटवर्धन
प्रत्येकी ३० रु. ची
पुस्तके भेट!

पोस्टेज २० रू.







५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'शिवणकला–एक छंद'**
(सलवार कमीज । स्कर्ट–ब्लाऊज
इव्हिनिंग गाऊन्स । मिडी)
लेखिका : हेमा कळके
हे ८० रू. चे
पुस्तक भेट !
पोस्टेज २० रु.




**भेट पुस्तके प्रती शिल्लक असेपर्यंतच**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४


**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739 Licence to post WITHOUT PREPAYMENT/
Regd.No.:L2/RNP/PNW/M/184/09-2011/ L.NO.LWP-50/Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 June 2010

न
वी
न

# अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड

लाखो भारतीयांच्या दृष्टीने नारायण मूर्ती हे एक आदर्श व्यक्तिमत्त्व आहे. औद्योगिक क्षेत्रातील कर्तृत्व आणि नेतृत्व मूल्याधिष्ठित वागणूक आणि व्यक्तिगत आचरण यामुळे नारायण मूर्ती हे अवघ्या देशासाठी आदर्श ठरले आहेत. ते भारताच्या नव्या, प्रगतिशीलपर्वाचे प्रतिनिधित्व करतात. त्यांनी दिलेल्या व्याख्यानांचा हा संग्रह भावी पिढ्यांना प्रेरणादायक आणि मार्गदर्शक ठरेल याची मला खात्री आहे.




**- डॉ. मनमोहन सिंग,** पंतप्रधान, भारत

भारतात जागतिक दर्जाच्या, मूल्याधिष्ठित कंपनीची उभारणी करणं शक्य आहे हे नारायण मूर्ती यांनी अनेक अडथळे पार करून सिद्ध केले आहे, मूर्तींच्या दूरदृष्टीमुळे आणि नेतृत्वामुळे उद्योजकतेच्या जगात नवी चमक आली आहे, आपली स्वत:कडे पाहण्याची आणि जगाची भारताकडे पाहण्याची दृष्टी बदलली आहे. व्याख्यानांच्या या संग्रहाद्वारे, व्यवसायामधीलमूल्ये आणि नेतृत्वगुण यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले आहे.

**- बिल गेट्स** (अध्यक्ष), संचालक मंडळ,
मायक्रोसॉफ्ट कॉर्पोरेशन

**एन.आर.नारायण मूर्ती** – अनुवाद : **चित्रा वाळिंबे**

**किंमत– २५० रु.** **पोस्टेज –३० रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे – ३०. फोन – (०२०) २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.